
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. १३ सप्टेंबर २०२५ वर्ष - तिसरे अंक १६० पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## अभिनेत्री करिश्माने मारली चालत्या लोकलमधून उडी



मुंबई : लोकप्रिय अभिनेत्री करिश्मा शर्मा हिचा मुंबईतील चर्चगेट येथे अत्यंत गंभीर अपघात झाला. करिश्मा स्वतःने सोशल मिडियावर हा धक्कादायक किस्सा शेअर करत घटनाक्रम स्पष्ट केला आहे. तिने इंस्टाग्राम स्टोरीत सांगितले की, शूटिंगसाठी चर्चगेटकडे जाताना साडी नेसून लोकल ट्रेन पकडण्याचा निर्णय घेतला. मात्र तिच्या मित्र-मैत्रिणींना ट्रेन पकडायला जमले नाही. त्यामुळे करिश्माने धावत ट्रेनमधून उडी मारली आणि त्या दरम्यान ती पडली. करिश्माच्या म्हणण्यानुसार, या अपघातामुळे तिला डोक्याला गंभीर दुखापत झाली असून पाठीवरही मार लागला आहे. तिला डोक्याला सूज आले असून डॉक्टरांनी तिला एमआरआय करण्याचा सल्ला दिला आहे.

## माधुरीला पाठवण्यावर तुर्तास निर्णय नाही

नवी दिल्ली, १२ सप्टेंबर : कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी येथील जैन मठात ३३ वर्षांपासून असलेली माधुरी उर्फ महादेवी हत्ती परत कोल्हापूरला पाठवण्यावर सर्वोच्च न्यायालयात आज, शुक्रवारी सुनावणी झाली. मात्र, तातडीने कोल्हापूरला पाठवण्याबाबत कोणताही निर्णय देण्यात आलेला नाही. हे प्रकरण आता एका उच्चस्तरीय समितीकडे वर्ग करण्यात येणार असल्याचे न्यायालयात सर्व पक्षकारांनी मान्य केले आहे.



## पंतप्रधान मणिपूरसह विविध राज्यांच्या दौऱ्यावर

नवी दिल्ली, १२ सप्टेंबर : पंतप्रधान नरेंद्र मोदी १३ ते १५ सप्टेंबर दरम्यान मिजोरम, मणिपूर, आसाम, पश्चिम बंगाल आणि बिहार या राज्यांचा दौरा करणार आहेत. पंतप्रधान कार्यालयाने (पीएमओ) आज, शुक्रवारी जारी केलेल्या निवेदनात ही माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, शनिवारी १४ सप्टेंबर रोजी मिजोरमच्या आयझोल येथे भेट देतील आणि ९ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचा उद्घाटन व भूमिपूजन समारंभ करतील.


## राज्यातील ३४ जिल्हा परिषदांच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापतींसाठी आरक्षण जाहीर

मुंबई : महाराष्ट्रात दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीआधी केंद्रीय निवडणूक आयोग बिहार प्रमाणेच महाराष्ट्रातही मतदार याद्यांची सखोल फेरतपासणी करण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोग लवकरच होणार असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी तयारी करत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सभापतींसाठी आरक्षण जाहीर केले. एकूण ३४ जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदासाठी आरक्षण जाहीर करण्यात आले.



ग्रामविकास विभागाने जाहीर केलेल्या आरक्षणाच्या शासन निर्णयानुसार अर्थात जीआरनुसार, ठाणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची जागा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव आहे. पालघर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची जागा ही अनुसुचित जमातीसाठी राखीव आहे. रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, पुणे, बुलढाणा, यवतमाळ, छत्रपती संभाजीनगर अशा आठ जिल्ह्यांच्या जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदासाठी सर्वसाधारण प्रवर्गाचं आरक्षण जाहीर झालं आहे. सांगली, कोल्हापूर, लातूर, अमरावती, गोंदिया, गडचिरोली या सहा जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदासाठी सर्वसाधारण महिला प्रवर्गाचे आरक्षण जाहीर झाले आहे. पालघर, नंदुरबार या दोन जिल्हा परिषदांचे अध्यक्षपद अनुसुचित जमाती प्रवर्गासाठी राखीव आहे. अहिल्यानगर, अकोला, वाशिम या तीन जिल्हा परिषदांचे अध्यक्षपद अनुसुचित जमाती महिला प्रवर्गासाठी राखीव आहे. परभणी, हिंगोली, वर्धा या जिल्हा परिषदांचे अध्यक्षपद हे अनुसुचित जातीसाठी आरक्षित आहे. बीड आणि चंद्रपूर जिल्हा परिषदेचं अध्यक्षपद अनुसुचित जाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित आहे. रत्नागिरी, धुळे, सातारा, जालना, धाराशिव या जिल्हा परिषदांचे अध्यक्षपद मागास प्रवर्ग महिलांसाठी आरक्षित आहे.

## सी. पी. राधाकृष्णन झाले भारताचे १५ वे उपराष्ट्रपती, राष्ट्रपतींनी दिली शपथ



नवी दिल्ली : भारताचे १५ वे उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन यांनी शपथ घेतली. दिल्लीत राष्ट्रपती भवन येथे शपथविधी सोहळा झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सी. पी. राधाकृष्णन यांना उपराष्ट्रपतीपदाची शपथ दिली. या सोहळ्याला पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दोघे पण शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते.

भारताचे १४ वे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी तब्येतीचे कारण देत जुलै २०२५ च्या सुरुवातीला राजीनामा दिला. यामुळे रिक्त झालेल्या उपराष्ट्रपतीपदासाठी निवडणूक झाली. या निवडणुकीत एनडीएच्या सी. पी. राधाकृष्णन यांना पहिल्या पसंतीची ४५२ मते मिळाली तर प्रतिस्पर्धी उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांना केवळ ३०० मते मिळाली. उपराष्ट्रपती निवडणुकीत एनडीएचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांनी विरोधी उमेदवारावर दणदणीत विजय मिळवला. विरोधकांची मते फुटल्यामुळे एनडीएसाठी विजयाचा आनंद द्विगुणीत झाला.

निवडणुकीत एकूण ७८१ पात्र खासदारांपैकी ७६७ जणांनी मतदान केले. यापैकी ७५२ मते वैध ठरली, तर १५ मते अवैध ठरली. विरोधी पक्षाचे सर्व ३१५ खासदार एकजुटीने मतदान करतील असा दावा काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केला होता. प्रत्यक्षात सी. पी. राधाकृष्णन यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांना केवळ ३०० मते मिळाली. विरोधकांची उर्वरित मते फुटली. ही मते एनडीएच्या उमेदवाराच्या पारड्यात पडली.

## महाराष्ट्र-आयोवा भागीदारीमुळे विविध क्षेत्रांमध्ये सहकार्याची नवी दारे खुली होणार - मुख्यमंत्री

मुंबई, १२ सप्टेंबर : महाराष्ट्र - आयोवा (अमेरिका) यांच्यातील भागीदारीमुळे कृषी, जैवतंत्रज्ञान, वित्तीय सेवा, पायाभूत सुविधा, नवीकरणीय ऊर्जा व तंत्रज्ञान अशा विविध महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये सहकार्याची नवी दारे खुली होणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोवाबरोबर करण्यात आलेल्या सामंजस्य करारानंतर केले.



सामंजस्य करारामुळे नवोपक्रमांना चालना

अमेरिकेतील कृषिप्रधान आयोवा राज्याशी महाराष्ट्राने ऐतिहासिक सामंजस्य करार केला. आयोवा हे अमेरिकेचे 'फूड बास्केट' म्हणून प्रसिद्ध असून शेती व कृषितंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगत राज्य मानले जाते. या कराराद्वारे महाराष्ट्रात कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित शेती, कृषितंत्रज्ञान, डिजिटायझेशन, आरोग्य, व्यावसायिक प्रशिक्षण व कौशल्य विकास, पर्यटन, क्रीडा, जैवतंत्रज्ञान, सामाजिक-आर्थिक सेवा, नवीकरणीय ऊर्जा आणि पायाभूत सुविधा विकास या महत्त्वाच्या क्षेत्रांत नव्या संधी निर्माण होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आयोवाच्या राज्यपाल किम रेनॉल्ड्स यांच्या उपस्थितीत हा करार मुंबईतील ताज पॅलेस हॉटेलमध्ये झाला.

## भारतीय पर्यटकांवर नेपाळमध्ये हल्ला; मोबाईल-रोख रक्कम लुटली

काठमांडू : नेपाळमध्ये सोशल मीडिया बंदीविरोधात सुरू झालेल्या आंदोलनाला आता हिंसक वळण मिळालंय. गेल्या काही दिवसांपासून राजधानी काठमांडूसह विविध भागांत निदर्शने होत असून, परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आहे. आंदोलकांनी सरकारविरोधी घोषणा देत मंत्र्यांच्या निवासस्थानांची जाळपोळ केली, तर संसदेच्या इमारतीवरही हल्ला करण्यात आला. या घटनेनंतर तीन दिवस उलटूनही नेपाळमधील परिस्थिती अजूनही सुधारलेली नाही. आंदोलनाच्या आडून गुन्हेगारांनी संधी साधत हिंसाचाराचा मार्ग स्वीकारल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनासोबतच परदेशी नागरिकांमध्येही भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. गुरुवारी, काठमांडूजवळ आंदोलनकर्त्यांनी भारतीय प्रवाशांनी भरलेल्या एका बसवर हल्ला केला. हल्लेखोरांनी प्रवाशांचे सामान लुटले असून, बसमधील अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, बस क्रमांक उत्तर प्रदेश नोंदणीचा होता आणि त्यामध्ये प्रवास करणारे बहुतेक लोक आंध्र प्रदेशचे रहिवासी होते. दरम्यान, नेपाळ सरकारवर देशातील कायदा व सुव्यवस्थेच्या बिघाडाबद्दल टीका होत असून, सोशल मीडिया बंदीचा निर्णय मागे घ्यावा अशी मागणी आंदोलकांकडून केली जात आहे.

आंदोलनात बसवर हल्ला

मिळालेल्या माहितीनुसार, आंदोलनकर्त्यांनी गुरुवारी भारतीय प्रवाशांनी भरलेल्या बसवर अचानक हल्ला चढवला. सुरुवातीला हल्लेखोरांनी बसवर दगडफेक केली, ज्यामुळे बसची काच फुटली आणि प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर आंदोलकांनी बसमध्ये घुसून प्रवाशांचे मोबाईल फोन, रोकड आणि इतर मौल्यवान वस्तू लुटल्या. या घटनेत किमान आठ प्रवासी जखमी झाल्याची पुष्टी करण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच नेपाळी लष्कराचे जवान घटनास्थळी दाखल झाले आणि प्रवाशांना मदत केली. तात्काळ भारतीय दूतावासालाही या हल्ल्याची माहिती देण्यात आली. परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर सर्व भारतीय प्रवाशांना सुरक्षितपणे काठमांडूहून विमानाने दिल्लीला आणण्यात आले. बस चालकाच्या माहितीनुसार, हल्ला झाल्यावेळी ही बस उत्तर प्रदेशातील महाराजगंज जिल्ह्यातील सोनौली सीमेच्या अगदी जवळ पोहोचली होती. त्यामुळे सीमावर्ती भागात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, सुरक्षेत अधिक कडक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. नेपाळमधील आंदोलन अधिक उग्र होत असल्याने भारतातही सतर्कतेचे वातावरण आहे. हल्ल्यातून बचावलेल्या बस चालक राज यांनी सांगितले की, आंदोलकांनी बसची एकही काच सुरक्षित ठेवली नाही. प्रवाशांचा जीव वाचला हेच मोठं भाग्य असल्याचं त्यांनी नमूद केलं. नेपाळमधील या हिंसक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने सीमावर्ती राज्यांना अलर्ट जारी केला आहे.

## कोणीही आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये : छगन भुजबळ

लातूर: मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाबाबतच्या यशस्वी आंदोलनामुळे, ओबीसी आरक्षण संपुष्टात येत असल्याच्या नैराश्यातून लातूरच्या भरत महादेव कराड या तरुणाने आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना काल घडली. त्यामुळे आज, ओबीसी नेते आणि राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी मृत तरुणाच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यादरम्यान त्यांनी, ओबीसींच्या न्याय हक्कासाठी आपण लढत आहोत. आपल्या देशात लोकशाही व्यवस्था असून न्यायव्यवस्थेवर आपला पूर्णपणे विश्वास आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षण टिकवण्यासाठी आपण न्यायालयीन आणि प्रसंगी रस्त्यावरील दोन्ही लढाया देखील लढू. त्यामुळे कोणीही आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये. असे आवाहन ओबीसी समाजाला केले आहे.

आत्महत्या केलेला तरुण भरत महादेव कराड हा लातूर जिल्ह्यातील वांगदरी (ता. रेणापूर) येथील स्थानिक होता. ओबीसी आरक्षण संपुष्टात येत असल्याच्या नैराश्यातून त्याने आपले जीवन संपवलं. ज्यामुळे कराड कुटुंबियांवर दुःखाचा गोंधळ कोसळला. त्यामुळे त्यांचे सांत्वन करण्यासाठी मंत्री भुजबळ यांनी कराड कुटुंबीयांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. यावेळी माजी मंत्री धनंजय मुंढे, आमदार रमेश कराड, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे कार्याध्यक्ष बापूसाहेब भुजबळ, ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे, ड.सुभाष राऊत, सरपंच विजय गंभिरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मंत्री छगन भुजबळ यांनी स्वर्गीय भरत कराड यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी भरतच्या लहानग्या मुलाला पाहून मंत्री छगन भुजबळ यांना गहिवरून आले. त्यांनी या लहानग्या मुलाचे अश्रू पुसत कुटुंबियांना धीर दिला आणि आर्थिक मदत सुपूर्द केली.

यावेळी उपस्थित जनसमुदायासमोर मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, स्व.भरत कराड यांनी ओबीसींचा ध्यास घेतलेला होता. जिथे जिथे ओबीसीच्या सभा व मेळावे असायच्या तिथ तिथं ते जात होते. ओबीसी समाजाचं आरक्षण कमी होता कामे नये ही त्यांची भावना होती. ओबीसी आरक्षण टिकवण्यासाठी त्यांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. गरीब ओबीसींच्या ताटात वाटेकरी नको असे त्यांना वाटायचे असे ते म्हणाले.

कुणीही असे टोकाचं पाऊल उचलू नका

ते पुढे असे देखील म्हणाले की, भरत कराडची आत्महत्या ही अतिशय दुर्दैवी घटना असून या घटनेने मन सुन्न झाले आहे. त्यामुळे कुणीही असे टोकाचं पाऊल उचलू नका, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मावळ्यांप्रमाणे लढा द्या.

## राज्यात पावसाचा जोर वाढण्याचा इशारा

मुंबई : बंगालच्या उपसागराच्या वायव्य भागात कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्याने आंध्र प्रदेश, ओडिशा आणि महाराष्ट्रात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून मराठवाडा आणि विदर्भात ढगाळ वातावरण टिकून असून अनेक भागात अतिवृष्टी झाल्याची नोंद झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील १३ मंडळात विशेषतः अतिवृष्टीमुळे घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील चार दिवस महाराष्ट्रात पावसाचा जोर अधिक वाढणार असून १३ सप्टेंबर रोजी मराठवाडा प्रदेशात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

१३ व १४ सप्टेंबरला कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विशेषतः विदर्भ मराठवाडा व मध्य महाराष्ट्रात पुढील दोन दिवस पावसाचा जोर अधिक राहणार असून कोकण किनारपट्टी, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. रविवारपासून विदर्भात पावसाचा जोर कमी होण्याची शक्यता असून मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि कोकण किनारपट्टीवर पावसाला पोषक वातावरण असण्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे. १३ सप्टेंबर रोजी धाराशिव, लातूर, सांगली, रायगड आणि सातारा घाटमाथ्यावर पावसासाठी ऑरेंज अलर्ट जाहीर केला असून विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील उर्वरित जिल्ह्यांना येलो अलर्ट देण्यात आला आहे. मुंबई आणि ठाणे भागातही पावसाचा जोर अधिक राहण्याचा अंदाज आहे. पालघर, धुळे, नंदुरबार आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. १४ सप्टेंबर रोजी रायगड, रत्नागिरी व पुणे घाटमाथ्यावर पावसासाठी ऑरेंज अलर्ट जाहीर केला असून मुंबई, ठाणे, नाशिक, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग आणि संपूर्ण मराठवाड्यात येलो अलर्ट जाहीर करण्यात आले आहे.

## पिकांच्या नुकसानीपोटी ७३ कोटी ९१ लाख ४३ हजाराच्या मदतीस मान्यता : मंत्री मकरंद जाधव-पाटील

मुंबई, दि. १२ : राज्यात जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीपोटी बाधितांना ७३ कोटी ९१ लाख ४३ हजाराच्या मदतीस राज्य शासनाने मान्यता दिली असून या बाबतचे शासन निर्णय जारी करण्यात आले असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले, नैसर्गिक आपत्तीत बाधित शेतकऱ्यांना मदत आणि दिलासा देण्यास शासनाने नेहमीच प्राधान्य दिले आहे. शासनाने बाधित पिकांचे तातडीने पंचनामे ही मदत देण्याच्या घेतलेल्या या निर्णयामुळे अतिवृष्टी व अवकाळी पाऊस या आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना उभारी मिळेल, असा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी व्यक्त केला.

ही मदत देण्यास मान्यता देण्यात आलेल्या कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये जून २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे शेत पिकांच्या नुकसानीपोटी बाधितांना ३७ लाख ४० हजार रुपये तर नागपूर, वर्धा, चंद्रपूर, हिंगोली आणि सोलापूर जिल्ह्यात जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत शेत पिकांच्या नुकसानीपोटी ७३ कोटी ५४ लाख ३ हजार मदतीचा समावेश असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले.

जून २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे शेत पिकांच्या नुकसानीपोटी रायगड जिल्ह्यातील ९८० बाधित शेतकऱ्यांच्या ५५.६५ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ११ लाख ८१ हजार रुपये, रत्नागिरी जिल्ह्यातील ५६० शेतकऱ्यांच्या ७१.५४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १२ लाख ९६ हजार रुपये आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ३३५ शेतकऱ्यांच्या ५०.६४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १२ लाख ६३ हजार रुपये असे १ हजार ८७५ शेतकऱ्यांच्या १७७.८३ हेक्टरवरील बाधित झालेल्या पिकांसाठी मदत म्हणून ३७ लाख ४० हजार रुपये इतक्या निधीस मान्यता देण्यात आली आहे.

## पोलिस भरतीत तरुणांसाठी सुवर्णसंधी! महाराष्ट्र सरकारची वयोमर्यादेत विशेष सूट

मुंबई: महाराष्ट्रातील असे अनेक तरुण आहेत, जे पोलिस अधिकारी किंवा कॉन्स्टेबल बनण्याचे स्वप्न उरी बाळगून आहेत, आणि त्यासाठी जीवतोड प्रयत्न देखील करत आहेत. मात्र याबरोबरच असेही काही तरुण आहेत, की ज्यांची वयोमर्यादा ओलांडल्यामुळे ते आता पुन्हा भरतीसाठी अर्ज करू शकत नाहीत. तर अशा सर्वांसाठी महाराष्ट्र सरकारकडून वयोमर्यादेत विशेष सूट देण्यात आली आहे. यामुळे अनेक तरुणांचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्र सरकारने पोलीस दल आणि तुरुंग विभागात १५,६३१ पदांसाठी सुरू असलेल्या भरती प्रक्रियेतील वयोमर्यादेत विशेष सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. ज्याचा फायदा महाराष्ट्रातील हजारो तरुणांना होणार आहे.

गृह विभागाने दि.१० सप्टेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, २०२२, २०२३, २०२४ आणि २०२५ मध्ये ज्या उमेदवारांची वयोमर्यादा ओलांडली आहे ते देखील या भरतीत अर्ज करू शकतील. यापूर्वी २०२२ आणि २०२३ मध्ये वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांनाच सवलत देण्यात आली होती, परंतु



ताज्या शुद्धीपत्रकात ती आणखी दोन वर्षे वाढवून २०२५ करण्यात आली आहे.

दि.१ जानेवारी २०२४ ते दि.३१ डिसेंबर २०२५ दरम्यान पोलिस आणि तुरुंग विभागात रिक्त असलेल्या एकूण १५,६३१ पदांसाठी ही भरती करण्यात येत आहे. विशेष पोलिस महानिरीक्षक (प्रशिक्षण आणि विशेष पथक) यांनी १ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या पत्राच्या आधारे या पदांवर भरती करण्याचा प्रस्ताव अंमलात आणण्यात आला आहे.

या निर्णयामुळे पोलिस विभागात काम करू इच्छिणाऱ्या राज्यभरातील अनेक तरुणांच्या आशा पुन्हा जागृत झाल्या आहेत. कोरोना साथीमुळे आणि भरती प्रक्रियेतील विलंबामुळे वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांची संख्या जास्त असल्या कारणामुळे, सरकारचे हे सकारात्मक पाऊल असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे वयोमर्यादा ओलांडणारे तरुण देखील या भरती प्रक्रियेत सहभागी होऊन, आपले स्वप्न साकार करू शकतील.

विशेष भरती प्रक्रियेपुरतीच

सरकारी सूत्रांनुसार, वयोमर्यादेतील ही सवलत केवळ या विशेष भरती प्रक्रियेपुरती मर्यादित असेल. उमेदवारांना अटी आणि शर्तींचे पालन करणे बंधनकारक असेल आणि सर्व निवड प्रक्रिया पूर्व-निर्धारित मानकांनुसार असेल. या निर्णयाबद्दल महाराष्ट्रातील तरुणांमध्ये प्रचंड उत्साह आहे. सोशल मीडियावरही हे स्वागतार्ह पाऊल असल्याचे म्हंटले जात आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अशोकस्तंभ उभारणीसाठी उदगीरात बेमुदत उपोषण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ ऑगस्ट -** उदगीर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर अशोकस्तंभ मंजूर असलेल्या ठिकाणीच उभा करण्यात यावा, या मागणीसाठी सहा युवक मागील चार दिवसांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर बेमुदत उपोषणाला बसले आहेत. गुरुवारी उपोषणाचा चौथा दिवस होता. पालिका प्रशासन व विविध राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो यशस्वी झाला नाही. दरम्यान, एका उपोषणकर्त्याची प्रकृती ढासळली.



शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर प्रशासनाने मंजूर केलेल्या ठिकाणीच अशोकस्तंभाची उभारणी करण्यात यावी, या मागणीसाठी मागील आठवड्यात १० दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर आंदोलन करण्यात आले होते. परंतु, याची प्रशासनाने दखल न घेतल्याने आदर्श पिंपरे, भागवत तलवारे, बंटी घोरपडे, प्रवीण मस्के, प्रतीक कांबळे, सुनील कांबळे हे युवक पुन्हा बेमुदत उपोषणास बसले आहेत. हे आंदोलन स्थगित करून प्रशासनास सहकार्य करावे, यासाठी पालिकेचे मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, पोलीस निरीक्षक दिलीप गाडे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, काँग्रेसचे प्रदेश चिटणीस कल्याण पाटील, मधुकर एकुर्केकर यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेतली. मंजूर असलेल्या ठिकाणीच अशोकस्तंभ उभा करण्यात यावा, या मागणीवर उपोषणकर्ते ठाम असल्याने कुठलीही तडजोड झाली नाही.



### संक्षिप्त वृत्त...

## मराठवाड्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती नेमावी : देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ ऑगस्ट -** विकासातील मराठवाड्याच्या वाढलेला अनुशेष भरून काढण्यासाठी राज्य सरकारने मंत्रिमंडळ उपसमिती नेमावी, अशी सूचना माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केली आहे. 'मराठवाडा स्वाभिमान जागर यात्रे'च्या शिष्टमंडळाने देशमुख यांच्या लातूर येथील निवासस्थानी भेट घेतली, त्यावेळी त्यांनी हे मत व्यक्त केले.

दिलीपराव देशमुख यांनी या यात्रेला आपले पूर्ण समर्थन असल्याचे सांगितले. मराठवाड्याच्या तसेच, अनुशेषाबाबतच्या मागण्यांचा प्राधान्यक्रम ठरवूनच मुख्यमंत्र्यांना येत्या मराठवाडा मुक्तिदिनाच्या दिवशी छत्रपती संभाजीनगर येथे भेटून अभ्यासपूर्ण निवेदन सादर करण्याचा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी मराठवाडा स्वाभिमान जागर यात्रेचे संयोजक नामदेवराव पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळामध्ये मराठवाडा जनता विकास परिषदेचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस ॲड. व्यंकटराव बेद्रे, माजी उपनगराध्यक्ष मोईज शेख, जिल्हा बँकेचे संचालक अशोक गोविंदपूरकर, अशोकराव काळे, जयप्रकाश दगडे, प्रा. बी. एस. पळसकर, शहजादाबी शेख, ॲड. गोविंद शिरसाट, सुंदरलाल दरक यांच्यासह अन्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## शिरसीत अखंड शिवनाम सप्ताहास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ ऑगस्ट -** कासार शिरसी येथील श्री करीबसवेश्वर मठाचे मूळ पुरुष मठाधिपती करीबसवेश्वर यांच्या पुण्यतिथीदिनानिमित्त येथील मठात गुरुवारपासून परमरहस्य ग्रंथ पारायण व अखंड शिवनाम सप्ताहास प्रारंभ झाला. या निमित्त मठात नित्य महाप्रसादासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मठाधिपती गुरु मृगेंद्र स्वामी यांच्या नेतृत्वाखाली डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या प्रेरणेतून येथील मठात अखंड शिवनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्त दररोज प्रशांत महाराज तोरे बामणीकर यांच्या शिवकथेसह महादेव शिवाचार्य महाराज वाईकर सातारा यांच्या कीर्तनासह मृगेंद्र स्वामी, शिवयोगी शंकरलिंग शिवाचार्य स्वामी, भगवंतराव पाटील चामरगावेकर यांची प्रवचने तर लातूरचे नीलकंठप्पा विभुते, वलांडीचे संगमेश्वर बिराजदार, भालकीचे संदीप महाराज, तेलगावकर महाराज, अंबाजोगाईच्या सरस्वतीबाई गंगाधर स्वामी, निलंग्याचे संगनक स्वामी यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाची सांगता शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांच्या प्रसादाच्या कीर्तनाने आणि मृगेंद्र स्वामी, शंभूलिंग शिवाचार्य स्वामी यांच्या आशीर्वचन, प्रवचनेने गुरुवार, १८ सप्टेंबर रोजी करण्यात येणार असून, या निमित्त शहरात 'श्रीं'च्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या सप्ताहातील धार्मिक कार्यक्रमांचा भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीची दोनदिवसीय बैठक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ ऑगस्ट -** महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीची राज्य कार्यकारिणीची बैठक १३ व १४ सप्टेंबर रोजी येथील ओम लॉन्स मंगल कार्यालय, दिवाणजी व श्याम मंगल कार्यालयात पार पडणार आहे.

या बैठकीचे उद्घाटन माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व ॲड. अण्णाराव पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे. दोन दिवसीय बैठकीत विविध विषयांवर चर्चा होणार आहे. दुसऱ्या दिवशी समारोप व समितीतर्फे राज्यस्तरीय पुरस्कारांचे ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते पन्नालाल खुराणा व गणेश चिंचोले यांच्या हस्ते वितरण होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती शाखा लातूरतर्फे करण्यात आले आहे.

## शहर काँग्रेसची जम्बो कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ ऑगस्ट -** शहर काँग्रेसची जम्बो कार्यकारिणी बुधवारी जाहीर करण्यात आली आहे. शहराध्यक्षासह या कार्यकारिणीत २०७ पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिक कार्यकर्त्यांना कार्यकारिणीत सामावून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या कार्यकारिणीत एक शहराध्यक्ष, १० उपाध्यक्ष, २८ सरचिटणीस, ९० सचिव, ३ संघटक, ४७ सहसचिव, १० विशेष कार्यकारी सदस्य, १६ निमंत्रित सदस्य, एक कार्यालय प्रमुख आणि एका खजीनदाराचा समावेश आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, काँग्रेसचे प्रवक्ते माजी आमदार धीरज देशमुख यांच्या मान्यतेने शहर काँग्रेसची बहुप्रतिक्षीत कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. या कार्यकारिणीत जुन्या आणि नव्यांचा ताळमेळ ठेवून महिलांनाही यात स्थान देण्यात आले आहे. शहरातील सर्व भागातील पदाधिकाऱ्यांचा समतोल यात दिसून येत आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी, पक्षाची ध्येय-धोरणे लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि काँग्रेस पक्षाचे विचार समाजात रुजवण्यासाठी सक्रियपणे योगदान द्यावे, अशी आवाहन शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनी केले आहे. लवकरच प्रभाग समिती आणि ब्लॉक समिती घोषित करण्यात येणार असून, प्रभाग बैठकीचा कार्यक्रमही जाहीर होणार आहे, अशीही माहिती शहराध्यक्ष ॲड. जाधव यांनी दिली आहे.

## हैदराबाद गॅझेटच्या निषेधार्थ लातुरात युवकाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ ऑगस्ट -** मराठा समाजाला हैद्राबाद गॅझेट लागू करून सरकारने ओबीसींचे आरक्षण संपविले आहे. आता ओबीसींच्या आरक्षणाचे कसे, अशी चिंता व्यक्त करत हैदराबाद गॅझेटच्या निषेधार्थ घोषणा देत रेणापूर तालुक्यातील वांगदरी येथील एका ३५ वर्षीय युवकाने मांजरा नदीपात्रात उडी मारून आत्महत्या केल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली. ओबीसींच्या आरक्षणाबाबत चिंता व्यक्त करणारी चिठ्ठीही त्याने लिहून ठेवली आहे. भरत महादेव कराड असे या मयत युवकाचे नाव आहे.

भरत कराड हा ऑटोरिक्षा चालवून किंवा इतर वाहनांवर चालक म्हणून काम करत होता. गेली काही वर्षांपासून तो ओबीसींच्या आरक्षणासंदर्भात प्रत्येक आंदोलनात हिरीरीने सहभाग घेत होता. सरकारने मराठ्यांना हैद्राबाद गॅझेट लागू करून ओबीसींचे आरक्षण कायमस्वरूपी संपविले आहे. मी वेळोवेळी ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनात सहभाग घेतला होता. तरीही सरकारने ओबीसी समाजाचा घात करून ओबीसीविरोधी जीआर काढल्यामुळे मी माझे जीवन कायमस्वरूपी संपवत आहे. माझ्या पाठीमागे तरी माझ्या कुटुंबाला आणि ओबीसी समाजाला न्याय मिळावा, मी भरत कराड असा मजकूर त्याने लिहून ठेवलेल्या चिठ्ठीमध्ये आहे.



बुधवारी सायंकाळी वांगदरी शिवारात मांजरा नदीपात्रात घोषणा देत ओबीसींचे आरक्षण अबाधित ठेवलेच पाहिजे, सरकार ओबीसींविरोधी आहे. माझ्या कुटुंबियांना व ओबीसी समाजाला न्याय मिळावा, अशा घोषणा देत नदीपात्रात उडी मारून त्याने आत्महत्या केली. भरत कराड याने नदीपात्रामध्ये उडी मारताच त्या परिसरात असलेल्या काही तरुणांनी त्याला वाचविण्याचा प्रयत्न केला, पण त्यात यश आले नाही. शवविच्छेदन करून गुरुवारी दुपारी वांगदरी येथे भरत कराड याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी ओबीसी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ओबीसी आरक्षणासंदर्भात आंदोलन करणारा भरत कराड याच्या अंत्यविधीवेळी वांगदरी आणि परिसरातील शोकाकूल नागरिकांनी ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावू नये, भरत कराड याचे बलिदान वाया जाऊ देणार नाही, अशा घोषणा दिल्या. भरत कराड याच्या पश्चात आई, पत्नी, तीन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. कराड कुटुंबाकडे १० ते २० गुंठे जमीन असल्याचे सांगण्यात आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## नियमांचे उल्लंघन; कॉफी शॉपवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ ऑगस्ट -** शहरातील मोतीनगर येथील एका कॉफी शॉपवर नियमांचे उल्लंघन झाल्याचे दिसून आल्याने कॉफी शॉप चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कॉफी शॉप व कॅफे व्यावसायिकांसाठी नियमावली जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान, शहराच्या मोतीनगर भागातील ए. एस. कॉफी शॉपची तपासणी करण्यात आली. त्यात निमयबाह्य गोष्टींना चालना मिळेल, अशा प्रकारची बैठक व्यवस्था करण्यात आल्याचे आढळून आले. त्या कॉफी शॉपमध्ये सीसीटीव्ही नव्हते, पारदर्शक काचा नव्हत्या, स्पष्ट बैठक व्यवस्था नव्हती. अंतर्गत बंदिस्त कंपार्टमेंट होते. भेटी दिलेल्यांची नोंदवही नव्हती. ध्वनी प्रदूषण नियमांचे पालन झाले नसल्याचे दामिनी पथक व गांधी चौक पोलिसांनी टाकलेल्या धाडीत दिसून आले. यामुळे कॉफी शॉपचे चालक आकाश बालाजी साळुंके (रा. सोमवंशीनगर, लातूर) याच्याविरुध्द गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड, महिला पोलीस उपनिरीक्षक श्यामल देशमुख, उपनिरीक्षक चित्ते, पोलीस अंमलदार गोविंद सरवदे, संतोष गिरी, अनिल कज्जेवाड, राहुल दरोडे, प्रवीण कोळसुरे आदिंनी केली.

## वसतिगृहातील मुलांचा त्रास; विद्यार्थ्याने केली आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ ऑगस्ट -** येथील एका नामांकित वसतिगृहातील एकाच खोलीत राहणाऱ्या दोन मुलांच्या त्रासाला कंटाळून एका अकरावी विज्ञान शाखेत शिकणाऱ्या कळंब तालुक्यातील विद्यार्थ्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी सायंकाळी उघडकीस आली आहे. मयत विद्यार्थ्याने मृत्यूपूर्व चिठ्ठी लिहून ठेवली आहे. त्यावरून दोन अल्पवयीन मुलांना एमआयडीसी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

आर्यन बिभीषण गायकवाड (वय १६, रा. परतापूर, ता. कळंब, जि. धाराशिव) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. मयत आर्यन हा येथील एका महाविद्यालयात अकरावी विज्ञान शाखेत शिकत होता. तो त्याच महाविद्यालयाच्या खाजगी वसतिगृहात राहत होता. त्याच्या खोलीत दुसरे तीन विद्यार्थी आहेत. तेही अकरावीतच शिक्षण घेतात. त्यातील दोन मुले मयत आर्यन याला सतत त्रास देत होते, वारंवार अपमानित करीत होते. या त्रासामुळे आर्यन याने राहत्या खोलीचे दार आतून बंद केले. त्याने चिठ्ठी लिहून खिशात ठेवली आहे. खोलीतील त्रास देणाऱ्या दोन मुलांमुळे आपण आत्महत्या करीत असल्याचा उल्लेख त्याने चिठ्ठीत केला आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेवून पंचनामा केला. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## अविनाश बट्टेवार यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ ऑगस्ट -** येथील सिंहगड सोसायटीतील काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते अविनाश बट्टेवार यांची लातूर शहर जिल्हा काँग्रेस सचिव पदी फेर निवड करण्यात आली आहे.

या बद्दल माजी मंत्री, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धिरज देशमुख यांचे अविनाश बट्टेवार यांनी आभार मानले.

या निवडीबद्दल बट्टेवार यांचे मुकेश नंदा, आशिष मुंदडा, संदीप बिराजदार, योगेश काळे, रोहित क्षीरसागर, अक्षय शिंदे, मोतीलाल वर्मा, चेतन पंढरीकर, मयुर रांदड, श्रीकांत हुरदळे, मुकेश बिदादा यांनी अभिनंदन केले.

## नोकरीच्या आमिषाने सातजणांना ४७ लाखांचा गंडा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ ऑगस्ट -** शासकीय विभागांमध्ये नोकरी लावण्याचे आमिष दाखवून सातारा जिल्ह्यातील कराडच्या एका दाम्पत्याने लातूर येथील सात बेरोजगार तरुण-तरुणींना ४७ लाखांचा गंडा घातल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, सातारा जिल्ह्यातील कराड येथील राधिका मुकुंद पन्हाळे, कराडच्या जिल्हा परिषद शाळेत शिक्षक असलेला तिचा पती मुकुंद रंगराव पन्हाळे, अनिल दत्तात्रय कचरे व प्रमोद पाटील-सोलापुरे या चौकडीने १८ जानेवारी ते ११ फेब्रुवारी २०२४ या काळात लातूर येथील संकेत बळीराम दळवे, संजय घोडके, शीतल जाधव, सारिका गायकवाड, ऋषिकेश बिरादार, धैर्यशील देशमुख, निखिल देशमुख यांना सार्वजनिक बांधकाम विभाग, बँक, आयकर विभागात कायम शासकीय नोकरी लावण्याचे आमिष दाखविले. विश्वास बसावा यासाठी यापूर्वी शासकीय कार्यालयांमध्ये आम्ही खूप लोकांना नोकरी लावल्याचे सांगत त्यांचे बनावट नियुक्ती आदेश दाखवत संबंधितांना आपल्या जाळ्यात ओढत आवेदनपत्रे भरुन घेतली.

दरम्यान, संबंधित तक्रारदारांना सार्वजनिक बांधकाम विभाग व दोघींना बँकेत लिपिक पदाचे शासकीय वॉटरमार्क, जावक क्रमांक, बारकोड, अधिकाऱ्यांची सही व शिक्का, विभागाचा शिक्का असलेले बनावट नियुक्ती आदेश नावानिशी देण्यात आले. तसेच नियुक्ती आदेश दिलेल्यांना मुंबई येथे बोलावून खोट्या लिंक पाठवून ऑनलाइन प्रशिक्षणही देण्याचा बनाव केला. त्यानंतर सात दिवसांत तुमचे नियुक्ती आदेश पोस्टाने येतील, असे आश्वासनही दिले.

नोकरीच्या अनुषंगाने संबंधित सातजणांकडून एकूण ४७ लाख २० हजार रुपये टप्प्या-टप्प्याने घेतली. विशेष म्हणजे राधिका पन्हाळे, मुकुंद पन्हाळे व अनिल कचरे या संशयित आरोपींनी सुमारे ३२ लाख रुपये आरटीजीएस व फोन पेच्या माध्यमातून स्वीकारली असून, उर्वरित रोख घेतलेल्या रकमेचे एप्रिल २०२५ मध्ये बँक धनादेशही दिले आहेत. या गुन्ह्यातील सर्व आरोपी सराईत गुन्हेगार असून, त्यांच्यावर यापूर्वीही गुन्हे दाखल आहेत. त्यांचे महाराष्ट्रभर मोठे रॅकेट असण्याची शक्यता आहे. दरम्यान, सहआरोपी मुकुंद रंगराव पन्हाळे यांनी दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळला आहे.

## एटीएम मशीन फोडणारी टोळी गजाआड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ ऑगस्ट -** उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील एटीएम मशीन गॅस कटरने फोडून पैसे चोरणाऱ्या चौघांच्या आंतरराज्य टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने औसा रोडवर बुधवारी दुपारी अटक केली. रोख रक्कम आणि कार असा १२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




काही दिवसांपूर्वी उदगीर येथे चोरट्यांनी एटीएम मशीन गॅस कटरने तोडून त्यामधील सुमारे दीड लाख रुपये चोरून नेल्याची घटना घडली होती. या प्रकरणी चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सदर गुन्हा उघडकीस आणण्याचे निर्देश दिले होते. अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पथके तयार करून रवाना करण्यात आले होते. दरम्यान, मिळालेल्या गोपनीय माहितीवरून आस मोहम्मद फजरूद्दीन (रा. नंगलीपठाण, ता. किशनगडबास, जि. अलवर, राजस्थान), मुस्तकीम आमीन (रा. बीमा, ता. फिरोजपूर, जि. लोह, हरियाणा), हमीद हबीबखान (रा. परवाखेडा, ता. हुजूर, जि. भोपाळ, मध्यप्रदेश) आणि लीखीमन हूरी-गुज्जर (रा. बाजोट, ता. किशनगडबास, जि. अलवर, राजस्थान) या एटीएम मशीन गॅस कटरने तोडून पैसे चोरणाऱ्या आंतरराज्य टोळीला बुधवारी दुपारी लातूर ते औसा जाणाऱ्या रोडवरील एका खडी केंद्राजवळ अटक केली.

त्यांची व कारची झडती घेतली असता, गॅस टाकी, ऑक्सिजन सिलेंडर, गॅस कटर, तेलंगणा राज्याचे दोन बनावट नंबर प्लेट, तसेच एक लाकडी मूठ असलेला खंजीर, रोख एक लाख रुपये आढळून आले. त्यांची कसून चौकशी केली असता, उदगीर येथील एटीएम मशीन फोडून पैसे चोरल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली कार (एम.पी.०४ वाय. जी. ४६७८) आणि साहित्य असा एकूण १२ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या टोळीकडून लातूर जिल्ह्यासह महाराष्ट्र आणि इतर राज्यातील आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे, पोलीस अंमलदार सर्जेराव जगताप, युवराज गिरी, रियाज सौदागर, राजेश कंचे, गोविंद भोसले, जमीर शेख, मोहन सुरवसे, सिध्देश्वर मदने, राहुल कांबळे, शैलेश सुडे, हरी पतंगे, पोलीस अंमलदार अंजली गायकवाड यांनी ही कारवाई केली.

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ ऑगस्ट -** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.



धाराशिव जिल्ह्यातील अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सक्रिय कार्यकर्ते रमेश माने गुरुजी आणि चंद्रकांत ऊळेकर गुरुजी यांना डॉ. नरेंद्र दाभोळकर ग्रंथ मित्र पुरस्कार २०२५ हा जाहीर झाला आहे. या दोघांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने जे ज्येष्ठ कार्यकर्ते देविदास वडगावकर, प्रा. किरण सगर, प्रा. डॉ. महेश मोटे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## प्रधानमंत्री घरकुल योजनेचा लाभ देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ ऑगस्ट -** लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्र. ३ मधील सर्वे नं. ९५ येथील लोकांना कबाला नसल्यामुळे ते लोक प्रधानमंत्री घरकुल योजनेचा लाभ त्यांना लाभ घेता येत नाही यासाठी राष्ट्रवादी किसान सभेच्यावतीने आज जिल्हाधिकारी कार्यालय (महसुल विभाग) व आयुक्त महानगरपालिका यांना निवेदन देण्यात आले.

इंदिरानगर, साठेनगर, जयभीमनगर, बालाजीनगर, आनंदनगर भागातील राहणारे ओबीसी रहिवासी गेली ४० वर्षे येथे राहतात. यामध्ये बहुसंख्य दलित, मुस्लिम, ओ. बी. सी. मध्ये भोई, धनगर, कुंभार, गुरव व मुस्लिममधील ओबीसी जसे की आत्तार, तांबोळी, मणियार, पटवेकर व इतर ओबीसी समाजातील लोक राहतात. प्रभाग क्र. ३ सर्वे नं. ९५ हे गायरान असल्यामुळे येथील काही लोकांनी गृह निर्माण सोसायटी करून घेतली आहे; पण ज्यांची या गृह निर्माण सोसायटीमध्ये नावे नाहीत असे लोक यापासून वंचित राहात आहेत.

प्रधानमंत्री आवास योजनेच्या अटींप्रमाणे आवश्यक कागदपत्रांमध्ये एक तर जागेची रजिस्ट्री किंवा जागेचा कबाला द्यावा लागतो; पण हे गायरान असल्यामुळे तेथील रजिस्ट्रीही होत नाही व लातूर शहर महापालिकेने यांना आतापर्यंत कबालाही दिला नाही. यामुळे येथील भोई, धनगर, कुंभार, गुरव व मुस्लिममधील ओबीसी बाधवांना यांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पक्की घरे मिळावी यासाठी राष्ट्रवादी किसान सभेच्या वतीने लातूर शहर महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनावर राहुल बनसोडे, प्रणिती सुर्यवंशी, संतोष उपाडे, दिनेश कांबळे, जाहगिर शेख, सुनेद पठाण, परमेश्वर पर्वते, सोहम गायकवाड, ॲड. राजेश खटके, रमाकांत कसबे, गणेश कांबळे आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## श्रीकांत गायकवाड यांची सामाजिक कार्यकर्त्यांच्या प्रतिष्ठानला भेट




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ ऑगस्ट -** लातूर येथील सुप्रिसद्द विचारवंत प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड आणि राष्ट्र सेवा दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे यांनी सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार शिवाजी कांबळे यांचे सुपुत्र अनार्य कांबळे यांनी एके झेरॉक्स आणि मल्टीसार्व्हिसेस सेंटरला नुकतीच भेट दिली. डॉ. श्रीकांत गायकवाड यांनी नव उद्योजक अनार्य कांबळे यांचा शाल, टोपी आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच अनार्यचे वडील पत्रकार शिवाजी कांबळे यांचा देखील सत्कार केला.

## 'झोर्वेक एन्टेक्टा' हे नवीन पिढीचे पीक संरक्षण साधन बाजारात आणले

पुणे, सप्टेंबर : कॉर्टेवा ग्रीसायन्सने आज भारतात द्राक्षे आणि बटाटे या पिकांमध्ये क्रांती घडवून आणणारे, एक क्रांतिकारी नवीन बुरशीनाशक, झोर्वेक एन्टेक्टाएँ लाँच केल्याची घोषणा केली. जागतिक स्तरावर यशस्वी असलेल्या झोर्वेकएँ तंत्रज्ञानावर आधारित, हे प्रगत उपाय द्राक्षांमधील डाउनी मिल्ड्यू आणि बटाट्यांमधील लेट ब्लाइट सारख्या गंभीर रोगांपासून शेतकऱ्यांचे संरक्षण करते, ज्यामुळे पिके अधिक निरोगी होऊन जास्त उत्पादन मिळते तसेच उत्कृष्ट दर्जाचे पीक मिळते.झोर्वेक एन्टेक्टाएँ प्रगत रसायनशास्त्र आणि प्रभावी कार्यक्षमतेचे एक अद्वितीय मिश्रण सादर करते.

## फिल्मफेअर ग्लॅमर अँड स्टाईल अवॉर्ड्र्ससोबत भागीदारी

मुंबई - ब्लेंडर्स प्राईड (पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर) ने फिल्मफेअर ग्लॅमर अँड स्टाईल अवॉर्ड्स २०२५ सोबत आपल्या प्रमुख भागीदारीची घोषणा केली. या दोन आयकॉनिक शक्तींच्या एकत्र येण्याने एक भव्य मंच तयार झाला आहे, जो फॅशन, स्टाईल आणि मनोरंजनातील सर्वोत्तम गोष्टींवर प्रकाशझोत टाकतो.दशकांपासून ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर, ब्लेंडर्स प्राईड फॅशन टूर द्वारे फॅशन आणि लाईफस्टाईलच्या जगात एक अविस्मरणीय शक्ती राहिले आहे. फिल्मफेअर ही भारतातील स्टाईल आणि मनोरंजनाची जुनी व विश्वासार्ह आवाज राहिली आहे, जिने पिढ्यान्पिढ्या स्टारडमची परिभाषा घडवली आहे. या दोघांनी मिळून असा एक मंच तयार केला जिथे विजेते ते झाले, जे निडर आत्मविश्वास झळकवतात, आपल्या स्टाईल स्टेटमेंटने इतरांपेक्षा उठून दिसतात आणि 'द वन अँड ओन्ली' असल्याचा खरा आत्मा साकार करतात.

## नवरात्रीत बुकमायशोसोबत गरब्याचा आनंद लुटा

पुणे : वर्षातील सर्वात लोकप्रिय सण जवळ येत आहे. भक्ती, नृत्य आणि चैतन्यपूर्ण ऊर्जेने भरलेल्या नऊ अविस्मरणीय रात्रींसाठी तयार व्हा. ढोलकीच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या तालावर आणि रंगीबेरंगी चनिया चोलीच्या फेऱ्यांमध्ये, नवरात्री हा मित्र आणि कुटुंबियांसोबत एकत्र येऊन परंपरा साजरी करण्याचा एक सुंदर सोहळा आहे. तुम्हाला गरब्याच्या लाइव्ह परफॉर्मन्सचा आत्मिक अनुभव आवडत असो किंवा हाय-एनर्जी फ्यूजन गाण्यांवर नाचण्याची उत्सुकता असो, 'गरबा नी गूज' या कॅम्पेनअंतर्गत बुकमायशो ने तुमच्यासाठी खास कार्यक्रम निवडले आहेत. हे अभियान ठिकाण, भाषा किंवा जीवनशैली यांच्या पलीकडे जाऊन एकत्र येण्याचा उत्सव साजरा करते. गच्चीवरून रस्त्यापर्यंत, घरांपासून मॉल्सपर्यंत, गरब्याचा आनंद सर्वत्र पसरलेला आहे. एका छोट्याशा पाऊलाने किंवा एक टाळीने सुरू होणारे हे नृत्य लवकरच एक लयबद्ध सोहळ्यात बदलते, जे सर्वांना एकत्र आणते. गरब्याची खरी जादू या लयबद्ध स्पंदनांमध्ये दडलेली आहे, जिथे आनंदाची 'गूंज' (प्रतिध्वनी) जिथे जिथे मनं नाचण्यासाठी आणि आनंद साजरा करण्यासाठी एकत्र येतात, तिथे तिथे अनुभवता येते.

## मोहित मलिक दिसणार भगवान शिवाच्या भूमिकेत

सर्व पिढ्यांच्या प्रेक्षकांना आवडतील अशा प्रभावी कथा सादर करण्याबद्दल सोनी सब वाहिनी ओळखली जाते. ही वाहिनी आता भारतीय टेलिव्हिजनवरील अत्यंत भव्य पौराणिक मालिका घेऊन येत आहे- 'गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय'. सर्वात शक्तिशाली आणि दिव्य देवांच्या परिवाराची महान गाथा ही मालिका सादर करेल. ही मालिका प्रामुख्याने भगवान शिव, देवी पार्वती आणि त्यांची मुले गणेश आणि कार्तिकेय यांच्या माहीत नसलेल्या कथा सादर करेल. मालिकेच्या मुळाशी माता-पित्याची सुजाणता, दोन भावांचा प्रवास आणि कुटुंबाच्या भावना आहेत. हे असे कुटुंब आहे, ज्याचा संघर्ष आजही घराघरात दिसतो.

## सोनी सबवरील 'उफ्फ ये लव है मुश्किल...' मालिकेत युगची कुचंबणा

मुंबई : भावना, नाट्य आणि युग (शब्बीर अहलूवालिया), कैरी (आशी सिंह) आणि लता (रिद्धिमा पंडित)च्या नात्यातील गुंतागुंत यामुळे सोनी सबवरील 'उफ्फ ये लव है मुश्किल ...' मालिकेने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. अलीकडच्या भागांमध्ये, युगची आई माईरी (सुप्रिया शुक्ला) शस्त्रक्रियेनंतर आपल्या समस्त कुटुंबाला एकत्र करते आणि युगची पूर्वीची पत्नी लता हिला पुन्हा युगसोबत गृहप्रवेश करायला सांगते. आगामी भागांमध्ये, युग दोन स्त्रियांच्या ओढाताणीत सापडलेला दिसेल. एकीकडे लता आहे, जिला माईरी पुन्हा पुन्हा युगकडे ढकलते आहे, तर दुसरीकडे कैरी आहे, जी प्रत्येक वादळात युगच्या कुटुंबाच्या बाजूने खंबीरपणे उभी राहिली आहे. स्वतः स्त्रीद्वेष्टा असलेला युग कैरीची मूक ताकद आणि तिने दिलेला आधार पाहून भारावून गेला आहे.

## भारतातील पहिले सी-फेसिंग अल्ट्रा-लक्झ़री होम्स - रोहन मरीना वन

मुंबई - उद्योगात ३२ वर्षांहून अधिक काळाचा वारसा निर्माण करणाऱ्या भारतातील सर्वात विश्वासार्ह आणि दूरदर्शी रिअल इस्टेट डेव्हलपर्सपैकी एक, रोहन कॉर्पोरेशन अभिमानाने - रोहन मरीना वन - भारतातील पहिल्या निवासी प्रकल्पाची घोषणा करत आहे जिथे प्रत्येक घराला अरबी समुद्राचे अखंड दृश्य दिसेल. मंगळुरूच्या सुरथकल येथील शुद्ध एनआयटीके बीच रोडवर धोरणात्मकदृष्ट्या स्थित, हा अग्रगण्य प्रकल्प किनारी लक्झरी जीवनशैलीची पुनर्परिभाषा करण्यासाठी आणि भारतातील घर खरेदीदारांसाठी सर्वोच्च गुंतवणूक पर्याय बनण्यासाठी सज्ज आहे. ८.२ एकरांवर पसरलेल्या, रोहन मरीना वनमध्ये ४३३ अल्ट्रा-लक्झरी घरे आहेत जी दोन प्रतिष्ठित टॉवर्समध्ये आहेत - द रिट्रीट आणि द रिसॉर्ट. अतुलनीय आराम, परिष्कृतता आणि अनन्यता देण्यासाठी डिझाइन केलेले. समुद्रासमोरील आकर्षक घरे, जागतिक दर्जाच्या सुविधा आणि शांत वातावरणासह, हा प्रकल्प शांतता, हिरवळ आणि दीर्घकालीन, शाश्वत गुंतवणूक शोधणाऱ्यांसाठी डिझाइन केला आहे.

## नॅशनल उर्दू शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



सिल्लोड : शहरातील नॅशनल उर्दू हायस्कूलमधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा रविवारी उत्साहात पार पडला. नॅशनल चे माजी विद्यार्थी ३० वर्षांनंतर एकत्र आले. या प्रसंगी सेवानिवृत्त शिक्षकांनाही आमंत्रित करण्यात आले होते. १९९४ - ९५ या शैक्षणिक वर्षातील दहावी इयत्तेचे माजी विद्यार्थी या स्नेहमेळाव्यास उपस्थित होते. विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांसह मेळाव्यास उपस्थित राहून आनंद द्विगुणीत केला. याप्रसंगी अनेक विद्यार्थी व शिक्षकांनी जुने आठवणींना उजाळा दिला. शिक्षकांनीही सर्व विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले. ३० वर्षांच्या आठवणी आणि सोनेरी क्षणांचे आदानप्रदान करण्यात आले आणि भूतकाळातील सुंदर अनुभव कथन करण्यात आले. या बॅचचे सर्व विद्यार्थी त्यांच्या जीवनकार्यात कुठे ना कुठे यशस्वीपणे कार्यरत आहेत. स्नेहमीलन प्रसंगी उपस्थित माजी विद्यार्थ्यांमध्ये आजम पठाण, आजम देशमुख, अख्तर बागवान, हारून बागवान, शेख इरफान, शेख फिरोज,तबरेज पठाण, शमशेर पठाण, इरफान कुरेशी, सय्यद शकील, शेख शकील, शेख अल्ताफ, डॉ. इरफान, शेख कलीम, अब्दुल राजीक, साबीर कोतवाल, शेख अकील, शेख कलीम, मोहसीन पठाण, सय्यद इरफान, शमशेर कोतवाल, शेख मुख्तार, शेख मेहबूब, शेख मुजीब, मुजीब खान, इस्माईल खान, सय्यद मोईज, शेख बिबन, खलील खान, शेख शकील, आसिफ खान, सय्यद मतीन, सय्यद जहूर, सय्यद जमीर, शेख शाहिद, अजीम बेग, शेख खलील, कदीर खान, शेख अनीस, शेख खलील, कदीर शेख इक्बाल खान यांचा समावेश होता. माजी प्राचार्य इक्बाल खान, मोहम्मद मुख्तार, शेख इलियास, माजी क्रीडा शिक्षक प्रा. मन्सूर कादरी, शिक्षक शेख शफी आणि शेख बिस्मिल्लाह यांनी आपले विचार व्यक्त केले.

# प्रशांत बंब यांच्या, मार्गदर्शनाखाली बांधकाम कामगारांना संसार उपयोगी साहित्य वाटप

खुलताबाद प्रतिनिधी सतोष करपे खुलताबाद गंगापुर तालुक्यातील बांधकाम कामगारांसाठी लासुर स्टेशन येथील (श -ज्ञूल गृह उपयोगी साहित्य नोंदणी) कॅम्प आयोजित करण्यात येत आहे. यात तालुक्यातील तब्बल पाच हजार ६०० बांधकाम कामगारांना बांधकाम उपयोगी संचाची नोंदणी करून त्यांना संच वाटप करण्यात आले आहे.

गृह उपयोगी संच मिळण्यासाठी नोंदणी केलेल्या दहा हजार बांधकाम कामगारांना व नवीन नोंदणी केलेल्या शेवटच्या लाभार्थ्यांना संच देण्यात येणार असल्याचे माहितीही आमदार बंब यांच्या वतीने देण्यात आली.

दि २५ ऑगस्ट ते १० सप्टेंबर पर्यंत नवीन आणि जुन्या नोंदणीकृत अशा पाच हजार ६०० इमारत बांधकाम कामगारांची



आमदार बंब यांच्या मार्गदर्शनाखाली गृह उपयोगी संचासाठी नोंदणी करण्यात येऊन ज्या बांधकाम कामगारांना आजपर्यंत संसार उपयोगी साहित्य नाही मिळाले अशा लाभधारकांची या पंधरवड्यात नोंदणी करून गृह उपयोगी संच वाटप करण्यात आले आहे.

यापुढेही दि.११ ते १७ सप्टेंबरपर्यंत व त्यापुढी सुरूच असणार असून नवीन आणि नोंदणीकृत सर्वच चलन पावती ऍक्टिव्ह असलेल्या लाभधारकांची गृह उपयोगी साहित्यासाठी नोंदणी करून त्याच दिवशी हा गृह उपयोगी साहित्य संच वाटप करण्यात येत सल्याने लाभदारकांच्या चेहेऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसत आहे. आगामी काळात नवीन आणि जुन्या बांधकाम कामगारांना आत्तापर्यंत संसार उपयोगी साहित्य संच नाही मिळाला अशा नोंदणीकृत कामगारांना गंगापुर. खुलताबाद तालुक्यातील. टप्याटप्याने नोंदणी करून संच देण्यात येणार असल्याचे आ प्रशांत बंब यांनी सांगितले.

# कृषिमंत्री दत्ता भरणे यांची अब्दुल सत्तार यांनी घेतली भेट

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.९, माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांनी आज मंत्रालयात कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची त्यांच्या दालनात भेट घेऊन सिल्लोड -सोयगाव मतदारसंघासह जिल्ह्यातील कृषी विभाग अंतर्गत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करून याबाबत सदरील विषय मार्गी लावण्यासाठी निवेदन दिले.

सिल्लोड तालुक्यातील लिहाखेडी - पालोद येथे मंजूर असलेल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत मंजूर कृषी महाविद्यालयात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासह, शैक्षणिक सुविधांची



पूर्तता करण्यासाठी वर्ष २०२५ - २६ साठी १ कोटी ९० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देणे त्यासोबतच येथे प्रशासकीय इमारत व इतर आनुषंगिक कामांकरिता निधीची उपलब्धता करणे, सदरील महाविद्यालयात पदमान्यता देवून सदरील महाविद्यालयात पद निर्मितीचा आदेश निर्गमित करणे, तसेच छत्रपती संभाजीनगर येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत उपसंकुल स्थापन करणे, छत्रपती संभाजीनगर येथील राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प येथे जैविक औषधे प्रयोग शाळा इमारत बांधकाम साठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करणे यासंदर्भात आमदार अब्दुल सत्तार यांनी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासोबत चर्चा करून सदरील प्रश्न तातडीने मार्गी लावणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच यासंदर्भात त्यांनी मंत्री भरणे यांना निवेदन देखील दिले आहे.

याबाबत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सकारात्मक भूमिका घेत सदरील विषय मार्गी लावण्यासाठी तातडीने कार्यवाही करून याबाबतचे परिपूर्ण प्रस्ताव करण्याचे निर्देश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. यावेळी कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद रस्तोगी यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा उत्साहात संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१२ सप्टेंबर

जिल्हा क्रीडा अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा तालुका क्रीडा संकुल येथे दि.११ व १२ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या स्पर्धांचे उद्घाटनप्रसंगी संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे यांच्या हस्ते करण्यात आले.उद्घाटन प्रसंगी डॉ. सैरास तडवी,डॉ.सुशील जावळे,डॉ. निलेश गावडे,राहुल चौधरी,दीपक बनकर,प्रा.शेख तोफिक,तोफिक पठाण,नावेद शेख,सोहेल शिकलकर, प्रा.संदीप निकम,प्रा.मोरे सर,प्रा. साबळे दादु श्रीखंडे,भूषण पवार आदी



मान्यवर उपस्थित होते.यावेळी पंच, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धांमध्ये १०० मीटर,२००मीटर,४०० मीटर,८०० मीटर,१५०० मीटर धावणे,३ कि.मी. चालणे,३ कि.मी.पडणे,गोळाफेक, भालाफेक,थाळीफेक,तिहेरी उडी (ट्रिपल जंप) आदी स्पर्धांचा समावेश होता.सकाळी १० वाजल्यापासून ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत या सर्व सामने मोठ्या शिस्तबद्ध व उत्साहात पार पडले.या स्पर्धांमध्ये तालुक्यातील तब्बल २७० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यासाठी डॉ.निलेश गाडेकर,क्रीडा विभाग प्रमुख,संत ज्ञानेश्वर महाविद्यालय यांनी विशेष परिश्रम घेतले व मार्गदर्शन केले.

या स्पर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई व तालुका क्रीडा अधिकारी मुकुंद वारकर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे संपन्न झाल्या.

# वेताळवाडी किल्ल्यावरील ती तोफ अखेर जय मातादी फाउंडेशन गलवाडा टीमच्या साह्याने नियोजित जागेवर

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१२ सप्टेंबर

सोयगाव-हळदा रोड वरील वेताळवाडी किल्ल्यावर मागील आठवड्यात काही पर्यटक तरुणांनी हुल्लडबाजी करत पंचधातूची तोफेची नासधूस केली होती.त्यात एका तरुणाचा पाय तोफे खाली चिरडून चेंदामेंदा झाला होता.

सोयगाव वन विभागाचे कर्मचारी संजय इंगळे यांनी जय मातादी फाउंडेशन गलवाडा प्रमुख अमोल मंडवे व योगेश इंगळे यांना फोन करून ती ढासवलेली तोफ पूर्वत जागीच बसवण्याकरिता आपल्या जय मातादी फाउंडेशनच्या तरुण व समाजसेवका कडून मदत व्हावी अशी विनंती केली होती.त्यांनी हो सांगून आपले कर्तव्य समजून



सदर ती तोफ नियोजित जागेत त्यांच्या हस्ते बसवण्यात आली.

यावेळी गलवाडा ग्रामपंचायत सदस्य भगवान तायडे,राहुल सोनवणे, भिकन जोहरे,विनोद इंगळे,राजेंद्र इंगळे,अंकुश पाडाळकर,पवन जाधव, गोपाल जंजाळ,प्रवीण गवळे,आकाश परमेश्वर इंगळे,अंकुश तायडे,आदि जय मातादी फाउंडेशनचे सर्व सदस्य व समाजसेवकांनी परिश्रम घेतले.

# स्टार प्रवाहवर नवनव्या मालिकांचा अखंड प्रवाह; १५ सप्टेंबरपासून दोन नव्या मालिका येणार प्रेक्षकांच्या भेटीला

मुंबई : स्टार प्रवाहवर नवनव्या मालिकांचा प्रवाह अखंड सुरु आहे. १५ सप्टेंबरपासून स्टार प्रवाहच्या परिवारात दाखल होत आहेत दोन नव्या मालिका लपंडाव आणि नशिबवान. सध्या दोन्ही मालिकांच्या प्रोमोनी महाराष्ट्राचं लक्ष वेधून घेतलं आहे. स्टार प्रवाहने नेहमीच वेगवेगळ्या आशयाच्या मालिका सादर करण्याचा प्रयत्न केला आहे. लपंडाव आणि नशिबवान या दोन नव्या मालिकांच्या माध्यमातून प्रेक्षकांना नवी गोष्ट आणि नव्या पात्रांना भेटण्याची संधी मिळेल. नुकताच या दोन्ही मालिकांचा लॉन्च सोहळा दणक्यात पार पडला.

नशिबवान ही गोष्ट आहे गिरीजा नावाच्या मुलीची जिच्या आयुष्यात अनेक आव्हानं आहेत. आई-वडिलांचं प्रेम नाही, लहान वयातच आलेली घरची जबाबदारी आणि जगण्यासाठीचा संघर्ष असं खडतर आयुष्य गिरीजाच्या नशिबी आलंय. मात्र या कठीण प्रवासात ती नशिबवान आहे याचा उलगडा तिला होतो. गिरीजा नशीबवान का आणि कशी ठरते याची गुंफलेली सुंदर गोष्ट म्हणजे नशीबवान मालिका. कोठारे व्हिजनची निर्मिती असलेल्या या मालिकेत आदिनाथ कोठारे, सोनाली खरे, अजय पूरकर, नेहा नाईक अशी अनेक दिग्गज कलाकार मंडळी आहेत.

आदिनाथ कोठारेसाठी रुद्रपताप ही भूमिका ड्रीमरोल आहे. या भूमिकेविषयी सांगताना आदिनाथ म्हणाला, 'या मालिकेसाठी मी प्रचंड उत्सुक आहे. माझी पहिली दैनंदिन मालिका आहे. गेली अनेक वर्ष मालिका करण्याचा विचार सुरु होता. नशिबाने नशीबवान मालिकेच्या निमित्तानेच हा योग जुळून आला. टीव्ही हे फक्त माझंच नाही तर प्रत्येकाचच आवडतं माध्यम आहे. मालिकेच्या माध्यमातून तुम्ही घराघरात पोहोचता, प्रेक्षकांच्या कुटुंबाचा भाग होता. नशीबवान मालिकेची गोष्ट अतिशय सुंदररित्या गुंफण्यात आलीय. रुद्रप्रताप या भूमिकेला देखिल अनेक पदर आहेत जे हळू हळू उलगडतील.'

आयुष्यातली पहिली वहिली मालिका करताना मनात नेमकी काय भावना आहे हे सांगताना नेहा म्हणाली, 'स्टार प्रवाहसारख्या महाराष्ट्राच्या नंबर वन वाहिनीसोबत आयुष्यातील पहिली मालिका करायला मिळणं हे स्वप्नवत आहे. गिरीजा हे पात्र मी साकारत आहे. प्रचंड हुशार आणि हजरजबाबी असणारी गिरीजा सहसा कोणाला नडत नाही पण कुणी नडलं तर त्याला सोडत नाही. संकटातून मार्ग कसा काढायचा हे तिला लगेच सुचतं. तिचा जीव तिचे बाबा आणि भावामध्ये अडकला आहे. मालिकेत अनेक अनुभवी कलाकार आहेत. या सर्वांसोबत काम करायला मिळणं हा माझ्यासाठी दुग्धशर्करा योग आहे.'

# कृषी विकासाला प्राधान्य देणारे शासन-जयकुमार रावल

### अहिल्यानगर येथे संत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारणार



अहिल्यानगर, दि.१२ - कृषी विकासाला प्राधान्य देणारे हे शासन आहे. राज्यात पणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करण्यात आला असून शेतकरी व ग्राहक यांच्यातील दुवा मजबूत करून थेट विक्रीची व्यवस्था पणन मंडळाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. अहिल्यानगर उपबाजार आवारामुळे शेतकऱ्यांचा माल बाजारपेठेत पोहोचवणे सुलभ होणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी केले. अहिल्यानगर येथे दीड कोटी रुपयांचा संत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. चिचोंडी पाटील येथे अहिल्यानगर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार आवाराचे भूमिपूजन मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार शिवाजी कर्डीले, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, माजी आमदार बबनराव पाचपुते, भानुदास कोतकर, अक्षय कर्डीले, दिलीपराव भालसिंग, अविनाश घुले, सचिन जगताप, भाऊसाहेब घोटे, सुरेंद्र गांधी, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मंगेश सुरवसे, शुभांगी गौंड, हरिभाऊ कर्डीले आदी मान्यवर उपस्थित होते.

मंत्री श्री. रावल म्हणाले, देशात २ हजार ६०० बाजार समित्या असून त्यापैकी सर्वाधिक ३०६ समित्या व ६२१ उपबाजार आपल्या महाराष्ट्रात आहेत. अडीच लाख मेट्रिक टन मालाची विक्री होऊन ८५ हजार कोटी रुपयांचा व्यवहार या माध्यमातून होतो. या बाजार आवारात ६ लाख मेट्रिक टन क्षमतेची १ हजार १६८ गोदामे आहेत. राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून १०८ गोदामे उभारून १ लाख मेट्रिक टन अतिरिक्त साठवण क्षमता निर्माण करण्यात आली आहे. फ्रान्समधील सर्वात मोठ्या बाजार समितीसोबत शासनाने करार केला असून त्यांच्या सहकार्याने जगातील सर्वात मोठी बाजारपेठ -महामुंबई आंतरराष्ट्रीय कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन होणार आहे. या समितीला समृद्धी महामार्ग, वाढवण बंदर व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची जोडणी दिली जाणार आहे. त्यामुळे अहिल्यानगर बाजार समितीमार्फतचा माल देश व विदेशात पोहोचवता येणार आहे.

## श्री मोहटादेवी विद्यालयात आरोग्य विषयक समुपदेशनाचा कार्यक्रम संपन्न



बिडकीन दि १२ सप्टेंबर पैठण तालुक्यातील श्री मोहटादेवी विद्यालय म्हारोळा येथे आरोग्यविषयक समुपदेशनाचा कार्यक्रम संपन्न झाला. ग्रामीण रुग्णालय बिडकीन चे डॉक्टर संजय चोभे, टुगेदर फोर विकास फाउंडेशनचे पंकज धुळे यांनी इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले. एड्स विषयक भ्रामक कल्पना, घ्यावयाची काळजी, एड्स विषयक अपप्रचार, एड्स फैलण्याची कारणे, आणि आपली कर्तव्य, याविषयी सखोल असे समुपदेशन करण्यात आले.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक गवई सुभाष, आभार दीपक कर्डिले यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती ज्योती गायकवाड, सतीश मुखेकर, अंजुम पठाण, शंकर शिरसाठ, बद्री धरपळे यांनी अथक परिश्रम घेतले. प्राचार्य महेश घोरतळे यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## भरदिवसा बिबट्याने उचलून नेले बोकड

फर्दापूर दि १२ - फर्दापूर शिवारात गट नंबर २४२ लगत असलेल्या आगोशा नाल्यातून बिबट्याने भर दिवसा बोकड नेले उचलून गुरूवारी चार वाजता शेळीपालक हे या नाल्याजवळ शेळ्या चारत असताना दाट झाडी मध्ये दडून बसलेल्या बिबट्याने या शेळ्या मधून बोकड उचलून नेले असता शेळ्या जोरात ओरडल्या मुळे शेळीपालकाच्या लक्षात आले त्यांनी पाहिले तर बिबट्याने बोकड उचलून नेले यामुळे या परिसरातील शेतकरी यांच्या मध्ये मोठे भिंतीचे वातावरण पसरले आहे तसेच बुधवारी शिवाजी महाकाळ,सलिम करीम पठाण,उमर खा नवाज खा,आरीप पठाण यांनी सुध्दा बुधवारी रात्री नऊ वाजता पाहिला यामुळे वनविभागाने २२,६२०२२ हा बिबट्या या परिसरातील विहिरीत होता परंतु वनविभागाने याला न पकडता रात्री हुसकावून लावले त्यामुळे हा बिबट्या या परिसरात राहत असुन या सोबत दोन पिल्ले सुध्दा आहेत त्यामुळे वनविभागाने येथे या बिबट्यांचे बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

## नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान : लाखो नागरिकांना मिळणार नवदृष्टीचा लाभ

मुंबई, दि. १२ : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर पासून 'नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान' महाराष्ट्रभर राबविले जाणार आहे. महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी २ ऑक्टोबर पर्यंत चालणाऱ्या या उपक्रमात दहा लाखाहून अधिक नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येणार आहेत.

या विशेष मोहिमेतून मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना मोफत चष्मेवाटप केले जाणार असून काचबिंदूसह इतर नेत्रविकारांवरील निदान, सल्ला आणि उपचार देखील मोफत केले जाणार आहेत.

राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये, तालुका व गावपातळीवर नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. गाव, वस्ती, तांडे, पाडे यांसह दुर्गम भागातील नागरिकांना या शिबिरांचा थेट लाभ होईल. शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालये व संलग्न वैद्यकीय संस्थांकडे पाठवून संपूर्ण मोफत शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येतील.

उपक्रमातील संस्थांचा व्यापक सहभाग

या अभियानात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिका, वैद्यकीय शिक्षण विभाग, नगरपालिका, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, धर्मादाय रुग्णालये, महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, ईएसआयसी रुग्णालये तसेच खासगी नेत्र रुग्णालये व विविध सामाजिक संस्था या उपक्रमामध्ये सहभागी होणार आहेत. या सर्व संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम अधिक व्यापक आणि यशस्वी होणार आहे.

तळागाळातील नागरिकांसाठी मोठा दिलासा

नेत्ररोग उपचाराचा खर्च गरीब नागरिकांच्या खिशाला परवडणारा नसतो. अशा परिस्थितीत ही मोफत शिबिरे गरजू व वंचित घटकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील वृद्ध, शेतकरी, मजूर, महिला व ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळण्याचा मार्ग या उपक्रमातून खुला होणार आहे.या उपक्रमाचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशातूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जात आहे. प्रत्येक गरजू नागरिकांपर्यंत पोहचण्याकरिता सर्व शासकीय यंत्रणा प्रयत्न करत आहे. यामुळे लाखो रूग्णांवर मोफत नेत्र तपासणी आणि शस्त्रक्रियेसह औषधोपचार केले जाणार आहेत. या शिबिराचा लाभ राज्यातील गरजू रूग्णांनी घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

## अग्रलेख...

# आंदोलने, परंपरा आणि प्रतिष्ठा

आधी जनक्षोभाच्या आगीत तेल ओतायचे आणि त्याच्या धगीवर आपल्या राजकीय स्वार्थाची पोळी भाजून घ्यायची, असा क्षुद्र आणि व्यापक देशहितास घातक ठरणारा विचार सध्या भारतातील विरोधी पक्षांतील काही नेत्यांच्या वाणी आणि लेखणीतून पाझरताना दिसू लागला आहे. सार्वजनिक मालमत्तांची हानी करणे, नेत्यांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या जीवितास हानी पोहोचेल असा हिंसाचार माजविणे आणि सर्वसामान्यतः शांततेने जगण्याच्या हक्काची अपेक्षा बाळगणाऱ्या सामान्य माणसाच्या जीवनावर असुरक्षिततेच्या भयाचे सावट फेरणे हे अलिकडच्या आंदोलनांचे काहीसे भयावह रूप जगाच्या अनेक देशांत दिसू लागले आहे. भारताच्या शेजारच्या श्रीलंका, बांगलादेश आणि आता नेपाळमध्ये अशाच सामाजिक असंतोषाचा उद्रेक झाला आणि त्या भडकलेल्या आंदोलनात हे देश अक्षरशः होरपळून गेले. सरकारच्या विरोधात किंवा सत्ताधाऱ्यांच्या धोरणाच्या विरोधात जनमताचा उद्रेक झाला की देशाच्या स्थैर्यालाच नव्हे, तर अस्तित्वालाच धोका निर्माण व्हावा, अशी भीती निर्माण करणाऱ्या या आंदोलनांचे लोण आताशा पसरतच आहे. ते पाहता सत्तासंघर्षाच्या राजकारणाने देशाला वेठीस धरण्याच्या मानसिकतेपर्यंत मजल मारल्याचे दुर्दैवी चित्र देशाला पाहावे लागत आहे. सुदैवाने भारतातील जनतेवर सामाजिक सहिष्णुतेचे पारंपरिक संस्कार आहेत. कोणत्याही प्रकारच्या हक्कांचे लढे लढताना देशाला वेठीस धरण्याची हिंसक व विध्वंसक मानसिकता या समाजात नाही. त्यामुळे भारतातही समाजाने सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरून देशात अराजक माजवावे या सुप्त इच्छेला फारसा थारा मिळणार नाही हे खरे असले, तरी ही मानसिकता आवरली गेली नाही तर अराजकवादी प्रवृत्तींना नवे खतपाणी मिळून त्यांच्या आडून राजकारण करू पाहणाऱ्यांना संधींची दारे किलकिली होण्याची शक्यता असल्याने, समाजाने सावध राहण्याची गरज आहे.

जे बांगलादेशात झाले, तेच त्याआधी श्रीलंकेत झाले आणि नेपाळमध्येही तेच सुरू आहे. याच असंतोषाच्या अचानक उद्रेकास फ्रान्समध्ये तोंड फुटले आहे. सरकारने बजेटमध्ये केलेल्या कपातीविरोधात व फ्रान्सचे अध्यक्ष इम्यॅन्युअल मॅक्रॉन यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी लाखोंचा जमाव रस्त्यावर उतरला आहे. 'ब्लॉक एव्हरीथिंग' असा नारा देत रस्त्यावर उतरलेल्या आंदोलकांचा उद्देश स्पष्ट आहे. फ्रान्सचे अध्यक्ष मॅक्रॉन यांची धोरणे सामान्य जनतेच्या हितास बाधा आणणारी व श्रीमंत वर्गाचे हित जपणारी आहेत, अशी या आंदोलकांची भावना आहे. सरकारने अर्थसंकल्पातील कल्याणकारी योजनांना कात्री लावून सार्वजनिक सुट्ट्या कमी करण्याबरोबरच पेन्शन गोठविणे व सार्वजनिक सेवांमध्ये कपात करणे यांसारख्या प्रस्तावातून नवे आर्थिक धोरण अंमलात आणावयाचे ठरविले आहे. या धोरणात सामान्य माणूस आणि श्रमजीवी वर्गाच्या हिताकडे सरकारचे दुर्लक्ष होत असून या वर्गास वाऱ्यावर सोडण्याची सरकारची नीती असल्याने समाजातील मोठ्या वर्गाचे जगणे असुरक्षित आणि खडतर होणार असल्याची जनतेची भावना आहे. वाढती सामाजिक विषमता, कामगार वर्गाची उपेक्षा, तरुणांमधील बेरोजगारीच्या समस्येबाबत उदासीनता आणि आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक सुविधांचा अभाव अशा अनेक समस्यांनी देश गांजलेला असतानाच, गेल्या पाच वर्षांत वारंवार सरकारमध्ये झालेल्या नेतृत्वबदलामुळे फ्रान्समध्ये अस्थिरता माजली आहे. अशा परिस्थितीत सरकारी यंत्रणांचे नाक दाबून तोंड उघडण्याची दबाव नीती वापरून सुरू झालेल्या या आंदोलनामुळे एकूणच जगाच्या कानाकोपऱ्यात सुरू असलेल्या असंतोषाच्या वातावरणात तेल ओतून अस्थैर्य माजविण्याकरिता सज्ज झालेल्या राजकीय शक्ती व त्यांच्या सहानुभूतीदारांना सत्तेविरोधातील संघर्षात फायदा उपटण्याची संधी दिसू लागली आहे. फ्रान्समध्ये सुरू झालेल्या आंदोलनांना तेथील डाव्या राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला आहे. दोन प्रमुख कामगार संघटनांनी आंदोलनास बळ देण्याकरिता रस्त्यावर उतरण्याचे जाहीर केले आहे. फ्रेंच राजकारणात नेहमीच संघर्ष आणि असंतोषाचे कारण ठरणाऱ्या अर्थसंकल्पाचे निमित्त करून संघर्षाला खतपाणी घालण्याकरिता राजकीय शक्ती सरसावल्या आहेत.

गेल्या काही वर्षांतील असंतोषातून विध्वंसक उद्रेकापर्यंत पोहोचलेल्या अनेक आंदोलनांमध्ये समाजमाध्यमांची भूमिका आणि या माध्यमाचे महत्त्वाचे स्थान अधोरेखित झाले आहे. समाजमाध्यमांचे वेगवेगळे मंच, निरोप किंवा संवाद साधणाऱ्या आभासी मंचाचा वापर करून असंतोषाची बीजे पेरली जातात; त्याचा झपाट्याने फैलाव होऊन त्याचा उद्रेकही होतो, हे या आंदोलनांच्या शैलीवरून स्पष्ट झाले आहे. फ्रान्सच्या जनतेमध्ये याआधीही अर्थसंकल्पातील कपातीच्या विरोधात उफाळलेल्या आंदोलनांच्या व त्यातून उसळलेल्या असंतोषाच्या आठवणी अजून पुसल्या गेलेल्या नाहीत. सामान्यतः आर्थिक आघाडीवर अन्याय झाल्याची भावना बळावलेल्या समाजात असंतोषाची ठिणगी पडली की अशी आंदोलने उभी राहतात; प्रसंगी ती सत्तेची समीकरणेही बदलू शकतात. त्यामुळेच अशा आंदोलनांच्या राजकीय लाभाची गणिते आणि आडाखे बांधून सत्तेविरोधातील शक्ती एकवटतात आणि पक्षभेद वाढून सार्वजनिक दबावाकरिता जनतेचा वापर केला जातो. फ्रान्समधील आंदोलन हे आर्थिक आणि सामाजिक बाबींच्या दीर्घकाळ दबून राहिलेल्या संघर्षातून पेटलेले आहे. सरकारी योजनांच्या खर्चातील कपात, आर्थिक सामाजिक विषमता, सार्वजनिक सेवांचा संकोच आणि समाजहिताकडे होणारे दुर्लक्ष यांमुळे वाढलेल्या सामाजिक व राजकीय अस्थिरतेतून हे आंदोलन सुरू झाले आहे. सहाजिकच जो समाज अशा समस्यांचा सामना करताना मेटाकुटीस आलेला असतो, तेथे सामाजिक न्यायाच्या जाणिवा आणि सार्वजनिक धोरणांच्या चर्चेस तोंड फुटते, हे वास्तव आहे. त्यामुळे कोणत्याही सरकारला समाजहित डावलून सत्ताकारण करता येणार नाही, हा धडा अलिकडच्या सर्वच आंदोलनांनी जगाला दिला आहे. फ्रान्समध्ये याच कारणांतून नाराज असलेला कामगार, विद्यार्थी, शिक्षक, मध्यमवर्गीय असे अनेक समाजघटक या आंदोलनात उतरले आहेत. त्यामुळे सध्या सार्वजनिक वाहतूक, शिक्षण संस्था, उद्योग आणि आंतरराष्ट्रीय व्यापारावरही याचा परिणाम दिसू लागला आहेच; पण सत्ताधारी नेतृत्वावर दबाव निर्माण करण्याची आंदोलनाची नीती यशस्वी ठरण्याचीही चिन्हे आहेत. फ्रान्स हा जागतिक स्तरावर दुर्लक्षित करता येणार नाही असे स्थान असलेला देश असल्याने, जागतिक माध्यमांचे आणि अनेक देशांच्या राजकीय वर्तुळाचे तेथील परिस्थितीवर लक्ष आहे. विरोध व्यक्त करण्यासाठी रस्त्यावर उतरणे ही तेथील लोकशाहीची परंपराच आहे. जेव्हा सत्ताधीशांकडून सामान्य माणसाच्या जगण्याच्या अपेक्षांची उपेक्षा होते आणि ज्वलंत प्रश्नांकडे दुर्लक्ष होते तेव्हा समाज रस्त्यावर उतरून आपली ताकद दाखवितो, हा नवा इतिहास अशा आंदोलनांतून निर्माण होत आहे. लोकशाहीमध्ये आंदोलने हा समाजाच्या भावना व्यक्त करण्याचा आणि जाणिवा जिवंत असल्याचे दाखवून देण्याचा सर्वात योग्य मार्ग मानला जातो. मात्र, त्यामध्ये जेव्हा हिंसक, विध्वंसक आणि विद्वेषाचे विष मिसळले जाते, तेव्हा आंदोलनांची प्रतिष्ठा पणाला लागते. भारतात सत्याग्रह आणि जनआंदोलनांची दीर्घ परंपरा आहे. कधी कधी त्यास जातीय, प्रादेशिक रूप प्राप्त झालेले दिसते, पण समानता, हक्क आणि सामाजिक न्याय हा आंदोलनांमागील मागण्याचा गाभा असल्याने त्यास व्यापक पाठिंबा मिळतो आणि सामाजिक संघर्षाच्या घटना सहसा घडत नाहीत. फ्रान्समधील आंदोलनाने सत्ताधाऱ्यांच्या हेतूवर व नेतृत्वाच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उमटविले आहे. लोकशाहीमध्ये आंदोलन हा नकारात्मक भावनांच्या प्रदर्शनाचे नव्हे, तर धोरणात्मक बाबींमधील त्रुटी दूर करून चुका दुरुस्त करण्याचा मार्ग आहे, हे अशा आंदोलनांच्या अनुभवांतून अधोरेखित झाले आहे. लोकांच्या मूलभूत गरजा, अपेक्षा आणि हक्कांची उपेक्षा झाली तर लोकशाहीचा धागा असलेला समाज रस्त्यावर उतरून हक्क मिळविण्यासाठी संघर्ष करतो आणि त्याच्या असंतोषास रस्त्यावरच्या आंदोलनांतून आवाज उमटतो. राजकीय स्थैर्य आणि शाश्वत विकासाचा मार्ग आखताना सामान्य माणूस, उपेक्षित समाजघटक, महिला, शेतकरी, कामगार आणि रोजगारक्षम युवकांच्या अपेक्षांवर लक्ष केंद्रित करून जनहिताच्या योजनांमधून समाधानाच्या जाणिवा जपल्या गेल्या, तर आंदोलनांच्या परंपरांची प्रतिष्ठा राखता येते. लोकांना न्याय, समानता, आर्थिक स्थैर्य आणि विकासासोबतच सुरक्षित भविष्य हवे असते. त्याची हमी देणाऱ्यांच्या पाठीशी समाज नेहमी ठामपणे उभा राहतो. भारताने हे गेल्या दहा वर्षांत दाखवून दिलेले असल्याने, अशा आंदोलनांच्या आडून राजकीय स्वार्थ साधू पाहणाऱ्यांचा विरस होणार हे निश्चित आहे.

## प्रासंगिक

ज्येष्ठ विचारवंत विवेक घळसासी

# अभिवादन ...म्हणून समाज मोदींना मानतो



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक ते देशाचे पंतप्रधान इतका मोठा आणि अविश्वसनीय प्रवास करणारे नरेंद्र मोदी अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहेत. जागतिक पातळीवरील मोठ्या, सन्माननीय आणि द्रष्ट्या नेत्यांमध्ये समाविष्ट असणारे हे नाव आहे. त्यांच्या अंगी अनेक गुणांचा समुच्चय आहेच, मात्र इतके असूनही पाय जमिनीवर असणारा नेता आहे. त्यांचे अभिष्टचिंतन करताना बरेच मुद्दे चर्चेत घ्यावे लागतील.

सलग तिसऱ्या वेळी भारताचे पंतप्रधान झालेले श्री. नरेंद्र मोदी अमृतमहोत्सवी वर्षामध्ये प्रवेश करत आहेत. या निमित्ताने देशवासिय त्यांच्या प्रती असलेल्या आपल्या भावना विविध प्रकारे व्यक्त करत आहेत. गेल्या काही काळात आपल्या आसपास घडत असणाऱ्या घटनांच्या पार्श्वभूमीवर श्री. नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व हा देशासाठी भाग्ययोगच म्हणावा लागेल. श्रीलंकेमध्ये झालेले सत्तांतर, पाकिस्तानमध्ये असणारी अस्वस्थता-अनिश्चितता, धुमसणारा बांगलादेश, नेपाळमध्ये सत्ताधाऱ्यांविरोधात नुकतेच उठवले गेलेले रान, म्यानमारमध्ये चिघळलेला हिंसाचार अशा माध्यमातून एका अर्थाने भारतीय उपखंडामध्ये पूर्णपणे सत्तांतराचे कारस्थान वा षडयंत्र शिजत असताना भारत केवळ राजकीयदृष्ट्याच स्थैर्य राखून आहे असे नाही, तर वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये प्रगती करतो आहे. म्हणजेच लोकशाहीला बाधक असणाऱ्या इतक्या घटना अवतीभवती घडत असतानाही भारतामध्ये असणारे स्थैर्य ही विलक्षण समाधानाची बाब असून याचे कारण भारतीयांचे लोकशाहीवर असणारे प्रेम आहेच; त्याचबरोबर नरेंद्र मोदींच्या नेतृत्वामध्ये दिसणारी दूरदर्शिता, कुशलता हे देखील आहे असे वाटते.

अमृतमहोत्सवानिमित्त आपण मोदी यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करतो तेव्हा लक्षात येते की, गेली सुमारे ३९ वर्षे ते राजकारणात आहेत. १९८६-८७ च्या दरम्यान ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघातून भारतीय जनता पक्षामध्ये आले. संघाचे स्वयंसेवक असताना आणि त्याही आधी त्यांचा व्यक्तिगत कल आणि जीवनाविषयीचे वर्तन त्यागाचे, फकिरीचेच राहिले आहे. त्यांची वृत्ती संन्यास, विश्वस्त स्वरुपाचीच आहे. अशा मानसिकतेमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या नि:स्वार्थ आणि 'राष्ट्र सर्वतोपरी' मानणाऱ्या संघटनेशी त्यांचा संबंध आला. संघाचे प्रचारक म्हणून काम करताना ते देशाच्या कानाकोपऱ्यात गेले, राहिले. त्यांचा हिमालय वा भारतीय तीर्थक्षेत्रातील प्रवास काहीसा गूढ आहे. पण त्याचा फार विचार न करता बघायचे तर सार्वजनिक जीवनात वावर सुरू झाल्यानंतर लोकांनी घेतलेले त्यांचे अनुभव ऐकता समजते की, त्यांनी स्वत:विषयी म्हटलेले वाक्यच त्यांची खरी ओळख आहे. श्री. मोदी म्हणतात, 'मै क्या... मै तो फकिर हूं. कंधेपे झोला लटकाके निकल जाऊंगा...!' अशी मानसिकता असणाऱ्या माणसामध्येच लोकांचा विश्वास जिंकण्याची आणि स्थैर्य निर्माण करण्याची विलक्षण क्षमता आणि शक्ती असू शकते. मोदींमध्ये ती आहे.

नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री झाले तेव्हा जनसामान्यांसाठी अपरिचितच होते. संघाच्या कार्यपद्धतीमधील ही एक विलक्षण बाब असून त्यानुसार संबंधित व्यक्ती व्यासपीठावर आल्याखेरीज ओळखणे शक्य नसते. त्यामुळेच प्रचारक असताना त्यांना जवळून पाहिलेल्या, ओळखणाऱ्या लोकांनाही कधी ते मुख्यमंत्री, पंतप्रधान होतील अशी अपेक्षा असण्याचे कारण नव्हते. संघाचे काम करताना ते अत्यंत साध्या ठिकाणी राहत असत. मुक्कामाला असणारे ज्येष्ठ कार्यकर्ते, प्रचारक यांच्यासाठी चहा करण्याचे, भांडीकुंडी घासण्याचे काम ते करत असत. त्यामुळे २००१ मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड केली गेली तेव्हा लोकांना धक्काच बसला. संघ आणि भाजपाशी परिचित नसणाऱ्या नागरिकांना त्यांच्या निवडीचे आश्चर्य वाटले. मुख्य म्हणजे त्याआधी मोदीजींनी ग्रामपंचायतीची निवडणूकही लढवली नव्हती. अशा वेळी एक माणूस एकदम मुख्यमंत्री होणे ही बाबही वेगळीच म्हणावी लागेल.

२००१ ते २०१४ हा कालखंड गुजरातचे मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी अत्यंत यशस्वी रितीने काम केले आणि या राज्याची सर्वांगीण प्रगती घडवली. त्यानंतरची गेली ११ वर्षे भारताचे पंतप्रधान म्हणून ते काम करत आहेत. ही सगळी कारकीर्द बघून लक्षात येते की, हा माणूस जातो त्या प्रत्येक क्षेत्रामध्ये यशच मिळवतो. निवडणुकीपुरते बोलायचे तर आज तरी भाजपा हा एकमेव असा पक्ष आहे, जो एखादी सहकारी संस्थेची निवडणूक असली तरी लोकसभेची निवडणूक असल्यासारख्या ताकदीने आणि गांभीर्याने लढतो. हरणे-जिंकणे हा एक भाग झाला, मात्र ही तयारी महत्त्वाची असते. उपराष्ट्रपतीपदासाठी झालेल्या ताज्या निवडणुकीमध्ये विरोधकांची काही मते बाद झाल्याचे आपण पाहिले. हे गृहपाठ नीट नसल्याचेच दर्शवते. मात्र अशा त्रुटी दूर करण्यासाठी मतदारांकडून अभिरुप मतदान करवून घेणे, प्रशिक्षण देणे हा भाजपाचा स्वभावच आहे. यातून पक्षाची शिस्त आणि गांभीर्य कळते. यामागे नरेंद्र मोदी यांचा आग्रह, मार्गदर्शन असल्याचेही दिसते. त्यांच्या एकूणच वागण्यामध्ये एक जादू पाहायला मिळते. त्यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण प्रभावी आहे. म्हणूनच यशामागे त्यांच्या या व्यक्तिमत्वाचा किती वाटा आहे, याचा विचार खरे तर व्हायला हवा. तो वर्ल्ड इकॉनॉनिक फोरमचे संस्थापक प्रो. क्लॉस श्वाब यांनी केला.

प्रो. क्लॉस श्वाब हे गृहस्थ गेली ४५ वर्षे जगातील मान्यवर नेत्यांना भेटत असून त्यांचा अभ्यास करत आहेत. यातून हे लोक एवढे श्रेष्ठ नेते कसे होतात, या प्रश्नाचे उत्तर मिळवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. याच हेतूने त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या व्यक्तिमत्त्वाचाही अभ्यास केला आहे. एखादा नेता यशस्वी होण्यामागे काही गुण असतात, हे स्पष्ट करत ते म्हणतात, यशस्वी होण्यामागे संबंधित नेत्याकडे आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचे संदर्भ जाणून घेत परस्परांना जोडण्याची सारासार बुद्धी असावी लागते. तशी ती असेल तर घेतलेले निर्णय फसण्याची, चुकण्याची शक्यता कमी असते. नरेंद्र मोदींकडे ती असल्याचे अनेक पुरावे देता येतील. त्यांच्यातील या गुणांमुळेच आज भारत प्रत्येक क्षेत्रात वेगळी उंची गाठत आहे. आर्थिक क्षेत्रात डिजिटल प्रशासनासारख्या नव्या आणि अशक्य वाटणाऱ्या गोष्टी मोदींनी करुन दाखवल्या आहेत.

सर्वसामान्यांना मार्ग दाखवण्यासाठी नेत्याकडे होकायंत्रासारखी क्षमता असायला हवी, हा दुसरा मुद्दा श्वाब यांनी मांडला आहे. त्यांच्या मते, मूल्य आणि दृष्टीमधून एखाद्यामध्ये ही क्षमता येते. यातच ते भारतीय चतन परंपरेशी संबंधित असणारा आणखी एक पैलू दाखवून देतात. त्यांच्या मते, सत्व आणि चैतन्य व्यक्तीमधील मुल्यांना बळ देत असते आणि मोदींकडे ते आहे. यशस्वी होण्यासाठी नेत्याकडे खंबीरपणा आणि त्याच वेळी सहृदयता असण्याचा आणखी एक मुद्दा ते मांडतात, कारण हेदेखील यशाचे गमक असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. खेरीज त्यांच्याकडे सगळ्यांशी समानतेने वागण्याचा आणि सतत नवनवीन शिकत राहण्याचा विचार असायला हवा, असे ते म्हणतात. मोदी इथेही कमी पडत नाहीत, कारण आज ७५ व्या वर्षीही कोणी त्यांना एखादा नवीन प्रयोग दाखवला तर अगदी लहान मुलाच्या उत्सुकतेने संबंधिताचे म्हणणे ऐकून घेताना दिसतात. दुसरीकडे ते सहृदयी आहेत. अलिकडेच पूरस्थितीची पाहणी करण्यास गेले असताना त्यांचे भावूक होणे आपण पाहिले. तेव्हा एकीकडे हा नेता प्रशासनातील चुकीची गोष्ट कठोरतेने नाकारतो, चुकलेल्या लोकांना वठणीवर आणतो तर दुसरीकडे अतिशय संवेदनशील होत जनतेचे प्रश्न हाताळतो. वरिष्ठ, जुन्या, वडिलधाऱ्या नेत्यांसंदर्भातील त्यांच्या निर्णयातही हे दोन पैलू स्पष्ट दिसतात. वाढते वय बघता त्यांनी मुरलीमनोहर जोशी, अडवाणी वा यासारख्या नेत्यांना बाजूला करण्यात ठामपणा आहे पण त्यांच्याविषयी असणारा वडिलकीचा आदर ही सहृदयता आहे.

मोदींकडे कमालीचा संयम आणि सहनशीलता आहे. लोक त्यांच्यावर चिखलफेक करतात, पण ते संयमाने वागतात. विरोधक आपल्या दिशेने भिरकावत असलेल्या दगडांचीच मी संरक्षक भिंत बनवतो, असे ते म्हणतात. मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून काम करत असताना गेल्या २४-२५ वर्षांच्या कालखंडाचा विचार केला तर त्यांच्यावर अत्यंत खालच्या शब्दामध्ये आणि वाईट हेतूने झालेली टीका आपण पाहिली आहे. विदेशी माध्यमांनी वा नेत्यांनी असे करणे एक वेळ समजू शकते, पण मोदींवर टीका करणाऱ्यांपैकी अनेकजण आपल्याच देशातील आहेत. 'मौत का सौदागर' पासून 'चौकीदार चोर है' म्हणत त्यांच्यावर टीका करण्याची एकही संधी विरोधकांनी सोडलेली नाही. इतकेच काय पण, त्यांच्या आईसंबंधी अनुद्गार काढण्याचेही त्यांनी सोडले नाही. मात्र इतक्या शिव्या शांतपणे सहन करुन, एका अक्षरानेही प्रत्युत्तर न देता काम करत राहणारा मोदींसारखा नेता जगाच्या पाठीवर कुठे असेल असे वाटत नाही. असे धैर्य क्वचितच कोणामध्ये असू शकते. त्याचा थोडा भाग आपल्याला देवेंद्र फडणवीसांमध्ये दिसतो. पण 'अरे' ला 'कारे' करण्याच्या माणसाच्या सहज प्रवृत्तीवरही मोदींनी विजय मिळवला आहे. विरोधकांनी न्यायालयाच्या चक्रात अडकवण्यासाठी त्यांच्यावर खोटे खटले भरले. पण मोदी त्यांना पुरुन उरले. त्यांच्यातील हे सगळेच गुण वाखाणण्याजोगे आहेत. अशा या नेत्याला उदंड आयुष्य आणि उत्तम आरोग्य लाभो हीच सदिच्छा.

**- शब्दांकन : स्वाती पेशवे**
**(अद्वैत फीचर्स)**

## वेध

प्रफुल्ल क. व्यास

# गोमातेच्या डोळ्यातले दुखणे

गाय केवळ दूध देणारी जनावर नसून शेती, आरोग्य आणि पर्यावरण या सगळ्याचं मूळ तिच्याशी जोडलं आहे. तिच्यातील पावित्र्य एवढे की तिला धर्मग्रंथांनुसार मातेचा दर्जा मिळाल्याने ती गोमाता ठरली आहे. पण, शहर असो वा गावात कचऱ्याच्या ढिगाऱ्यात अन्न शोधणारी ती गाय! कचऱ्यात उरलेलं जेवण, भाजीपाल्याचे अवशेष याच्याबरोबर पोटात आजपर्यंत प्लॅस्टिक जात होतं; आता तर चक्क खिळेसुद्धा जाऊ लागले. गेल्या आठवड्यात नोंद झालेले वृत्त डोक्याला झिणझिण्या आणणारे आहे. हिमाचल प्रदेशातील उना जिल्ह्यातील बरनोह येथे पशुवैद्यकीय डॉक्टरांनी एका गर्भवती गाईच्या पोटातून २८ किलो प्लॅस्टिक आणि ४१ खिळे काढले. गाईच्या पोटात खिळे आणि प्लॅस्टिक हे आपल्या समाजाच्या, संस्कृतीच्या संवेदनशून्यतेचं जिवंत उदाहरण आहे. आपण गाईला माताच नव्हे तिच्या अंगात ३३ कोटी देवतांचं वास्तव्य मानतो; एवढंच काय, तिच्या दुधाची अमृताशी तुलना करतो. शेण आणि मूत्राला पवित्र मानून पंचगव्याच्या स्वरूपात पूजेत आणि औषधोपचारात वापर करतो. वर्धेतील महात्मा गांधी औद्योगिकरण प्रशिक्षण केंद्र (एमगिरी) येथे पंचगव्यापासून विविध साहित्य तयार केले जाते. त्याचा थेट व्यवसाय करण्याचे प्रशिक्षण देशात पोहोचले आहे. प्राचीन ग्रंथांमध्ये गायीची महती वर्णिली आहे. पवित्र प्राण्याबद्दल आपण दाखवलेली उपेक्षा ही आपल्या परंपरेवरची काळी सावली आहे. वर्धेसारख्या छोट्या जिल्हास्थानावरच नव्हे, तर नागपूरसारख्या उपराजधानीतील चौकाचौकात गायींचे कळप बसलेले दिसतात. सकाळ आणि सायंकाळी गोपालक तिला दोहतात आणि मोकळे सोडून देतात. आमच्या वर्धेचे निसर्ग व प्राणिमित्र आशिष गोस्वामी यांनी गेल्याच आठवड्यात अक्षरश: चिडून गोपालकांना उद्देशून गायीचा वापर दुधापर्यंतच करू नका. तिला बेवारस सोडू नका, असे आवाहन केले. गायीच्या कानात असलेल्या बिल्ल्याहून त्या गायीचा मालक कळतो. त्यामुळे पुढे जाऊन गोपालकावर कारवाई करायला हरकत नाही. वर्धेतच दुसरा एक गोभक्त किशोर सोनी हा जखमी गोमातांसाठी हळहळतच नाही तर त्याच्या डोळ्यात पाणी येतं. तो जखमी गायींवर उपचार करतो आणि गोस्वामी यांच्या 'पीपल्स फॉर ॲनिमल' येथे भरती करतो. येथील ॲड. अनंत साळवे यांनी मध्यंतरी अन्न असलेले प्लॅस्टिक रस्त्यावर टाकू नका, असे समाजमाध्यमावरून आवाहन केले होते. त्याला समाज मनाने कितपत मनावर घेतले हा भाग अलहिदा. गायीला जितकं महत्त्व मिळालं आहे तितकं दुसऱ्या कुठल्याही प्राण्याला नाही. हॉटेलांमागील कचऱ्याच्या ढिगाऱ्यात, कचराकुंडीजवळ किंवा मंदिरासमोर उरलेलं अन्न शोधताना गायी दिसतात. गायीचं आर्थिक महत्त्व अफाट आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश आहे. (गेल्याच महिन्यात अमेरिकेने दुधावर कर लावण्याचा मुद्दा उपस्थित केला) आणि या दुधावर कोट्यवधी लोकांचं पोषण, रोजगार आणि उद्योग उभा आहे. दुधाच्या उद्योगाशिवाय गायीच्या शेणामुळे शेतीला मिळणारं सेंद्रिय खत ही शेतीच्या शाश्वततेची मोठी गरज आहे. आयुर्वेदात गायीच्या दुधापासून, मूत्रापासून आणि शेणापासून औषधं तयार होतात. पंचगव्यावर आधारित उत्पादने आज जागतिक बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जात आहेत. हजारो गोशाळा देशभरात आहेत ज्या रोजगार आणि समाजसेवेची साधनं ठरत आहेत. गायींचं आरोग्यच धोक्यात आलं तर या संपूर्ण आर्थिक साखळीवर संकट येईल. दूध उद्योग, शेती, औषधनिर्मिती आणि ग्रामीण रोजगाराचं नुकसान होईल. हे संकट अचानक आलं नाही तर (पर्यावरणाप्रमाणे) आपल्या निष्काळजी वृत्तीने निर्माण केलं आहे. आपण अन्न प्लॅस्टिकमध्ये बांधून टाकतो. फुलं, प्रसाद, हार याच पिशव्या फेकतो. हॉटेलमध्ये उरलेले अन्न पॉलिथिनसह रस्त्यावर सोडतो. गायी ते खातात. गायीच्या पोटात खिळे आणि प्लॅस्टिक सापडणं ही फक्त तिची शोकांतिका नाही तर आपल्या धर्माची, आपल्या समाजाची शोकांतिका आहे. आपण तिला माता म्हणतो, तिला नमस्कार करतो. पण, तिचं संरक्षण करण्याची जबाबदारी घेत नाही. गोमातेच्या डोळ्यातलं दु:ख पाहून आपण जागं झालं पाहिजे. तिच्या पोटातला कचरा बाहेर काढणं हे डॉक्टरांचं काम असलं, तरी तो आत पोहोचू न देणं ही जबाबदारी आपली आहे. सोबतच ती कत्तलखान्यात जाऊ न देणे ही चळवळ रुजवण्याची गरज आहे. पण, आम्ही आमच्या सवयीचे गुलाम. गोमातेला नमस्कार करून होणार नाही, तर तिच्या पोटात चाऱ्याशिवाय दुसरं काही जाणार नाही, याची शपथही घेण्याची वेळ आली आहे.

९८८१९०३७६५

### लेखनाची मार्गदर्शक सप्तपदी

चौसष्ट कलांपैकी लेखनकला ही एक समृद्ध कला आहे. आपले लेखन समृद्ध व्हावे असे प्रत्येक लेखकाला मनापासून वाटत असतेच. अशांना श्रीरंग हिर्लेकर यांचा प्रबंधाची बीजे या सदरातील परिणामकारक लेखनाची सप्तपदी हा उत्कृष्ट मार्गदर्शन करणारा लेख भावला. लेखन कसे करावे याचा समग्र विचार यात केला आहे जो भावी लेखकांना उपयुक्त आहे हे निश्चित. वास्तविक, बोलण्यापेक्षा लिहिणे सोपे आहे. लेखन करण्यापूर्वी त्या विषयाचा अभ्यास असावा. लेखनात सातत्य असेल तर आपोआपच लेखनकला समृद्ध होत जाते. आपण काय लिहितो हे विचार करून योग्य पद्धतीने मांडले पाहिजे. लेखन करताना त्या ओघात विषय भरकटू नये याची दक्षता घ्यायला हवी. आकर्षक शीर्षक अतिशय महत्वाचे आहे. त्यामुळे वाचक त्या विषयाकडे सहज आकर्षित होतात.

लेखनाची भाषा क्लिष्ट असेल तर त्याकडे दुर्लक्ष होते हा आपला अनुभव आहे. म्हणूनच सहज, साध्या, सोप्या शब्दांत लेखन केले पाहिजे. म्हणजे वाचक वर्ग सहज वाढतो. कृत्रिमता असेल तर ते मनाला स्पर्श करत नाही हे वास्तव आहे. वाचक जे काही वाचतो त्याचा प्रभाव त्याच्या लेखनावर पडतो आणि अनुकरण केले जाते पण अनुकरणाने त्यात सारखेपणा येतो. वाचकांना नेहमी काही तरी वेगळे हवे असते. विषयानुसार वाचक वर्गही भिन्न भिन्न असतो. अशावेळी वाचक वर्ग कसा आहे हे बघून लेखन केले तर ते जास्तीत जास्त वाचकांना आनंद देणारे ठरेल. लेखनात भाषाशुद्धी, व्याकरण हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे.

आपले लेखन सुगम आणि प्रभावी होण्यासाठी ही लेखनाची सप्तपदी अनमोल मार्गदर्शन करणारी आहे. लेखन हा एक उत्तम छंद आहे. लेखनातून आपले व्यक्तिमत्त्व स्पष्टपणे दिसून येते .लेखनाचा ध्यास असेल तर त्यातून यश निश्चित मिळते हा विश्वास या लेखातून मिळाला. शाळा, महाविद्यालये, कार्यालय कोणत्याही क्षेत्रात लेखनातून मन जिंकता येते. आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे आणि लेखनाच्या माध्यमातून आपले एक वेगळे स्थान निर्माण करणे शक्य आहे. आपले लेखन ही भविष्यात आपली एक ओळख होऊ शकते. प्रयत्न केला तर लेखनकला विकसित करता येते हे निश्चित.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

## वाचक पत्रे

### लोकप्रतिनिधींचा जनसंपर्क कमी होत आहे का?

आजच्या बदलत्या राजकीय वातावरणात एक गंभीर निरीक्षण दिसून येत आहे लोकप्रतिनिधी आणि जनतेतील संवाद व लोकसंपर्क हळूहळू कमी होत चालला आहे. पूर्वीचा काळ वेगळे होते. गावातील, शहरातील नेते हे सकाळ-संध्याकाळ सामान्य जनतेमध्ये वावरत, चौकशी करत, समस्या ऐकत. शहरी ग्राम सभेत किंवा बैठकीत लोकप्रतिनिधी थेट लोकांसमोर बसून त्यांची मते ऐकत असत. त्यामुळे जनतेत एक आपुलकीची भावना निर्माण होत असे. परंतु आता परिस्थिती वेगळी आहे. जनतेशी थेट संवाद कमी होत आहे. निवडणुकीच्या काळातच प्रचाराद्वारे मतदारांशी भेट होते, पण त्यानंतर हळूहळू संपर्क कमी होतो. प्रत्यक्षात लोकांमध्ये जाण्यापेक्षा ऑनलाईन पोस्ट आणि फोटोवरच लोकप्रतिनिधींचा भर दिसतो प्रतिनिधींपर्यंत पोहचणं कठीण होत चालले आहे. यामुळे नागरिकांना आपले प्रश्न ऐकून घेणारा कोण आहे? असा प्रश्न पडतो. प्रत्येक शहरी ग्रामीण वॉर्डात नियमित जनसंपर्क शिबिरे घेणे, सोशल मीडियापेक्षा प्रत्यक्ष भेटींना जास्त महत्त्व देणे, तक्रारींचे तातडीने निवारण करणारी हेल्पलाईन जनसंपर्क कार्यालये सुरू करणे आवश्यक आहे. लोकशाही बळकट होण्यासाठी लोकप्रतिनिधींचा लोकांशी असलेला दुवा सतत मजबूत राहणे अत्यावश्यक आहे. अन्यथा जनता आणि प्रतिनिधी यांच्यातील हा तुटलेला दुवा भविष्यात लोकशाहीसाठी धोक्याचा इशारा ठरू शकतो.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

### सर्वपित्री अमावास्येचे महत्त्व

सर्वपित्री अमावास्येच्या दिवशी पितर आपापल्या वंशजांच्या घरी येतात. मृत्यूनंतर त्यांना वायुरूप प्राप्त झालेले असते. त्यांचा संचार चालू असतो पण ते आपल्याला दिसत नाहीत. ज्याप्रमाणे वाहणारा वारा वायुरूप असतो पण तो आपल्याला दिसत नाही, त्याप्रमाणे पितर वायुरूप असल्यामुळे आपल्याला दिसत नाहीत सर्वपित्री अमावास्येच्या दिवशी आपापल्या वंशजांच्या घरी आल्यावर वंशजांनी त्यांच्यासाठी अन्न-पाणी ठेवले आहे का? हे ते पितर पाहतात. कारण सर्वपित्री अमावास्या हा एकच दिवस असा आहे की, त्यादिवशी सर्व पितर घरी येतात. ज्यांना आपल्या पितरांच्या मृत्यूची तिथी, महिना आणि दिनांक माहीत नसेल ते वंशज या दिवशी श्राद्ध करून पितृऋणातून मुक्त होऊ शकतात. सर्वपित्री अमावास्येच्या दिवशी पितरांना सूर्यास्तापूर्वी भोजन द्यावे. जर पितरांना त्यादिवशी अन्न-पाणी मिळाले नाही तर ते निराश होऊन निघून जातात. कारण ते अन्न आणि पाण्यासाठी व्याकुळ झालेले असतात. सर्वपित्री अमावास्येच्या दिवशी एक ब्राह्मण जेवायला घालावा. जर हे शक्य नसेल तर कावळ्यांना केळीच्या पानावर घास ठेवावा किंवा पत्र्यावर दहीभात ठेवावा. सर्वपित्री अमावास्येच्या दिवशी श्राद्ध करण्याची संधी धर्माने सर्वांना उपलब्ध करून दिली आहे.

**प्रकाश जोशी**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# पत्नीने केलेल्या बेदम मारहाणीत पतीचा मृत्यू

## अंबाजोगाईतील खळबळजनक घटना

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१२ सप्टेंबर**

अंबाजोगाईत : कौटुंबिक वादातून पत्नीने पतीला लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीत अवघड जागी मार लागल्याने पतीचा मृत्यू झाला. ही घटना अंबाजोगाई शहरातील क्रांतीनगर भागात बुधवारी (दि. १०) घडली. याप्रकरणी पत्नीवर अंबाजोगाई शहर ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.




कैलास सरवदे (वय ३७, रा. क्रांतीनगर, अंबाजोगाई) कैलास सरवदे (वय ३७, रा. क्रांतीनगर, अंबाजोगाई) असे त्या मृत पतीचे नाव आहे. कैलासची बहिण ज्योती तरकसे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, फिर्यादीच्या तक्रारीनुसार, कैलास सरवदे याचे लग्न सात वर्षांपूर्वी माया हिच्याशी झाले होते. माया हिचे हे दुसरे लग्न असून पहिल्या पतीपासून तिला दोन मुली तर कैलासपासून एक मुलगा आणि एक मुलगी आहे. कैलास हा शरीराने अपंग आणि दारू पिण्याच्या सवयीचा असल्याने त्याच्यात व माया यांच्यात नेहमी वाद होत असत. माया ही कैलास याला नेहमी उपाशी ठेवत असे. १० सप्टेंबर रोजी दुपारी अडीच वाजताच्या सुमारास कैलास हा दारू पिऊन घरी आल्यावर दोघांत पुन्हा वाद झाला. माया हिने संतापाच्या भरात कैलासला खाली पाडून पोटावर व अवघड जागी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. घरच्यांनी व शेजाऱ्यांनी वाद सोडवण्याचा प्रयत्न केला असता माया हिने हस्तक्षेप करू नका, दररोज हा दारु पिचुन असाच करतो मी याला फुकट सांभाळायचे का असे म्हणत त्यांनाही शिवीगाळ केली. त्यानंतर काही वेळाने कैलास घराशेजारी बेशुद्ध पडलेला दिसला.

नातेवाईकांनी त्याला ऑटोरिक्षाने सरकारी नातेवाईकांनी त्याला ऑटोरिक्षाने सरकारी दवाखान्यात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. सुरुवातीला मृत्यू दारूच्या अतिसेवनामुळे झाला असा समज होता. मात्र दुसऱ्या दिवशी ११ सप्टेंबर रोजी झालेल्या शवविच्छेदन अहवालात कैलासचा मृत्यू मारहाणीत अवघड जागी झालेल्या गंभीर दुखापतींमुळे झाल्याचे स्पष्ट झाले.या माहितीवरून कैलास याची पत्नी माया सरवदे हिने जाणूनबुजून पतीवर घातक मारहाण करून त्याचा मृत्यू घडवून आणल्याचा आरोप फिर्यादीतून करण्यात आला आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात माया सरवदे हिच्यावर बीएनएस कलम १०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पीएसआय रविकुमार पवार करत आहेत.

# घरफोडी प्रकरणातील आरोपी अटक

## बीड शहर पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ सप्टेंबर**



बीड शहर पोलिसांनी पुन्हा एकदा उत्कृष्ट कामगिरी करत घरफोडी व दागिने चोरी प्रकरणातील आरोपीला अटक केली आहे. घटना अशी होती की, बीड शहर मधील पिंगळे गल्लीतील रहिवासी धनराज गुरखुदे हे त्यांच्या पत्नीच्या उपचारासाठी कुटुंबासह छ.संभाजीनगर येथे गेले होते. त्या काळात घराला कुलूप लावून ते बाहेर गेले असताना, अज्ञात चोरट्याने घराची कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला व घरातील सोने-चांदीसह मौल्यवान वस्तू चोरी केल्या.

ही गंभीर घटना घडल्यानंतर पोलीस ठाणे बीड शहर येथे फिर्यादी मार्फत गुन्हा दाखल झाल्यावर पोलिस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी तात्काळ तपास गतीमान करण्याच्या सूचना बीड शहर पोलिसांना दिल्या. तपासादरम्यान तांत्रीक माहिती आणि गुप्त माहितीच्या आधारे संशयित हा स्थानिक रहिवाशी शिवा नंदलाल गुरखुदे असल्याचे उघड झाले. त्याचा शोध घेतला असता, आरोपी हा चोरीनंतर बीड शहरातून गायब झाला होता. त्याच्यावर याआधीही जबरी चोरी, मारामारी असे विविध गुन्हे दाखल असून तो सतत गुन्हेगारी करणारा व बीड पोलिसांच्या अनेक गुन्ह्यात वॉन्टेड आरोपी होता. दरम्यान, गुप्त माहितीच्या तसेच आधारे पोलिसांना कळाले की आरोपी शिवा हा नांदेड येथील गणेशोत्सव कार्यक्रमांना नियमित जात आहे. ही माहिती मिळताच बीड पोलिसांच्या पथकाने नांदेड येथे गुप्तपणे सापळा लावला त्यावेळी आरोपी हा गणेशोत्सव कार्यक्रमात आला असताना पोलिसांनी योग्य वेळी दबा धरून आरोपीला अटक करण्यात यश मिळवले.

अटक केल्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळवले आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलिस अधीक्षक श्री. सचिन पांडकर व पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली, पीएसआय श्री. महेश जाधव, पोलिस अंमलदार गहिनीनाथ बावनकर व राम पवार यांनी केली.

# बीड जिल्हा परिषद अध्यक्षपद अनुसूचित जाती महिलेसाठी राखीव




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ सप्टेंबर**

राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पंचायत समिती सभापतीपदाचे आरक्षण ग्रामविकास विभागाने जाहिर केले आहे, त्यानुसार बीड जिल्हापरिषदेचे अध्यक्षपद अनुसुचित जाती महिला प्रवर्गासाठी राखून ठेवण्यात आले आहे. राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांसाठी आरक्षण सोडतीची अधिसूचना जाहिर करण्यात आली असून बीडचे अध्यक्षपद अनुसुचित जाती महिलांसाठी राहणार आहे. त्यामुळे आता जिल्ह्यातील कोणते गट अनुसुचित जाती महिलांसाठी राखीव राहतात त्याकडे लक्ष असणार आहे.

जिल्हा परिषद अध्यक्षपदासोबतच पंचायत समिती सभापतींसाठी आरक्षण संख्या निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार बीड जिल्हयात ६ महिला सभापती असणार आहेत. १ अनुसूचित जाती महिला, २ ओबीसी महिला, तर ३ सर्वसाधारण महिला असणार आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसा निमित्त होणाऱ्या सेवा पंधरवाड्याची जिल्हा भाजपची कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ सप्टेंबर**

देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने सेवा पंधरवडा साजरा केला जातो.बीड जिल्हा भारतीय जनता पार्टी देखील हा सेवा पंधरवडा साजरा करणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हाभरात वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, प्रबुद्ध संमेलन असे विविध कार्यक्रम होणार आहेत.या सर्व कार्यक्रमाच्या तयारीची जिल्हा कार्यशाळा भारतीय जनता पार्टीचे मराठवाडा विभाग संघटन मंत्री संजय भाऊ कोडगे व जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. कार्यशाळेस भारतीय जनता पार्टीचे राज्य परिषद सदस्य एड. सर्जेराव तांदळे, जिल्ह्याचे सरचिटणीस रामदास बडे, मीराताई गांधले ,गणेश लांडे, उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, शहराध्यक्ष अशोक लोढा ,शांतिनाथ डोरले , समन्वयक देविदास नागरगोजे महिला आघाडीचे अध्यक्ष लांबरुड , भाग्यश्री ढाकणे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळा संपन्न झाली



महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या सूचनेवरून बीड जिल्हा भारतीय जनता पक्षाची जिल्हा पदाधिकारी सर्व मंडळाचे पदाधिकारी व सेवा पंधरवड्या निमित्ताने होणाऱ्या सर्व कार्यक्रमासाठी जिल्हा व मंडळ स्तरावर घटीत केलेल्या समितीचे समन्वयक आणि सदस्य अशा जिल्ह्यातील प्रमुख १०० कार्यकर्त्यांची कार्यशाळा बीड शहरातील हॉटेल आलीवो येथे संपन्न झाली. या कार्यशाळेत जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हाभरात उत्साह पूर्वक सेवा कार्य करावे असे आवाहन केले तर मराठवाडा संघटन मंत्री संजय कोडगे यांनी सेवा पंधरवड्यात होणे अपेक्षित असणाऱ्या विविध सेवा कार्यांच्या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले.

# हरवलेल्या व्यक्तीबाबत निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ सप्टेंबर**

पोलीस ठाणे पाटोदा गु.र.नं २५४/२०२५ कलम १३७ (२) बी.एन.एस. अन्वये दिनाक १२/०८/२०२५ रोजी गुन्हा दाखल झाला असुन त्यामध्ये पिडीत मुलीचा शोध लागत नसुन मुलगी रूपाली सचिन शेलार वय १६ वर्षे २ महिने ९ दिवस रा. दासखेड ता. पाटोदा, जि.बीड ही दिनांक ११/०८/२०२५ रोजी रात्री घरात शोध घेतला असता मिळून आली नाही. वगैरे मजकूरा वरून दि. १२/०८/२०२५ रोजी पोलीस ठाणे पाटोदा जि.बीड येथे गुन्हा दाखल आहे तरी सदर मुलीचा आज पावेतो शोध लागला नाही. सदर मुलीचे वर्णन खालील प्रमाणे.

नाव- रूपाली सचिन शेलार वय १६ वर्षे २ महिने ९ दिवस रा. दासखेड ता. पाटोदा, जि.बीड रंग सावळा, अंगात फिकट निळसर रंगाचा पंजाबी ड्रेस, पायात काळ्या रंगाची चप्पल, उंची -५ फुट पत्ता- रा. दासखेड ता. पाटोदा, जि.बीड या वर्णनाची मुलगी आढळून आल्यास सहा. पोलीस उपनिरिक्षक पोलीस ठाणे, पाटोदा दुरध्वनी क्रमांक (०२४४) २४२५३३, पो. चौ. अंमलदार बी.एस. वाघ सफौ/२३-मो. नं. ८६६८२२८९४५ तसेच पो.स्टे. प्रभारी अधिकारी-एस. एम. जाधव पोलीस निरिक्षक पो.ठा. पाटोदा मो. नं.७७२२०३५२०९ यावर संपर्क साधावा, असे प्रसिध्दीस दिलेल्या वृतात नमूद केले आहे.

# कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात विस्तार सेवा विभागाअंतर्गत एक मुष्टी धान्य गरजूंना वाटप

**तभा वृत्तसेवा**
**अंबड दि.१२ सप्टेंबर**

कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात विस्तार सेवा विभागाअंतर्गत गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांनी जमा केलेले एक मुष्टी धान्य एकत्रित गोळा करून विद्यार्थ्यांमध्ये समर्पण भावधारा विकसित व्हावी या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन शाळेत केले जाते.आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.राजेंद्रजी भाला सर तसेच प्रमुख उपस्थित माधवभाऊ शेषराव पवार( मनमंदिर मनोरुग्ण महिलांचा आश्रम ढाकलगाव ) तसेच सारिकाताई माधव पवार व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक मा श्री.प्रदीपजी जोशी सर माध्यमिक विभागाच्या सहशिक्षिका श्रीमती.निशा जपे मॅडम व्यासपीठावरती उपस्थित होते.



सर्वप्रथम प्रतिमा पूजन करण्यात आले व त्यानंतर मान्यवरांचे स्वागत सत्कार करण्यात आले. सारिका ताई पवार यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की मनोरुग्णाची सेवा ही ईश्वरांची सेवा केल्यासारखी होते. म्हणून आम्ही तीन वर्षापासून या रुग्णांची सेवा करत आहे. त्यामुळे आम्हाला खूप आनंद मिळतो आणि समाजातून देखील मदत खूप मोठ्या प्रमाणात मिळते असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात बोलताना डॉ. राजेंद्रजी भाला साहेब म्हणाले की देश हमे देता है , सब कुछ हम भी तो कुछ देना सीखे या उक्तीप्रमाणे आपण समाजामध्ये आपल्याजवळ आहे त्यातून इतरांना सहकार्य करण्याची भावना नेहमी जोपासावी. विद्यार्थी दशेपासून आपण ती अंगीकारली पाहिजे. एक मुष्टी धान्य समर्पण आपण देऊन आपल्यामध्ये देण्याची वृत्ती विकसित होते. मनोरुग्णांना मदत करण्याची व नेहमी सहकार्याची भावना आपल्यामध्ये असली पाहिजे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा श्री अनिल चव्हाण सर यांनी केले तर आभार प्रदर्शन मा श्री मारोती झाटे सर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली.

# खा.सोनवणेंची कार्यतत्परता; बीडमध्ये उपोषणकर्त्यांशी संवाद साधत जाग्यावर काढला मार्ग

**गटसचिवांचा प्रश्न मार्गी, बंजारा समाजाच्या मागणीला पाठिंबा अन् गायरानधारकांना दिला दिलासा**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ सप्टेंबर**

जिल्ह्यात कोणताही प्रश्न सोडविण्यासाठी खा.बजरंग सोनवणे धावून येत असल्याचे वारंवार पहायला मिळत आहे.दि.१२ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बसलेल्या उपोषणकर्त्यांची खा.सोनवणे यांनी तत्परतेने भेट घेत प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी बीड जिल्हा देखरेख सहकारी संस्थेतील गटसचिवांचा प्रश्न मार्गी लावून तातडीने उपोषण सोडविले. याच बरोबर बंजारा समाजाच्या मागणीला जाहिर पाठींबाही दिला. दरम्यान, गायरान धारकांना तुमचा प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना बोलतो, असे म्हणत दिलासा दिला.



मागील काही दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी उपोषणे सुरू आहेत. दि.१२ सप्टेंबर रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करत असलेल्या उपोषणकर्त्यांची भेट घेतली. यावेळी बीड जिल्हा देखरेख सहकारी संस्था, म.बीड येथे ८६ कर्मचारी कार्यरत असून मागील ४ ते ५ वर्षांपासून त्यांचे वेतन करण्यात आलेले नाही. असे असले तरी ते कामकाज पुर्ण करत आहेत. असे असताना त्यांना वेतन दिले जात नाही. सदरील कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यात यावे, यासाठी दि.८ सप्टेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू आहे. खा.सोनवणे यांनी भेट दिल्यानंतर जिल्हा उपनिबंधक यांनी उपोषणस्थळी येऊन पुढील २० दिवसात वेतनाचा प्रश्न मार्गी लावला जाईल, असे लेखी दिले. यानंतर खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते लिंबूपाणी देऊन उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी उपोषणकर्ते ए.एल.उनवणे व उपोषणकर्ते उपस्थित होते.

# मुलाच्या जन्मा नंतर आईला आली दृष्टी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१२ सप्टेंबर**







स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय कोणत्या ना कोणत्या घटनेच्या बातम्या सतत वृत्तपत्रात येत असतात. पण आजची बातमी ही विशेष ऐतिहासिक आहे. जन्मलेल्या पोटच्या गोळ्याला पाहण्यासाठी महिलेला दीड महिन्याचा कालावधी लागला.

कळम तालुक्यातील भोई समाजाची एक महिला त्या महिलेला दिवस गेल्यापासून काही दिवसानंतर अंधुक दिसू लागले चार ते पाच महिन्यानंतर पूर्ण दृष्टी त्या महिलेची गेली त्यातच त्या महिलेला एक गोंडस मुलाला जन्म दिला पण दृष्टी नसल्याकारणाने दीड महिन्यापासून त्या मातेला आपल्या पोटच्या मुलाला प्रत्यक्षात बघता आलं नाही. ही बाब स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयातील नेत्र चिकित्सा शास्त्र विभागातील तज्ञडॉक्टरांना कळाले त्यांनी त्या महिलेचे प्राथमिक तपासणी करून मागच्या दहा दिवसा ऑपरेशन करण्यास ठरवले हे ऑपरेशन अत्याधुनिक पद्धतीने करण्यात आले. त्या संदर्भातील संपूर्ण माहिती डॉक्टर ज्ञानोबा दराडे यांनी दिली. महिलेच्या दोन्ही डोळ्यात मोतीबिंदू पिकलेल्या अवस्थेत काचबिंदू होण्याची शक्यता असताना देखील ऑपरेशन करून त्या महिलेला दृष्टी मिळवून दिली.आज तो क्षण आला स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाचे अधिष्ठता डॉक्टर शंकर धपाटे यांच्या हस्ते त्या महिलेची डोळ्यावरची पट्टी काढण्यात आली व पहिल्यांदा आपल्या पोटच्या गोळ्याला पाहताना त्या भावना शब्दात मांडू शकत नाहीत.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयाचे अधिष्ठता डॉक्टर शंकर धपाटे, डॉक्टर राकेश जाधव, डॉक्टर बिराजदार, डॉक्टर ज्ञानोबा दराडे,डॉक्टर शेळके, अविनाश मुडेगावकर दत्ता आंबेकर, परमेश्वर गीते, मोहम्मद फैजान, आरेफ सिद्दिकी, सय्यद नईम सर्व ज्युनियर सीनियर डॉक्टर व नर्सिंग स्टाफ स्वच्छता कर्मचारी हे उपस्थित होते. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय येथील नेत्र चिकित्सा विभागातील सर्व महिला डॉक्टर कडून त्या माता व मुलाची नवीन कपडे देऊन ओटी भरण्यात आली अशी घटना क्वचित घडते यावरून निदर्शनात आले

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वतीने बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा आणि नशामुक्त भारत या विषयावर जनजागृती शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ सप्टेंबर**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद एल.यावलकर यांच्या मार्गदर्शनानुसार सरस्वती विद्यामंदिर बीड येथे 'बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा आणि नशामुक्त भारत' याविषयी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

बीड येथील शिवाजीनगर भागातील सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर या प्रशालेत 'न्याय सर्वांसाठी' या संकल्पने अंतर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड मार्फत 'बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा आणि नशामुक्त भारत' याविषयी मार्गदर्शन आयोजित केले होते. अधिकार मित्र मिथुन जोगदंड यांनी बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा आणि नशामुक्त भारत या विषयी माहिती दिली व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण टोल फ्री क्रमांक १५१०० विषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. कोणत्या परिस्थितीमध्ये बालकांचा संरक्षण कायदा लागु होतो याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले, जर कुणावर अन्याय होत असेल तर न घाबरता विद्यार्थ्यांनी समोर येवून तक्रार केली पाहिजे व अशा परिस्थितीमध्ये एकमेकांना सहकार्य केले पाहिजे असे विद्यार्थ्यांना सांगुन सजग केले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अधिकार मित्र मिथुन जोगदंड यांनी पोक्सो कायद्यामधील गुन्हयांचे मुख्य पाच प्रकार सांगितले लैंगिक अत्याचार, लैंगिक छळ/स्पर्श, अश्लील प्रदर्शन, मानसिक छळ, ऑनलाईन शोषण जसे की उदाहरणार्थ लैंगिक छळ स्पर्श-मुलांना जबरदस्तीने चुकीच्या पध्दतीने स्पर्श करणे, अश्लील कृत्य करणे. मोबाईल मध्ये मुलांना अश्लील संदेश, व्हिडीओ पाठवणे, बालकांना लवकरात लवकर संरक्षण आणि न्याय मिळावा यासाठी खटले विशेष न्यायालयात चालवले जातात, जेणेकरून निकाल लवकर लागेल, असे मार्गदर्शन करण्यात आले.

# दुधाच्या तुटवड्याचा जागतिक बाजारपेठेवर परिणाम आणि महाराष्ट्रासाठी दुग्ध उद्योगातील संधी

कृषी संधी



दूध हे संपूर्ण आहार मानले जाते आणि जगभरात त्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. परंतु, सध्याच्या घडीला दुधाचे उत्पादन मागणीच्या तुलनेत पुरेसे नसल्याने जागतिक बाजारपेठेला मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. विशेषतः दूध पावडरच्या मागणीत प्रचंड वाढ झाली असताना त्याचा पुरवठा घटत आहे, यामुळे अनेक देशांना अन्न सुरक्षेच्या दृष्टीने आव्हाने निर्माण झाली आहेत.

**जागतिक दूध उत्पादनाची सध्याची स्थिती**

२०२३-२४ च्या आकडेवारीनुसार, संपूर्ण जगात दूध उत्पादनाचे प्रमाण सुमारे ९५ कोटी टन (९५० मिलियन टन) इतके होते. परंतु हवामानातील बदल, जनावरांच्या आहारातील वाढती अडचण आणि आर्थिक मंदीमुळे अनेक देशांत दूध उत्पादन घटले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर दूध पावडरच्या किमतीत सुमारे १२-१८ टक्के इतकी वाढ झाली आहे.

**भारतातील दूध उत्पादनाची आकडेवारी**

भारत हा जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश आहे. २०२३-२४ मध्ये भारताने २३० कोटी टन (२३० मिलियन टन) दूध उत्पादन केले होते, ज्यात महाराष्ट्राचा वाटा सुमारे ११.३ मिलियन टन होता. तथापि, वाढती लोकसंख्या, दुग्धजन्य पदार्थांची मागणी आणि जागतिक निर्यात मागणी लक्षात घेता हे प्रमाण पुरेसे नाही.

**दूध पावडर पुरवठा व मागणीतील तफावत**

दूध पावडरचा वापर मुख्यतः बिस्किट, चॉकलेट, मिठाई, बेबी फूड्स आणि बेकरी उत्पादनांमध्ये होतो. भारतात दरवर्षी सुमारे ७.५ लाख टन दूध पावडरची मागणी असते, परंतु उत्पादन ६.५ लाख टनांपर्यंतच मर्यादित राहते. त्यामुळे आयातीवरील अवलंबित्व वाढले आहे. एकंदरीत जागतिक बाजारपेठेत दूध पावडरच्या कमतरतेमुळे भारताला मोठी निर्यात संधी मिळू शकते.

**धोरणात्मक उपाय आणि भविष्यकालीन दिशा**

१. राष्ट्रीय दुग्ध विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रशिक्षण व आर्थिक पाठबळ देणे.
२. दुधावर आधारित स्टार्टअप्सना प्रोत्साहन, विशेषतः मूल्यवर्धित उत्पादने जसे की चीज, प्रोटीन पावडर आणि लो फॅट मिल्क.
३. जैविक व आरोग्यपूरक दूध उत्पादनात भारताची जागतिक पातळीवर ओळख निर्माण करणे.
४. निर्यात धोरण विकसित करून दक्षिण-पूर्व आशिया व मध्य-पूर्व देशांमध्ये भारतीय दूध उत्पादने पोहोचवणे.

**महाराष्ट्रातील दुग्धउद्योगात भविष्यातील संधी**

महाराष्ट्रात कोरडवाहू भाग, पशुखाद्याची कमतरता आणि पशुपालनावरील मर्यादित गुंतवणूक यामुळे दूध उत्पादन मर्यादित आहे. मात्र यात मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्याची संधी उपलब्ध आहे.

- उच्च उत्पादनक्षम देशी/विदेशी गायींचा वापर
- सेंद्रिय व पोषक दूध उत्पादनावर भर
- मॉडर्न डेअरी फार्मिंग तंत्रज्ञान (खेढ बेस्ड कूलिंग, ट्रॅकिंग, स्वयंचलित दूध काढणी)
- क्लस्टर आधारित प्रक्रिया केंद्रे ग्रामीण भागात उभारणे
- दूध संकलन, साठवण आणि शीतसाखळी विकास

**निष्कर्ष**

जागतिक बाजारपेठेत दूध पावडर व दूध उत्पादने यांच्या वाढत्या मागणीमुळे भारतासाठी, विशेषतः महाराष्ट्रासाठी दुग्धउद्योगात नव्याने भरारी घेण्याची मोठी संधी उपलब्ध आहे. जर धोरणात्मक दृष्टिकोन, आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतकरी अनुकूल उपाय अंमलात आणले, तर भारत जागतिक दुग्ध उत्पादक व निर्यातदार म्हणून अधिक बळकट होईल.

● चेतन रमेश निचळ
आचार्य पदवी विद्यार्थी
● फाल्गुनी नं. खडसे
आचार्य पदवी विद्यार्थिनी
● डॉ. राजेश्वर आर. शेळके
प्राध्यापक, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं. दे कृ. वि. अकोला



# कृषी संशोधनाची आजची दिशा व संधी

कृषी संशोधन

देशाच्या अर्थव्यवस्थेत जवळपास १५ टक्के वाटा असलेले कृषी क्षेत्र आज परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभे आहे. पारंपरिक शेतीबरोबरच आधुनिक संशोधन, तंत्रज्ञान आणि शाश्वत शेती पद्धतींमुळे शेतीचे रूपांतर घडत आहे. सरकार, कृषी विभाग, कृषी विद्यापीठे आणि विविध संस्था यांचे एकच ध्येय आहे, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे आणि त्यांना समृद्धीच्या दिशेने नेणे.

आज आव्हाने अनेक आहेत. हवामान बदल, उत्पादन खर्चातील वाढ, बाजारपेठेतील अस्थिरता; पण हीच आव्हाने आपल्याला नव्या संधीही देत आहेत. कृषी संशोधन आणि त्याचा प्रभावी विस्तार यांचा संगम साधला तर शेतकरी अधिक सक्षम होऊ शकतो.

**शेतकऱ्यांच्या अपेक्षा आणि दिशा, काळाशी सुसंगत संशोधन**

शेतकऱ्यांना परवडेल अशा खर्चात आणि बदलत्या हवामानाशी जुळवून घेणारे तंत्रज्ञान देणे ही प्राथमिक गरज आहे. दुष्काळ, अवकाळी पाऊस किंवा तापमानवाढ यांना तोंड देऊ शकतील, अशा वाणांची निर्मिती ही आजची मोठी संधी आहे.

**संशोधन व विस्ताराचा संगम**

कृषी विभाग आणि कृषी विद्यापीठांनी केवळ संशोधनापुरते मर्यादित न राहता ते ग्रामपातळीवर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. संयुक्त उपक्रम, प्रात्यक्षिके आणि गावागावांतून संवाद यामुळे शेतकरी प्रत्यक्ष लाभ घेऊ शकतो.

**ज्ञानवृद्धी आणि प्रशिक्षण**

कृषी अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांना शास्त्रीय उत्तरे देता यावी, यासाठी त्यांना सातत्याने प्रशिक्षण आणि विद्यापीठाशी थेट संवादाची संधी द्यावी लागेल. त्यामुळे प्रशासन आणि संशोधन यांचा सुसंवाद अधिक घट्ट होईल.

**हवामान बदलावर उपाययोजना**

बदलत्या वातावरणामुळे होणारे उत्पादनातील चढउतार कमी करण्यासाठी तग धरणाऱ्या वाणांची निर्मिती अत्यावश्यक आहे. उदाहरणार्थ, तापमानवाढीमुळे गव्हाच्या उत्पादनावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी संशोधनातूनच उपाय मिळू शकतो.

**संवादाचा पूल**

शेतकरी आणि कृषी विद्यापीठांमधील दुरावा कमी करून विश्वासाचे बंध दृढ करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना संशोधन आपलेसे वाटले तरच त्याचा खरा उपयोग होईल.

**कृषी विद्यापीठांची भावी भूमिका**

कृषी विद्यापीठांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन रिक्त पदे भरावीत, कुशल मनुष्यबळ तयार करावे आणि संशोधन थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचवावे. औपचारिकतेच्या पलीकडे जाऊन कृषी विभागाशी राम-लक्ष्मण नातं ठेवून काम केल्यास या क्षेत्रात मोठा बदल घडू शकतो.

आजची आव्हाने ही अडथळे नसून, नव्या संधींचा मार्ग आहेत. संयुक्त प्रयत्न, नाविन्यपूर्ण संशोधन आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या आधारावर कृषी क्षेत्र अधिक सक्षम, शाश्वत आणि समृद्ध होऊ शकते. शेतकरी, शास्त्रज्ञ, विभाग आणि विद्यापीठे यांचा विश्वासाचा पूल जितका भक्कम होईल, तितकी खरी कृषी क्रांती साकार होईल.

● योगेश भानुदास पाटील

# पंजाब सारखी पूरस्थिती महाराष्ट्रातही निर्माण होऊ शकते

## काळजी घेणे जरूरी

हवामान अंदाज



**भौगोलिक घडामोडी**

आग्नेय पाकिस्तान, राजस्थान आणि कच्छ परिसरावर एक खोल कमी दाबाचा पट्टा तयार झाला असून, तो वायव्येकडे सरकत आहे. काही काळानंतर तो कमी दाबाच्या पट्ट्यात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. मान्सूनचा ट्रफ या खोल कमी दाबाच्या केंद्रातून जात ईशान्य बंगालच्या उपसागरापर्यंत पसरला आहे. दक्षिण पंजाब तसेच बंगालच्या उपसागरावर (ओडिशा व आंध्रप्रदेश किनारा) वरच्या हवेतील चक्राकार वारे तयार झाले आहेत. हे चक्राकार वारे १२ सप्टेंबर रोजी कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतरित होण्याची शक्यता आहे.

या खोल कमी दाबाशी संबंधित ट्रफ रेषा आग्नेय पाकिस्तान व लगतच्या राजस्थान□कच्छपासून दक्षिण पंजाबपर्यंत पसरलेली आहे.

**विदर्भ साप्ताहिक अंदाज**

- **१० ते १२ सप्टेंबर** : सकाळी सूर्यप्रकाश, दुपारनंतर पूर्व विदर्भात पावसाची सुरुवात.
- **१३ ते १९ सप्टेंबर** : बंगालच्या उपसागरातील कमी दाबामुळे संपूर्ण विदर्भात मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता.

मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र

- **१० ते ११ सप्टेंबर** : जास्त ढगाळ वातावरण, ठिकठिकाणी हलका पाऊस
- **१३ ते १९ सप्टेंबर** : दक्षिणेकडे झुकलेला कमी दाब व मध्यभागी आलेल्या ट्रफलाईनमुळे दक्षिण मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात जोरदार व नुकसानकारक पावसाचा इशारा.

**उत्तर-मध्य महाराष्ट्र व कोकण**

- **१३ ते १९ सप्टेंबर** : नगर, पुणे, नाशिक, सोलापूर, मुंबई व संपूर्ण कोकण किनारपट्टीसाठी रेड अलर्ट जारी करण्याची परिस्थिती.

**परतीचा प्रवास**

प्राथमिक अंदाजानुसार, मान्सूनचा परतीचा प्रवास १७ सप्टेंबरपासून राजस्थानमधून सुरू होण्याची शक्यता.

● अभिषेक सु. खेरडे
हवामान अभ्यासक,
अचलपूर, जि अमरावती

# पावसाळ्यातील काही निवडक रानभाज्यांची माहिती व संशोधन उपक्रम

कृषी उपक्रम

महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात भाजीपाला पिकांचे उत्पादन घेत असताना, महाराष्ट्र राज्य सिंचन विभागाच्या आकडेवारीनुसार एकूण ओलिताखालील क्षेत्रांपैकी केवळ १७ टक्के क्षेत्रावरच भाजीपाला पिकांची लागवड होते. तरी २०२३□-२४ या वर्षात तब्बल २.९४ दशलक्ष हेक्टर क्षेत्रातून २८.७५ दशलक्ष टन भाजीपाला उत्पादन मिळाले आहे. सध्या राज्यात २५ ते ३० प्रमुख भाजीपाला पिकांची लागवड केली जाते. परंतु, अनेक प्रकारच्या रानभाज्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. तथापि, सामान्य माणसाला विचारले असता, दोन-तीन रानभाज्यांची नावे आठवली तरी आश्चर्य, अशी परिस्थिती आहे. डॉक्टरांच्या मते, हंगामी सर्दी, पडसे, खोकला, त्वचारोग अशा अनेक आजारांवर रानभाज्यांमध्ये औषधी गुणधर्म असतात, जे पारंपरिक लोकवैद्यकात वापरले जातात. भाजीपाला पिकांमध्ये मुख्यतः शेतभाज्या आणि रानभाज्या असे दोन प्रकार.

शेतात मशागत करून लागवड केलेल्या भाज्यांना शेतभाज्या म्हणतात, तर नैसर्गिकरीत्या बांधावर, रानात उगवणाऱ्या भाज्यांना रानभाज्या म्हणतात. अनेक प्रकारची जीवनसत्त्वे, खनिजे, अँटीऑक्सिडंट्स आणि फायबर्स मुबलक प्रमाणात असतात.

**शेतकऱ्यांसाठी नवी दिशा : उत्पादन व बाजारपेठ**

आजच्या घडीला शहरी ग्राहक हेल्दी डायट, मिलेट्स, फॉरेस्ट फूड यासारख्या वाढत्या जीवनशैलीमुळे रानभाज्यांना नव्या बाजारपेठा उपलब्ध होत आहेत. रानभाज्यांचे योग्य संवर्धन, बियाण्यांचे संकलन, शेतीकरण, प्रक्रिया व विक्री यामार्फत नव्या स्वरूपाचा व्यवसाय तयार होऊ शकतो. राज्यातील काही फार्मर प्रोड्युसर कंपनी व अशाच काही शेती गटांनी महिलांसाठी रानभाज्यांवर आधारित स्वरोजगाराची दारे उघडली आहेत. राज्यातील अनेक भागांमध्ये अशी यशस्वी मॉडेल्स निर्माण करता येऊ शकतात.

**सुधारित जाती व संशोधन, शिफारसी व उपाय**



नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य कृषी विद्यापीठांच्या ५३ व्या संयुक्त कृषी संशोधन व विकास समितीच्या बैठकीत, मूलभूत शास्त्र विभागात एक महत्त्वपूर्ण शिफारस डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील जैवतंत्रज्ञान केंद्रातर्फे जाहीर करण्यात आली आहे. कारटूली (एक पोषणमूल्यांनी समृद्ध रानभाजी) या पिकाच्या संवर्धनासाठी टीशू कल्चर तंत्रज्ञानावर आधारित संशोधनास मान्यता देण्यात आली आहे. कारटुली ही एक द्विलिंगी वनस्पती असून, नर व मादी फुले वेगवेगळ्या झाडांवर येतात. यामुळे नैसर्गिक फळधारणा व बीजोत्पत्ती अत्यंत मर्यादित होते. परिणामी, या भाजीसाठी बियाण्यांची कमतरता भासत होती. ही अडचण लक्षात घेऊन संशोधकांनी टीशू कल्चर तंत्रज्ञानाचा वापर करून कारटूलीची प्रभावी रोपवाटिका तयार केली. या तंत्रामुळे कारटुलीचे संवर्धन, लागवड व उपलब्धता वाढवणे शक्य झाले असून, या संशोधनामुळे शेतकऱ्यांना नवीन पर्याय व उत्पन्नाचे स्थिर साधन उपलब्ध होणार आहे. कृषी विद्यापीठांनी अनेक रानभाज्यांच्या सुधारित जाती विकसित केल्या आहेत.

**कारटुली (गिलोडा, कावळ्यांची बोडी) आणि मेयाळू (मयेळ, मेंढी)**

पावसाळ्यात उगवणाऱ्या रानभाज्यांमध्ये कारटुली (गिलोडा, कावळ्यांची बोडी) आणि मेयाळू (मयेळ, मेंढी) या भाज्यांचा विशेष समावेश होतो. कारटुलीचे शास्त्रीय नाव मोमोर्डिका डिओका असे असून, ती कारल्याच्या कुलातील वेलवर्गीय वनस्पती आहे. तिचे उगमस्थान भारत व दक्षिण आशिया मानले जाते. ही द्विलिंगी वनस्पती असून, नर व मादी वेगवेगळ्या झाडांवर दिसतात. कारटुलीची वाढ बांधावर, ओलसर जागी किंवा शेताच्या सीमांवर पावसाळ्यात भरभरून होते. उष्ण व दमट हवामान (२५ ते ३५ अंश) आणि ७०० ते १२०० मिमी पावसाची आवश्यकता तिच्या वाढीस पोषक ठरते. खरीप हंगामात ही वेल लवचिक पद्धतीने पसरणारी वाढ दाखवते. हलकी ते मध्यम जमिनीत ही भाजी उत्तम येते आणि सेंद्रिय शेतीसाठी तर विशेष उपयुक्त आहे.

अँटीऑक्सिडंट्स व फायबर्सने समृद्ध असल्याने ही भाजी शरीरातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत करते तसेच त्वचारोग, रक्तशुद्धी आणि शरीरशुद्धी यासाठीही हिचा औषधी उपयोग होतो.

मेयाळू ही भाजी अमरंथ कुलातील असून, तिचे उगमस्थान देखील भारत व दक्षिण आशिया आहे. पावसाळ्यातील उष्ण व दमट हवामान या झुडूपवर्गीय गवतासारख्या वाढीच्या वनस्पतीला पोषक ठरते. खरीप हंगामात बांधावर किंवा शेतीजवळ या भाज्यांची नैसर्गिक उगम होते. पोषणमूल्यांनी समृद्ध असलेली ही भाजी शरीरशुद्धी व आरोग्य सुधारण्यास सहायकारी आहे.

या दोन्ही रानभाज्या ग्रामीण भागात सहज उपलब्ध होतात आणि स्थानिक आहारात महत्त्वाचे स्थान मिळवतात. पोषणमूल्ये, औषधी उपयोग आणि सेंद्रिय शेतीसाठी उपयुक्तता यामुळे पावसाळ्यातील या रानभाज्यांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

**जीआय टॅग आणि निर्यात संधी**

या भाज्यांना स्थानिक भौगोलिक टॅग मिळवून देण्याचीही संधी आहे, कारण त्या विशिष्ट भागात नैसर्गिकरीत्या उगम पावतात व तेथील पारंपरिक जीवनशैलीचा भाग आहेत. शिवाय, या रानभाज्या नैसर्गिकरीत्या विषमुक्त असल्यामुळे आणि जर सेंद्रिय पद्धतीने त्यांचे उत्पादन केले गेले, तर त्यांची निर्यात करण्याची मोठी संधी उपलब्ध होऊ शकते. आजच्या जागतिक बाजारपेठेत सेंद्रिय व पारंपरिक अन्नपदार्थांची वाढती मागणी लक्षात घेता, रानभाजी हे एक नवीन निर्यातक्षम उत्पादन ठरू शकते.

**महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात आढळणाऱ्या निवडक रानभाज्या, त्यांची शास्त्रीय नावे व पोषणमूल्ये**

| | रानभाजीचे नाव | शास्त्रीय नाव | पोषक घटक | आढळण्याचे ठिकाण (जिल्हा) |
|---|---|---|---|---|
| १ | टेरडा | Cassla tora | लोह, फायबर, कॅल्शियम | नाशिक, धुळे |
| २ | शेवगा | Moringa aleifera | प्रथिने, कॅल्शियम, Vit C | पुणे, सोलापूर |
| ३ | गव्हाणी | Celosia argentea | लोह, Vit A, फायबर | गोंदिया |
| ४ | कोळमुणी | Portulaca aleracea | ओमेगा ३, Vit C | सिंधुदुर्ग |
| ५ | टाकळा | Cassia tora | फायबर, अँटिऑक्सिडंट्स | रत्नागिरी |
| ६ | माठ | Amaranthus sp | लोह, Vit A, प्रथिने | सिंधुदुर्ग |
| ७ | चिचिंडा | Trichosanthes Cucumerina | पाण्याचे प्रमाण, फायबर | रायगड |
| ८ | कडू पालक | Spinacia oleracea | लोह, Vit K, | औरंगाबाद, जळगाव |
| ९ | आगळ | Momordica dioica | अँटिऑक्सिडंट्स, फायबर | नंदुरबार, अमरावती |
| १० | फोडशी | Cleome viscosa | कॅल्शियम, प्रथिने | कोंकण |
| ११ | कारटोली | Momordica dioica | फायबर, Vit C, अँटिऑक्सिडंट्स | लातूर, विदर्भ |
| १२ | तांदुळजा | Amaranthus Viridis | लोह, Vit A, प्रथिने | लातूर, यवतमाळ |

● ऋषिकेश तहकिक
संशोधन विद्यार्थी , जैवतंत्रज्ञान केंद्र, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला
● तेजश्री दहिफळे
संशोधन विद्यार्थी, कृषि महाविद्यालय, डॉ बा. सा. कों. कृ. वि., दापोली

# जैवविविधता : सेंद्रिय शेतीची जीवनरेखा

शेतकरी तंत्रज्ञान



सेंद्रिय शेती हा शब्द आपण खूपदा ऐकतो. पण खरं सांगायचं तर, अजूनही बऱ्याच जणांच्या मनात सेंद्रिय शेतीविषयी गोंधळ आहे. अनेकांना वाटते की, केवळ रासायनिक खतं किंवा कीडनाशकं वापरायची नाहीत म्हणजे झाली सेंद्रिय शेती. प्रत्यक्षात हे अर्धसत्य आहे. खरी सेंद्रिय शेती ही निसर्गाशी सहजीवन साधून केलेली शेती आहे. पिकं, माती, पाणी, हवेबरोबरच पक्षी, कीटक, झाडं, सूक्ष्मजीव अशा सगळ्या जिवसृष्टीला सोबत घेऊन केलेली शेती म्हणजेच खरी सेंद्रिय शेती होय.

आजचा शेतकरी ज्या पद्धतीने शेती करतो, त्यात पेरणी, पाणी देणं, खतं व औषधं घालणं एवढ्यापुरतंच त्याचं काम मर्यादित झालं आहे. उर्वरित मोठं काम□ कीड नियंत्रण, परागी भवन, मातीची सुपीकता राखणे हे निसर्गातील जैवविविधता करते. पण, गेल्या काही दशकांपासून आपण या जैवविविधतेकडे फारसे लक्ष दिले नाही. रासायनिक उपायांवर अवलंबून राहिल्यामुळे शेतीतून पक्षी, कीटक आणि उपयुक्त जीव गायब होऊ लागले. त्याचे परिणाम म्हणजे आजची वाढती कीड समस्या, मातीची घटलेली सुपीकता आणि वाढता उत्पादन खर्च.

पूर्वीच्या शेतकऱ्यांकडे भरपूर अनुभव आणि निरीक्षणशक्ती होती. त्यांनी शेतात मजबूत बांध आणि मोठे ताल कायम ठेवले. हे बांध केवळ पाणी थांबवण्यासाठी किंवा माती वाहून जाण्यापासून रोखण्यासाठी नव्हते, तर विविध पक्षी आणि प्राण्यांना आश्रय देण्यासाठीही महत्त्वाचे होते. बांधावर झाडं लावली जात आणि त्या झाडांमुळे पक्षी, कीटक, सरडे, बेडूक यांचे नैसर्गिक निवासस्थान तयार होत असे. परिणामी शेताचं नैसर्गिक संरक्षण होत असे.

आज मात्र आधुनिक शेतीच्या नावाखाली आपण बांध मोडून त्यावर पेरणी करू लागलो आहोत. त्यामुळे पीक क्षेत्र तात्पुरते वाढते, पण शेतीचे नैसर्गिक संरक्षण मात्र नाहीसे होते. मजबूत बांध असलेली शेती आजही दणकट आहे आणि संकटांपासून लवकर सावरते, हे अनेक अनुभवांतून स्पष्ट होते. शेतीच्या कडेला लावलेली झाडं ही फक्त सावलीसाठी नसतात. त्यांचे योगदान खूप मोठे असते.

कडुलिंब, बोर, बाभूळ, करंज, उंबर, शेवगा, आंबा, जांभूळ यासारखी स्थानिक झाडं शेतकऱ्याची खरी मित्र आहेत. ही झाडं कमी पाणी घेतात, मातीला सुपीक ठेवतात, सूक्ष्मजीवांच्या वाढीस चालना देतात आणि पक्ष्यांना आश्रय देतात. त्याच्या उलट निलगिरी, सुरू, गुलमोहर यासारखी परदेशी झाडं पाण्याची मोठ्या प्रमाणात गरज भागवतात. निलगिरीच्या झाडाखाली इतर काही उगवत नाही, मातीचा ओलावा शोषून घेते आणि जमिनीत उपयुक्त जीवसृष्टी टिकत नाही. त्यामुळे अशा झाडांची लागवड शेतीला अपायकारक ठरते.

शेतीत लावलेली झाडं पक्ष्यांसाठी थांबे ठरतात. पक्ष्यांमुळे शेताचे अप्रत्यक्ष रक्षण होते. **उदाहरणार्थ,**

- कडुलिंबावर बसलेले कावळे हुमणीसारख्या कीड खातात.
- करंजावर मधमाश्या येऊन परागीभवन करतात, ज्यामुळे पिकाचं उत्पादन वाढते.
- बाभळी व बोरीवर सुगरण पक्ष्यांची घरटी होतात, जे कीड नियंत्रणात मदत करतात.
- तरवड हे झाड नैसर्गिक कीडनियंत्रणासाठी प्रसिद्ध आहे.

ही सगळी झाडं व त्यावरचे पक्षी शेताचे मोफत संरक्षण करतात. एखाद्या औषधाच्या फवारणीपेक्षा या नैसर्गिक व्यवस्थेचा परिणाम जास्त टिकाऊ आणि दीर्घकालीन असतो. भारतीय परंपरेत जैवविविधतेला नेहमीच महत्त्व दिले गेले आहे.

उदाहरणार्थ, घटस्थापनेत उंबराची माती, तरवडाची फुलं, वडाची पत्रावळी वापरण्याची प्रथा आहे. ही फक्त धार्मिक गोष्ट नाही, तर त्यामागे शास्त्रीय कारण आहे. उंबराची माती सूक्ष्मजीवसमृद्ध असते, तरवडाची फुलं नैसर्गिक कीडनियंत्रण करतात आणि वडाची पानं पिकांसाठी उपयुक्त घटक पुरवतात. आपल्या परंपरांमध्ये दडलेले हे विज्ञान आपण पुन्हा ओळखायला हवे.

हरितक्रांतीमुळे भारताला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता मिळाली, हा सकारात्मक भाग नाकारता येणार नाही. पण या क्रांतीमुळे रासायनिक खतं आणि कीडनाशकांचा अतिरेक झाला. सुरुवातीला उत्पादन वाढले, पण हळूहळू माती नापीक होऊ लागली. शेतकरी कर्जबाजारी झाला आणि उत्पादन खर्च वाढला. यामुळे आत्महत्या आणि संकटग्रस्त शेती हा आजचा मोठा प्रश्न बनला आहे.

सेंद्रिय शेतीकडे वळणे म्हणजे पुन्हा जुन्या पद्धतीकडे जाणे नव्हे, तर आधुनिक विज्ञान आणि पारंपरिक ज्ञान यांचा योग्य संगम साधणे आहे. पक्षीथांबे, स्थानिक झाडं, बांध-ताल यांचा वापर करून आपण रासायनिक खतं आणि औषधांवरील अवलंबित्व कमी करू शकतो. जागतिक स्तरावरही सेंद्रिय शेतीला मोठी मागणी आहे. युरोप, अमेरिका आणि खाडी देशांमध्ये विषमुक्त अन्नाला जास्त किंमत मिळते. भारतातसुद्धा शहरी भागात सेंद्रिय अन्नाचे आकर्षण वाढत आहे. अशा परिस्थितीत आपल्या शेतकऱ्यांनी या दिशेने पावले उचलली तर आर्थिकदृष्ट्या मोठा फायदा होऊ शकतो.

यासाठी शेतकऱ्यांनी बांध जपावेत, स्थानिक झाडं लावावीत, पक्ष्यांना थांबे उपलब्ध करून द्यावेत. ग्रामपातळीवर 'पक्षी मित्र मंडळं', 'झाड संवर्धन मोहिमा' अशा उपक्रमांची गरज आहे. शेतकऱ्यांना केवळ उत्पादनावर न थांबता, जैवविविधतेचे व्यवस्थापन हेही महत्त्वाचे काम मानावे लागेल. खरी सेंद्रिय शेती करायची असेल तर निसर्गाशी आपली नाळ जोडावी लागेल. बांध, झाडं, पक्षी आणि सूक्ष्मजीव ही निसर्गाची सुरक्षा कवचं आहेत. आपण फक्त थोडं लक्ष दिले, तर ही कवचं आपले रक्षण करतील. विषमुक्त अन्न, निरोगी माती आणि आरोग्यदायी पिढी यासाठी जैवविविधतेकडे वळणे ही आजची गरज आहे.

● डॉ. आकाश गजानन म्हेत्रे
● मल्लिकार्जुन दशरथ कोळी
● डॉ. कुलभूषण सविंद्र पाटील

www.tarunbharat.net
तरुण भारत
# धर्म अध्यात्म



• संयोजक : शिल्पा विवेक कवठेकर/९८२३२६४६२६

## समर्थवाणी

वृषाली मानेकर/९६०५१७७४७८

# दशक आठ : सूक्ष्म आशंका निरूपण



(समास तिसरा)

परमार्थाच्या क्षेत्रात माणसांचे दोन वर्ग असतात. एक ज्ञानी माणसांचा, दुसरा अज्ञानी माणसांचा. ज्ञानी माणसांच्या देहबुद्धीचा समूळ नाश होत असतो. त्याला ब्रह्म स्वरूपाखेरीज दुसरे काहीच अनुभवाला येत नाही. याउलट अज्ञानी माणसांच्या आत्मबुद्धीचा नाश होतो. त्याला दृश्य विश्वाखेरीज दुसरे काहीच दिसत नाही. ज्ञानोपदशेमध्ये भगवंताशी तदाकार होता येते. त्या वेळेला कोणतेच प्रश्न किंवा संशय उरत नाही. अज्ञानी व्यक्तीच्या मनात सातत्याने अनेक प्रश्न, संशय उद्‌भवलेले असतात. परमात्मस्वरूपाचा साक्षात्कार करून घेणे म्हणजे मनातील विकल्पांना नाहीसा करण्याचा राजमार्ग आहे. जोपर्यंत या सगळ्यांची जाणीव होत नाही, तोपर्यंत बुद्धीच्या भूमिकेवर स्थिर होणे व तर्कशुद्ध विचार करणेच आपल्या हिताचे असते. साधकाने सूक्ष्म विचार केला तर ज्ञान उत्पन्न होण्यास सहाय्य मिळते.

प्रस्तुत समासात समर्थ रामदासांनी स्पष्ट केले आहे की, ब्रह्मज्ञानी माणसाला सर्वत्र ब्रह्मस्वरूपाशिवाय अन्य कशाचीच अनुभूती येत नाही. दृश्य स्वरूपाची सतत अनुभूती येत राहणे म्हणजेच अज्ञान होय. जेव्हा ब्रह्माच्या आधारावर जगाची प्रचिती येते, तेव्हा जगाचे कोणतेही गुणधर्म ब्रह्माच्या ठिकाणी आढळत नाहीत. अनेक गुणधर्मांनी आधारलेले हे जग ब्रह्मामध्ये कसे दिसते? या प्रश्नाचे खरे उत्तर हेच देता येईल की ज्ञानी पुरुषाचा अनुभव हाच खरा समजावा. वेदांतातील अजातवाद तो हाच हे सगळे खरे असले तरी अज्ञानी पुरुषांच्या जगाबद्दलचा अनुभव नाकारता येत नाही. अज्ञान म्हणजे चेतनेचा किंवा जाणिवेचा गुण. म्हणून संपूर्ण विश्वाला व्यापून असणारी चेतनेची शुद्ध जाणीव मायेचे अधिष्ठान होय. पर्यायाने त्यालाच ईश्वर म्हणायचे. मात्र सद्‌गुरूच्या कृपाछत्राखाली माया ईश्वराची शक्ती म्हणून अनुभवाला येते. सुरुवातीला अज्ञान अवस्थेत देहबुद्धीने बंधनात टाकणारी माया साधकावस्थेत विवेक, वैराग्य प्रदान करणारी एक ईश्वरी शक्ती असण्याचे जाणवते.

एकंदरीत हे विश्व भासमय आहे हे निर्विवाद सत्य आहे. जसे दोरीवर सापाचा, पाण्यावर लाटांचा, सूर्यामुळे मृगजळाचा, तंतूमुळे धागे असून वस्त्राचा भास होतो, पण खरी अडचण अशी आहे की, अद्वैत सांगण्यासाठी द्वैताचा आश्रय घ्यावा लागतो. या विश्वामध्ये सर्वत्र मायेचा विस्तार आहे. तो शब्दात वर्णन करणे अवघड आहे. संतसंगतीने ते सुलभ होऊ शकते. चैतन्य अनाम आहे, परंतु मायेने त्याला अनेक रूपे व अनेक नामे दिली. माया ही नामरूपाचे मूळ आहे. ज्याप्रमाणे नजरबंदीच्या खेळात अनेक वस्तू प्रत्यक्ष असल्याचे चित्र निर्माण करतात. त्या मिथ्या असतात हे आपल्यालाही माहीत असते, पण क्षणभर का होईना, आपण भ्रमित होतोच तसेच हे विश्वसुद्धा नजरबंदीच्या खेळासारखे आहे. आकाश अत्यंत निश्चल आहे. त्यात हलणारा वायू निर्माण झाला तरीही आकाश न हालता जसेच्या तसे स्थिर राहते. त्याचप्रमाणे अगदी निराकार व निश्चल ब्रह्मामध्ये मूळ माया उत्पन्न झाली. वायू उत्पन्न झाल्यामुळे आकाशाला तडा गेल्या. आकाश भंगले असे कधी घडत नाही. त्याचप्रमाणे मुळमायेमुळे निर्गुण परब्रह्मात कोणतेही स्थित्यंतर होत नाही. जसे आपण व्यवहारात म्हणतो, आभाळ आले, आभाळ गेले पण प्रत्यक्षात आपण पाहतो आकाश काहीही झाले, तरी जसेच्या तसे अभंग राहते. तद्वतच मायेमुळे दृश्य विश्व आले आणि गेले तरी निर्गुण ब्रह्म सगुण न होता अगदी जसेच्या तसे राहते. क्षितिजापाशी आकाश अगदी डोक्याला टेकलेले दिसते, पण ते खाली घसरलेले नसते. ते जसे आहे तसेच राहते.

कधीकधी विश्वात ब्रह्माला सगुणपणा आल्यासारखे वाटते, परंतु त्याचे निर्गुण पण अगदी जसेच्या तसे असते हा विश्वास मनात सतत असू द्यावा. खरे तर आकाश सर्व दिशांना अगदी मोकळे आहे. आपण अगदी दुरून पाहतो तेव्हा मोठमोठ्या पर्वतरांगा निळ्या रंगाच्या भासतात, पण दिसत असूनसुद्धा तो तो रंग पर्वतांना लागलेला नसतो. अगदी तसेच दृश्य विश्व परब्रह्माला चिकटलेले दिसते पण निर्गुण ब्रह्म मात्र त्यापासून अगदी अलिप्त राहते. बसमध्ये प्रवास करताना पृथ्वी, झाडे, वेली धावत असल्याचा भास होतो, पण प्रत्यक्षात ते जागच्या जागी स्थिर असतात तसेच निर्गुण अवस्था जशीच्या तशी राहते एवढे मात्र खरे. समर्थ म्हणतात, एकंदरीत काय मूळ परमात्मवस्तू पाहण्यास अतींद्रिय दृष्टी असणे गरजेचे आहे. आपली इंद्रिये इतकी दुर्बल आहेत की दृश्य वस्तूचे अंतरंग तर राहोच, पण त्याचे बहिरंग देखील इंद्रियांना नीट आकलन होत नाही. जे नाही ते दिसणे म्हणजेच भ्रम होय.

हे विश्व पंचमहाभूतांपासून रचलेले आहे. यात एकांतून एक निर्माण होऊन ब्रह्मांडाची रचना होते. हे ज्याला कळले, त्यालाच विश्व म्हणजे काय, हे कळले असे समजावे. पंचमहाभूते प्रथम अव्यक्त होती पण नंतर विश्वरचना होण्यासाठी ती व्यक्त झाली. मी एक आहे, अनेक व्हावे ही इच्छा झाली. बल हा तेजाचा गुण म्हणून त्या इच्छेला सामर्थ्य प्राप्त झाले. सामर्थ्य जीवाला बोचत नाही कारण ते मृदू आहे. मृदूपण हा जळाचा गुण आणि हा सर्व खेळ जडद्रव्याचा आधाराने चालतो. जडत्व हा पृथ्वीचा गुण, अशाप्रकारे ही पंचमहाभूते मूळमायेमध्ये सूक्ष्मपणे व अव्यक्तपणे वास्तव्याला असतात. आरंभी आणि शेवटी सत्य असे परमात्मस्वरूप आहे. मध्ये पंचमहाभूतांच्या अनेक घडामोडी चालतात. मूळ माया पंचभूतात्मक आहे हे आपण जाणून घ्यावे. खरे तर प्रत्येकाच्या मनात एक शंका निर्माण होऊ शकते. एका तमोगुणापासून पंचभुते निर्माण होतात. मूळमायेमध्ये त्रिगुणांना स्थान नाही. मग तेथे पंचभुतांचा उगम कसा काय होऊ शकतो? शेवटी काय शुद्ध, निर्मळ व पूर्ण परब्रह्माशिवाय दुसरे अस्तित्व नाही हेच सत्य मानायचे. ●●

# श्रीस्वानंदेश महिम्न स्तोत्र

## श्री स्वानंदेश महिम्न

विद्यावाचस्पती स्वानंद गजानन पुंड



(भाग २३)

श्री ढुंढिराज स्वरूपात वेद, शास्त्र, पुराणे, ईश्वर, महेश्वर तुझ्या स्वरूपाचा अंतपार शोधत राहतात आणि त्यांनाही तो प्राप्त होत नाही हे सांगितल्यावर परमेश्वरांनाही परमपूज्य असणाऱ्या मोरयाबद्दल पुढे बोलताना श्री अंकुशधारी महाराज म्हणतात,

**हरिहररविमुख्याश्चेश्वरा देवदेवा ।**
**न हि तव गुणपारं लेशमात्रं प्रयान्ति ॥**
**इति वदति परा सा वेदवाङ् निश्चयेन ।**
**कथमहमथ पारं यामि भो विघ्नराज ॥४२॥**

**हरिहररविमुख्याश्चेश्वरा देवदेवा** - हे देवांचाही देव असणाऱ्या भगवान श्री गणनाथा, हरी म्हणजे भगवान विष्णू, हर म्हणजे भगवान शंकर, रवी म्हणजे भगवान सूर्य इत्यादी प्रमुख देवदेखील,

**न हि तव गुणपारं लेशमात्रं प्रयान्ति ॥**

तुझ्या गुणांचा किंचित्‌देखील पार पावत नाहीत. अर्थात्‌ त्यांनासुद्धा तुझ्या अनंत, अपार गुणांची गणना करता येत नाही. त्याचा अंतपार लागत नाही.

मोरयाचे एक सुंदर नाव आहे धूम्रवर्ण. मोरयाच्या अंतरंगाचा विचार तर दूर, बाह्य दृश्य शरीरातील सगळ्यात पहिले दिसणारी गोष्ट म्हणजे त्वचेचा रंग म्हणजे वर्णदेखील धुराप्रमाणे असल्याने त्याच्या पलीकडचे दिसत नाही म्हणून मोरया धूम्रवर्ण.

**इति वदति परा सा वेदवाङ्निश्चयेन ।**

सगळे वेदवाङ्य अर्थात संहिता, अरण्यक, ब्राह्मण आणि उपनिषद हे सर्व ग्रंथ निश्चयाने हेच सांगतात.

कथमहमथ पारं यामि भो विघ्नराज - मग हे विघ्नराजा! आता मी आपल्या गुणांचा पार कसा जाणू शकेल? मोरयाच्या जाणून घेण्याला मर्यादा असल्यामुळे त्याच्या सर्वश्रेष्ठत्वाला मानून मोकळे होणे हाच सर्वांत चांगला मार्ग. शरणागती हाच उपाय सांगताना म्हणतात,

**श्रुतिपद-करजातं वाग्भवं धीभवं च ।**
**मनसिजमथ यद्यज्ज्ञानतोऽज्ञानतो वा ॥**
**मम भवति हि तत्तज्जाग्रदादौ च कर्म ।**
**तव चरणसरोजेष्वर्पितं चास्तु ढुंढे ॥४३॥**

**श्रुतिपद-करजातं वाग्भवं धीभवं च ।**

श्रुती म्हणजे कान. त्यांनी जे ऐकले ते. पद म्हणजे पाय. त्यांनी जी हालचाल केली ती. कर म्हणजे हात. त्यांनी केलेली कार्ये. वाणी अर्थात; बोलतो ते. धी म्हणजे बुद्धी. अर्थात जो विचार केला.

**मनसिजमथ यद्यज्ज्ञानतोऽज्ञानतो वा ॥**

मनामध्ये जे चिंतन केले, ते आजपर्यंत जाणूनबुजून किंवा न जाणता,

**मम भवति हि तत्तज्जाग्रदादौ च कर्म ।**

ते ते माझे जागृत इत्यादी म्हणजे स्वप्न आणि सुषुप्ती अवस्थेतील देखील सर्व कर्म,

**तव चरणसरोजेष्वर्पितं चास्तु ढुंढे** - हे ढुंढिराजा तुझ्या चरण कमलावर समर्पित असो.

श्री अंकुशधारी महाराज म्हणतात शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक अशा तीनही स्तरांवर आपल्या द्वारे जे जे कर्म घडते, अगदी कळत म्हणजे समजून उमजून केलेले असो किंवा न कळत म्हणजे अजाणतेपणे झालेले असो, स्वप्नात किंवा गाढ निद्रेत झालेले असो, ते सर्व कर्मदेखील मोरयाचरणी समर्पित करणे हाच शांतीचा खरा मार्ग आहे. ●●

९८२२६४४६११

**(लेखक गाणेश ज्ञान प्रबोधक उपाधीने सन्मानित आहेत)**

# राम राम रमु, राम राम रटु, राम राम...!



रामचरितमानस (भाग ४)

**राम राम रमु, राम राम रटु, राम राम जपु जीहा ।**
**रामनाम-नवनेह-मेहको, मन !**
**हठि होहि पपीहा ॥१॥**
**सब साधन-फल कूप-सरित-सर,**
**सागर-सलिल-निरासा ।**
**रामनाम - रति-स्वाति-सुधा-**
**सुभ-सीकर प्रेमपियासा ॥२॥**
**गरजि, तरजि, पाषान बरषि पबि,**
**प्रीति परखिजिय जानै ।**
**अधिक-अधिक अनुराग उमँग उर,**
**पर परमिति पहिचानै ॥३॥**
**रामनाम - गति, रामनाम - मति,**
**रामनाम-अनुरागी ।**
**है गये, हैं, जे होहिंगे, त्रिभुवन**
**तेइ गनियत बड़भागी ॥४॥**
**एक अंग मग अगमु गवन कर,**
**बिलमु न छिन-छिन छाहैं ।**
**तुलसीहित अपनो अपनी दिसि,**
**निरुपधि नेम निबाहैं ॥५॥**
**(गोस्वामी तुलसीदास)**

जिव्हे..! रमायचं ते रामनामातच, रटायचं तर राम राम अन्‌ जप करायचा म्हटलं तर तो रामनामाचाच हे नक्की ठरवून टाक. हे मना! तू सुद्धा रामनामाच्या प्रेमरूपी मेघाची चातक जशी प्राणपणानं वाट पाहतो, त्याला कुठलंही पाणी नको - स्वाती नक्षत्रातलं पावसाचं पाणीच हवं, त्या निष्ठेनं अन्‌ आतुरतेनं चातक होऊन जा. ज्याप्रमाणे चातकाला विहीर, नदी, तलाव आणि समुद्रातलं सुद्धा पाणी नको असतं. त्याला हवा एक थेंब, तो पण नेमका स्वाती नक्षत्रातल्या पावसाच्या पाण्याचा - तो मिळाला नाही तर तो तसाच तहानलेला प्राणत्याग करतो तसाच मुक्तीची शेकडो साधनं असली तरी ती आपल्याला नको. कुठल्याही फळाची आशा नको. फक्त रामनामाच्या भक्तिरूपी अमृतासारखं मधुर नामच घेणार हा निश्चय असू दे.

मना...! पहा चातकाची किती कठीण परीक्षा असते, त्याचा प्रियकर मेघ केवढ्याने गर्जना करतो, कठोरपणे दरडावतो, कधी गारांचा वर्षाव करतो या सर्व कसोट्यांवर उत्तीर्ण झाल्यानंतर तो प्रेमी चातकाच्या प्रेमाची परिसीमा पारखून घेतो आणि खात्री करून घेतो, 'या चातकाच्या हृदयात माझ्याबद्दल केवढं प्रगाढ प्रेम आहे' हे सारं निरखून झाल्यानंतर कुठे त्याला स्वाती नक्षत्रातला पावसाचा तो थेंब मिळतो.

म्हणून अगणित अडथळे येवोत, त्यांना न जुमानता रामनामाला शरण जा. बुद्धी लावायची ती रामनामातच आणि रामनामावरच नितांत प्रेम असू दे. रामनामावर प्राणाहून अधिक प्रेम करणारे जे अनन्य भक्त आजवर होऊन गेले, जे विद्यमान आहेत आणि या पुढे जे होतील, ते खरोखरच परमभाग्यवान म्हणावे, कारण त्रैलोक्यात त्यांचंच नाव अमर होणार आहे.

हा एकांगी मार्ग फार कठीण आहे. नशीबानं हा मार्ग तुला सापडला तर या खडतर मार्गावर क्षणाक्षणाला सावलीत थांबणं, विश्राम करणं, ठिकठिकाणी रेंगाळत विलंब करू नकोस. हे तुलसीदासा...! तुला जर तुझं कल्याण व्हावं, अशी अनावर तहान असेल, तर तुझं प्रभूवर निस्सीम प्रेम निभावता आलं पाहिजे. याशिवाय कल्याणाचा अन्य कोणताही मार्ग नाही. ●●

**डॉ. शरद कळणावत**

# पितृपक्ष : शास्त्र आणि वर्तमान

अनंत चतुर्दशी झाली की पौर्णिमेनंतर दुसऱ्या दिवशी भाद्रपद कृष्णपक्ष सुरू होतो. कृष्णपक्षातील हे पंधरा दिवस पितृपंधरवडा, महालय किंवा पितृपक्ष म्हणून ओळखले जातात. ग्रामीण भागात यालाच म्हाळ असेही म्हटले जाते. पितृपक्षाविषयी शास्त्रात काय सांगितले आहे, याची नेमकी माहिती नसल्यामुळे हल्ली वर्तमानात अनेकांचा गैरसमज होताना दिसतो. त्यातील सर्वात महत्त्वाचा गैरसमज म्हणजे हा काळ शुभ नसतो हा होय. वास्तविक पितृपक्ष हा शुभकाळच आहे. वर्ज्य काळ नाही. तसे असण्याचे काहीच कारण नाही. आपल्या पूर्वजांचे, पितरांचे श्रद्धेने आणि कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्याचा हा काळ. सदैव सत्कर्म करून पितरांना उत्तम गती लाभण्यासाठी प्रार्थना करण्याचा हा काळ. अशा या उत्तम काळाला विनाकारण वर्ज्य वा अशुभ ठरवण्यामागे शास्त्राबद्दलचे अज्ञान आणि नेमके जाणून घेण्याच्या जिज्ञासेचा अभाव हे घटक कारणीभूत असावेत असे वाटते.

श्रद्धेने केले जाते ते श्राद्ध या उक्तीचा उचित भाव लक्षात घेता श्राद्ध हे श्रद्धावानांसाठीच आहे. पितृपक्ष हा वादाचा किंवा अश्रद्धेचा आणि अंधश्रद्धेचा तर मुळीच विषय नाही. उलट, जिज्ञासूंनी या परंपरामागील वैदिकविज्ञान जाणून घेतले तर अधिक योग्य होईल.

आपले पितर म्हणजे आई-वडील, आजी-आजोबा ज्या तिथीला निवर्तले असतील, त्या तिथीला भाद्रपद कृष्णपक्षात श्राद्ध करण्याचा पूर्वापार प्रघात आहे. पूर्वापार म्हणजे किती? तर वेदकालीसुद्धा पितरपूजा करण्याची पद्धत असावी, असे काही ऋचांवरून सिद्ध होते. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात अशी प्रार्थना आहे, 'पितृभ्य नमो अस्त्वद्य ये पूर्वासो य उपरास इयु:' या प्रार्थनेचा अर्थ असा की, जे पूर्वकाली गेले आणि जे अलिकडच्या काळात गेले, त्या पितरांना प्रणाम असो. ऋग्वेद काळानंतरच्या अथर्ववेदकाळात तर पितरांसाठी पिंडोदक किंवा आहुती देण्याकरिता शिजविण्यात येणाऱ्या अन्नाला उद्देशून केलेली प्रार्थना आढळते. श्राद्ध आणि पिंडदान पद्धतीचा विस्तार त्याकाळी झाला याचेच हे द्योतक होय. वेदांना श्राद्ध अपेक्षित होते ते हवनाच्या माध्यमातून. हवन म्हणजेच यज्ञाच्या निमित्ताने जप-



तप, दानधर्म या सत्कर्मांची जोड दिली की पितर तृप्त होतात, अशी मान्यता आहे. पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या मते, पितृपक्षातील श्राद्ध हा खरे तर भारतीय संस्कृतीतील सूक्ष्म आणि विस्तृत असा महत्त्वाचा संस्कार आहे.

हिंदू धर्मानुसार पुनर्जन्म आहे, याला साधार मान्यता आहे. त्याचे तपशीलवार, चिकित्सापूर्वक विश्लेषणही धर्मशास्त्रात केले आहे. ज्याच्या-त्याच्या कर्मानुसार जीवात्म्याला उत्तम, मध्यम व कनिष्ठ योनीत जन्म प्राप्त होतो. स्वर्ग किंवा नरकवासही बऱ्यावाईट कर्माप्रमाणे घडतो, असे म्हटले आहे. जीव ज्या मार्गाने जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त होतात त्या मार्गाला देवयान हे नाव दिले आहे. आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास हा प्राज्ञ पाठशाळा वाई यांनी प्रकाशित केलेला ग्रंथ जिज्ञासूंनी मुळातून वाचावा. या ग्रंथात ऋग्वेदी यांनी म्हटले आहे की, ब्रह्माची उपासना केल्यास देवयान मार्गाची प्राप्ती होते आणि तो क्रमाक्रमाने पार करावा लागतो. अग्नी, तेज, दिवस, शुक्लपक्ष, उत्तरायणाचे सहा महिने, देवलोक, आदित्यलोक, चंद्रलोक, विद्युल्लोक आणि शेवटी ब्रह्मलोक. ब्रह्मलोकाला पोहोचलेल्या ब्रह्मज्ञानींची पुनर्जन्मातून मुक्ती होते. याउलट, पितृयान मार्गाचा अवलंब करणारे धूमलोक, रात्र, कृष्णपक्ष, दक्षिणायनाचे सहा महिने, पितृलोक, आकाश व शेवटी चंद्रलोकात पोचतात. जीवात्मे चंद्रलोकांत पोहोचल्यानंतर तिथून स्वर्गात जातात. तिथे पुण्याचा साठा संपताच खाली उतरता उतरता स्वर्गातून चंद्रलोक, आकाश, वायुलोक, मेघ, वृष्टिजल, वनस्पती, अन्न आणि अन्नातून पिंडरूपाने पुनर्जन्म पावतात. पितर चंद्रलोकात पोचल्यानंतर तेथील अमृतान्न सेवन करून निर्वाह करीत असतात. हे अमृतान्न चंद्रकलेबरोबर कृष्णपक्षात क्षीण होत जाते म्हणून कृष्णपक्षात त्यांच्या वंशजांनी अन्न पोहोचवावे यास्तव श्राद्ध आणि पिंडोदकाची योजना आहे. अमावास्येला तर पितृकार्य अवश्य केले पाहिजे, असे शास्त्रात म्हटले आहे. मनुष्य निवर्तल्यानंतर एका वर्षाने चंद्रलोकास जाऊन पोहोचतो, तोपर्यंत जिवात्म्यास अन्नोदकाचा लाभ व्हावा म्हणून त्याच्या नावाने वर्षभर श्राद्ध करावे, असा उल्लेख गरुडपुराणातही आढळतो.

पितर आपले कधीच वाईट करत नाहीत. परंतु ज्या पूर्वजांनी आपल्यासाठी कष्ट वेचले, देह झिजवला, कल्याण आणि शुभ चिंतिले त्या पूर्वजांचे, पितरांचे श्रद्धेने स्मरण नको का करायला? ते जिथे असतील, तिथे त्यांच्या आत्म्यास सुखशांती लाभावी यासाठी पिंडदान, तर्पण करायचे. तेच श्राद्ध. ज्यांना वयोमान किंवा परिस्थितीमुळे हे विधी शक्य नसतील त्यांनी पितरांचे स्मरण करून कृतज्ञतापूर्वक त्यांना हात जोडले तरी भाव पोचतो. मुळात महत्त्वाचे काय तर कृतज्ञता या मूल्याचा विसर पडायला नको. आज आपण बघतो की, जगाला विलक्षण वेग आलेला आहे. नात्यातल्या जिवंत माणसांकडेच बघायला लोकांना वेळ नाही. आई-वडिलांच्या अंत्यविधीला, रक्षा आणि अस्थिविसर्जनाला सुद्धा परदेशस्थ आणि देशात सुदूर असलेली मुले उपस्थित राहू शकत नाहीत अशी उदाहरणे घडतात. हे असे का घडते? तर संस्कार, संवाद आणि प्रेमाच्या अभावामुळे. आपल्याच जन्मदात्या किंवा नात्यातल्या व्यक्तींबद्दल प्रेम नसल्याने हा दुरावा निर्माण होतो. ही एक सामाजिक समस्या आहे. कुटुंबं विभक्त झाली आणि प्रेमाला दुरावली. कर्तव्यभावनेचा ऱ्हास तर त्याआधीच झाला. अशा स्थितीत कृतार्थता, कृतज्ञता ही भावना किंवा त्याबद्दलची जाणीव कशी निर्माण होणार? ती निर्माण होण्यासाठीच श्राद्धाचा आग्रह धरला पाहिजे. आम्ही का करायचे श्राद्ध? असा प्रश्न आजच्या तरुण पिढीला पडू शकतो. त्यांच्यासाठी सांगण्यासारखे खरे तर भरपूर आहे.

संन्यासी आणि जीवन्मुक्तांचे श्राद्ध करण्याची गरज नसते. स्वतःच स्वतःचे श्राद्ध करण्याचा पर्यायदेखील उपलब्ध आहे. रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक प. पू. मा. स. गोळवलकर गुरुजी यांनी स्वतःच स्वतःचे श्राद्ध केले होते.

आपल्यावर काही ऋण असतात, असे हिंदू धर्म सांगतो. देवऋण, ऋषीऋण, गुरूऋण, पितृऋण इत्यादी. या ऋणांमधून अल्पस्वल्प का होईना, मुक्त व्हायचे असते. पितृपक्ष हा पितृऋणातून मुक्त होण्याचा काळ असतो, असे स. कृ. देवधर यांनी म्हटले आहे. आज वर्तमानात अत्यंत धावपळीच्या युगातही आपण पितरांचे श्राद्ध करण्यासाठी वेळ द्यायला हवा. काळाला अनुसरून हल्ली अनेक जण शैक्षणिक किंवा सामाजिक संस्थांना, विविध सेवाकार्याला दानस्वरूपात वस्तू किंवा देणग्या देत असतात. आपल्या पितरांच्या स्मृत्यर्थ असे लोककल्याणकारी दान उचितच म्हणता येईल. या संदर्भात एक निरीक्षण नोंदवावेसे वाटते. बरेचदा आपण महानगरीय व शहरी लोक पितरांचे श्राद्ध करण्याची इच्छा मनी बाळगून असलो, तरी प्रत्यक्षात ते आपल्याकडून पूर्ण होईलच असे नाही. परंतु आजही महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांतील ग्रामीण भागात पितृपक्षातील श्राद्ध श्रद्धा आणि प्रेमपूर्वक तसेच कर्तव्यभावनेने करण्याची परंपरा आजची पिढीदेखील सांभाळते आहे, पुढे नेते आहे. या परंपरेमागील भाव आणि वैदिकविज्ञान समजून घेत सर्वांनीच कालसुसंगत राहून आपल्या पितरांचे कृतज्ञतापूर्वक, प्रेमाने स्मरण केले आणि हाच संस्कार पुढल्या पिढीत रुजवला तर कालचक्रातील एका महान संकल्पनेच्या सकारात्मक ऊर्जेने पूर्वजांचा, आपला आणि आपल्या वंशजांचाही कालगतीतील प्रवास सुखकारक होईल, असे निःसंशय म्हणता येईल. ●●

**सुनील शिनखेडे**
९९७५२६५२९३

## मानदंड संस्कृतीचे

डॉ. राजेंद्र नाईकवाडे/९८५०३५१०२५

# महात्मा बसवेश्वर : भाग २



(भाग ८)

भक्तितत्व हे बसवण्णांच्या वचनविचारांतील एक महत्त्वपूर्ण तत्त्व आहे. त्याचाही विसर आजच्या चंगळवादाच्या कथित आधुनिक काळात पडू देऊ नये. सगळ्याच विचारांच्या पंथांच्या व पक्षाच्या लोकांना त्याची नितांत गरज आहे. भारताचे माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी आपल्या Transcendence : माल स्पिरिच्युअल एक्सपिरियन्स वीथ प्रमुख स्वामीजी (२०१५) या अलिकडील ग्रंथात पानापानांवर आध्यात्मिक विचारांचे आधुनिक युगातील महत्त्व विशद केले आहे. भारतातबदल घडवून आणण्यासाठी आवश्यक त्या पाच गोष्टींचा तू उल्लेख केलास. मी त्यात सहाव्या गोष्टीची भर घालतो. ईश्वरावर दृढ विश्वास आणि आध्यात्मिकदृष्ट्या लोकांचा विकास ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. हा स्वामीजींचा उपदेश शिरसावंद्य मानणारे व त्या दृष्टिकोनाचा प्रचार करणारे थोर, शास्त्रज्ञ कलाम भक्तितत्त्वाचेच महत्त्व आजच्या युगात अधोरेखित करण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण ते म्हणजे आधुनिक काळातील समाजसुधारकांच्या चौकटीत बसणारे जडवादी विचारांचे 'सुधारक'च केवळ नव्हते, तर ते एक धर्मप्रवण, अध्यात्मप्रवण असे आध्यात्मिक विभूती होते. समाजातील वाईट रूढीपरपरांचा विरोध हा त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा भाग होता, परंतु कथित आधुनिक बुद्धिवाद्यांप्रमाणे ते कोरे व्यवहारवादी, विज्ञानवादी इत्यादी नव्हते! त्यांच्या जीवनाचे आध्यात्मिक अधिष्ठान कधीही ढळले नाही. साधना-आराधना हा त्यांच्या व्यक्तित्वाचा पाया होता, हे विसरून चालणार नाही. त्यांना आपल्या आजच्या स्वार्थांध व भोगलोलुप पातळीवर आणून त्यांच्या कार्याचा व विचारांचा वाट्टेल तसा अर्थ लावणे इष्ट नाही. बसवांनी त्यांचे वर्णन 'बसव म्हणजे भक्तीचा फुललेला बहर' असे केले आहे, तर सिद्दरामाने 'मूर्तिमंत भक्ती म्हणजे मूर्तिमंत आनंद म्हणजेच बसवण्णा' असे त्यांच्याबद्दल म्हटले आहे.

बसवण्णांच्याही अनेक वचनांमधून भक्तिरस सतत पाझरताना दिसतो. नारदीय भक्तिसूत्रात भक्तीला प्रेमाची सर्वोच्च अवस्था म्हणून संबोधतांना 'ईश्वरावरील अविचल आणि निःस्वार्थ प्रेम म्हणजे भक्ती' अशी व्याख्या केलेली आहे. त्या उत्कट भक्तीचा प्रत्यय त्यांच्या अनेक वचनांमधून येतो म्हणूनच त्यांच्यासाठी वापरले जाणारे 'भक्तिभंडारी' हे विशेषण सार्थ ठरते. तुम्ही माझे बाप। तुम्ही माझी माय।

**आप्तेष्ट गोत्रावळा। तुम्ही देवा।**
**कोणी सगा सोयरा। नाही तुम्हांविण।**
**मर्जीप्रमाणे ठेवी मला। हे कुडलसंगमदेवा।**

या त्यांच्या उद्‌गारांचे प्रतिध्वनी आपल्याला पुढील वारकरी संतांच्या वा भारतातील विविध भाषांतील संतांच्या भक्तिकाव्यांमधूनही ऐकायला येतात. भक्त आणि भगवंताच्या परम ऐक्याचे साक्षात्कारी स्वरूप वर्णन करताना बसवण्णा म्हणतात-

**उर्वसि अंतिम सत्‌ पहा**
**सारा काळोख नष्ट झाला आहे**
**तेज प्रकाशसिंहासनी अधिष्ठित आहे**
**कुडल संगमेश्वरालाच केवळ ठावे**
**ही लिंगैक्याची पहाट आहे**

द्वैताकडून अद्वैताच्या अनुभूतीकडे होणारा भक्त संताचा हा प्रवास भारतीय संतकाव्यातला चिरपरिचित स्वर आहे. हीच भारतभूमीच्या संस्कृतीची एकात्मतेची महान सूत्रे आहेत आणि अर्थात बसवण्णाही त्याच भक्तिसूत्रांशी आपल्याला जोडताना दिसतात. भौतिकतेत लोळणाऱ्यांना महापुरुषांचा शाश्वत उपदेश दिसत नाही, ते राजकीय शेकण्यासाठी अकारण किंचाळत बसतात. 'स्व'ची उन्नती साधणे, महात्म्यांनी दाखविलेल्या मार्गावरून स्वतः चालणे जेव्हा कठीण होऊन बसते, तेव्हा मग कर्णकर्कश गदारोळ करून प्रसिद्धीलोलुप मंडळी त्यातच जीवनाची इतिकर्तव्यता शोधू पाहतात. आज समाजात जातिभेद, स्त्री-पुरुषभेद, रूढीग्रस्तता, उच्चनीच भाव इत्यादी गोष्ट फारशा विद्यमान नसताना उगीच त्यावर पढीक पुस्तकी पद्धतीने किंचाळत बसणे म्हणजे महात्म्यांच्या खऱ्या आचरणसापेक्ष वचनांकडे पाठ करण्यासारखे आहे. कुणाच्या तरी विरोधात स्वतःच्या विचारांची मांडणी करणाऐवजी स्वतःच्या, पंथाच्या व एकूण समाजाच्या उन्नतीसाठी बसवांसारख्या महात्म्यांचे विचार सकारात्मक व समन्वयात्मक पद्धतीने मांडले गेले पाहिजे. शेवटी प्रेमाने, सकारात्मक पद्धतीने विचार मांडूनच समाजमानस आपलेसे करता येते. छोट्याछोट्या गोष्टींवरून सर्वसामान्य जनतेवर टीकाटिप्पणी करून व त्यांच्या श्रद्धांचा मानभंग करून गोष्टी जनमनापर्यंत पोहोचवता येऊ शकत नाहीत. संत ज्ञानदेवांनी मांडलेला चिद्विलासवादाचा सिद्धांत बसवांच्या वचनांतून कुठेतरी मूर्त होताना दिसतो!

**जेथे पाहे तेथे, तू आहेस देवा**
**अवकाशव्याप्त, तुझा आकार**
**तूच नेत्र विश्वाचे, मुखही तूच**
**साऱ्यांचे बाहू तूच आणि चरणही तूच देवा**
**हे कुडलसंगमदेवा, सर्वत्र तूच!**

ही चराचरांत ईश्वराची अनुभूती देणारे तत्त्व जर बसवेश्वर मांडत असतील, तर त्यातून ईशावास्योपनिषदातील मंत्राचे ईशावास्य मिदं सर्वं यत्किंच्य जगत्यां जगत्। तेन त्यक्तेन भुंजिथा: मा गृध् कस्यस्विद् धनम् हे सूर कुणाला ऐकू आले, तर त्यातील सुसंवादाच्या सुरांचे स्वागतच करायला हवे! बसवांसारखा पंथप्रवर्तक महापुरुष कुणा एखाद्या जातीच्या, पंथाच्या वा धर्माच्या विरोधात नसतो, तर तो एकूणच संस्कृतीपरंपरांच्या विकृत रूपांच्या किंवा अपसंस्कृतीच्या, अनीतीच्या विरोधात असतो. पढीक-पांडित्याला ते थोर मानत नसतात, मग ते तत्कालीन धर्ममार्तंडांचे असो किंवा आजच्या कथित पुरोगाम्यांचे असो! 'वेदांचा तो अर्थ आम्हासचि ठावा, येरांनी वहावा भार माथा' हे तुकोबांचे वचन किंवा 'फोले पाखडिता तुम्ही, निवडितो ते सत्त्व आम्ही निके' हे केशवसुतांचे काव्योद्गार, कविहृदयाचे सच्चे मनिषी, अशाच शब्दांत आपल्या परखड भावना व्यक्त करतात. जसे बसवेश्वर सांगतात-

**'वेदांच्या शास्त्रांच्या भाटांना मी थोर मानीत नाही भ्रांतीच्या बुरख्याआड दडलेल्यानंतरही मी थोर मानीत नाही'**

इथे महात्म्यांची वचने जपून, नाजूक हातांनी समजून घेतली पाहिजे. 'भाटांना' व 'भ्रांतीच्या बुरख्याआड दडलेल्यांना' म्हणजे क्रियाशून्य वाचाळांना इथे ते टीकेचे लक्ष्य करीत आहेत, असे दिसते. कोरड्या आचरणरहित ज्ञानाला बसवांच्या लेखी असणारे गौणत्व आपण आजच्याही काळात लक्षात घेतले पाहिजे.

म. बसवेश्वरांचे विचार आणि कार्य म्हणजे 'हरी अनंत हरीकथा अनंता!' ज्ञानक्षेत्राला पुरून उरणारे हे व्यक्तित्व आहे. त्यांनी मांडलेला 'कायकाचा सिद्धांत' निरपेक्ष अशा श्रमनिष्ठेचा, जाती-व्यवसायसापेक्ष श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या कल्पनेविरूद्धचा, निखळ कर्मयोगाचा सिद्धांत आहे. त्याचे प्रतिध्वनी आपल्याला गांधीजींच्या विश्वस्त संकल्पनेत व इतर विचारांमधे दिसून येतात. आपले सगळे विचार बसवांनी 'गद्यकाव्य' स्वरूपाच्या वचनसाहित्यातून थेटपणे, प्रभावीपणे, नेमकेपणे मांडलेले आहेत. काव्याची भावमधुरता आणि गद्याची संथ लय यांचा समसमा संयोग यातून दिसतो. जीवनातल्या विविध पैलूंवर मार्गदर्शन करणाऱ्या एका आत्मानुभवी संत सत्पुरूषाच्या अलौकीक कार्याचा आलेख त्यांच्या वचन-वाङ्मयातून पाहायला मिळतो. सरतेशेवटी समकालीन समाजधारणेचा, विचार करता बसवेश्वरांचे सारे तत्त्वज्ञान आजच्या चंगळवादाच्या झंझावातात स्वतःस सावरण्यासाठी आहे! कविवर्य मर्ढेकरांनी ईश्वराजवळ पसायदान मागताना म्हटले आहे, धैर्य दे अन्‌ नम्रता दे/ पाहण्या जे जे पाहणे/वाकू दे बुद्धीस माझ्या/तप्त पोलादाप्रमाणे/घेऊ दे आघात तीते/ इंद्रियद्वारा जगाचे/पोळू दे आतून मीते/गा अतिंद्रियार्थ आचे. कवी, तत्त्वज्ञ, समाजसुधारक, वीर योद्धा, योगी, पंथप्रवर्तक, अध्यात्मपुरुष आदि पैलूंनी युक्त असणाऱ्या म. बसवेश्वरांचेही ह्याच अर्थाचे एक वचन आहे, आजपासून आठशे-नऊशे वर्षांपूर्वीचे ! पण आजही तेवढेच प्रासंगिक!-

**माझे मन वितळव**
**आणि मुशीतून काढ**
**त्यातील हीण नष्ट कर**
**अग्नीत तप्त करून**
**त्याला शुद्ध कर**
**टाकीचे घाव घालून**
**त्याला कळेतून जाऊ दे**
**मग, सोने जसे शुद्ध होते**
**तसे माझे हृदय शुद्ध होईल.**
**हे उत्कृष्ट कारागिरा**
**माझ्या शिवाच्या पायातील पैंजण बनव**
**हे कुडलसंगमदेवा, मला वाचव.**
**(बसवेश्वर, पृ. ४५)**

**(लेखक समरसता साहित्य परिषदेचे महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य आहेत)** ●●

# भाजपची सेवा पंधरवाडा अभियानानिमित्त कार्यशाळा संपन्न

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवाडा




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ सप्टेंबर**
देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान देशभरात सेवा पंधरवाडा आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून हिंगोली भाजपाची या अभियानाची जिल्हा कार्यशाळा आज रोज शुक्रवार दिनांक १२ सप्टेंबर रोजी हिंगोली येथील संपन्न झाली.

या कार्यशाळेचा शुभारंभ भारत माता, शामाप्रसाद मुखर्जी आणि दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमा पूजन करुन करण्यात आले. राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवाभावी उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात येणार आहेत. यात प्रामुख्याने स्वच्छता अभियान हे बूथ स्तरावर राबवण्यात येईल. वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, दिव्यांगाचा सन्मान, विकसित भारत चित्रकला स्पर्धा, पंतप्रधान नरेंद्र मोदींजींच्या जिवनावर प्रदर्शनी अशा कार्यक्रमांचे नियोजन बुथ स्तर व मंडल स्तरावर मोर्चा, आघाडी यांच्या माध्यमातून करण्यात येईल. युथ मॅरेथॉनचे आयोजन युवा मोर्चाच्या माध्यमातून करण्यात येईल. पंडीत दिन दयाळ जयंती-२५ सप्टेंबर आणि महात्मा गांधी जयंती- २ ऑक्टोबर हे कार्यक्रम मंडल स्तरावर राबवण्यात येतील, यावेळी या संदर्भातील १३ मंडलात कार्यशाळा सुद्धा १६ सप्टेंबर पर्यत संपन्न होतील असे नियोजन करण्यात भारतीय जनता पार्टी हा पक्ष इतर पक्षांपेक्षा वेगळा पक्ष आहे. इतर पक्ष हे निवडणुकीतच जनतेसमोर जातात परंतु भाजपा कार्यकर्ता वर्षाचे ३६५ दिवस अशा अभियानाच्या माध्यमातून जनतेच्या संपर्कात असतो. भाजपाची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी हे अभियान बुथ स्तरावर यशस्वी करणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. तसेच पदाधिकाऱ्यांना दिलेल्या संघटनात्मक जबाबदारीचा आढावा घेतला याप्रसंगी व्यासपीठावर संघटनमंत्री संजय कौडगे जिल्हा अध्यक्ष गजाननराव घुगे आमदार रामराव वडकुते,माजी जिल्हा अध्यक्ष फुलाजीराव शिंदे, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, खोबराजी नरवाडे यांच्यासह उज्वला तांभाळे, गुरु पादेश्वर, संतोष सोमाणी, प्रिती जैस्वाल क्रुष्णाताई रुहीटीया, अंकुश आहेर, सुरजित सिंग ठाकुर दिलीप देसाई, उमेश सोमाणी, शशीकांत वडकुते, राहुल मेने, रामकिसन पठाडे, नंदकिशोर खिल्लारे, संदीप वाकडे राजु आहेर, सर्जेराव दिंडे, रजनिश पुरोहीत, विठ्टल भोयर, अशोक नावडे आदी उपस्थित होते.



# हिंगोलीत दोन दिवसांत मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ सप्टेंबर**
मागील दोन दिवसांपासून हिंगोली शहरासह परिसरात वीजेच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडत आहे. या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून सोयाबीन, हळद, केळी तसेच इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी झाली. त्यामुळे जिल्ह्यातील इसापूर, सिध्देश्वर तसेच येलदरी धरणे पूर्ण क्षमतेने भरले. धरणातून पाण्याचा मोठा विसर्ग करण्यात आला होता. शेतामध्ये पाणी साचल्यामुळे सोयाबीन, मुग, तूर, कापूस, हळद तसेच केळी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. ऑगस्ट महिन्यापासून ते आतापर्यंत जिल्ह्यात पावसाचा मुक्काम कायम असून या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाल्याचे पहावयास मिळत आहे.

पोळा, महालक्ष्मी तसेच गणेशोत्सवाच्या काळातही अधूनमधून पावसाने चांगलीच हजेरी लावली. त्यामुळे छोटे छोटे व्यापारी तसेच दुकानदारांचे मोठे नुकसान झाले आहे. पावसामुळे ग्राहक नसल्यामुळे बाजारात खरेदीसाठी गर्दी होत नव्हती. परिणामी व्यापाऱ्यांनी सणासुदीच्या खरेदी केलेला माल तसाच पडून असल्यामुळे छोट्या व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

दुसरीकडे जिल्ह्यात सप्टेंबर महिन्याचा दुसरा आठवडा आला तरीही पावसाचा मुक्काम अजूनही कायम आहे. गुरूवारी सकाळी आणि शुक्रवारी दुपारी एक ते दोन तास मुसळधार पाऊस पडला. या पावसामुळे बाजारातील रस्त्यांवर पाणी साचले तर छोट्या व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. शेतामध्ये अजूनही पाणी साचल्यामुळे शेतीतील पिके पिवळे पडत आहेत. काढणीला आलेले सोयाबीनचे नुकसान होत आहे. शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे शेतीची कामे करणे अवघड झाले आहे. मागील दोन दिवसांपासून पुन्हा हिंगोली शहरासह परिसरात मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे शेतकरी, व्यापारी तसेच सर्वसामान्य माणसाचे जीवन विस्कळीत झाल्याचे दिसत आहे.

# एसटी प्रवर्गातून आरक्षणासाठी बंजारा समाजाचा औंढ्यात रास्तारोको



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ सप्टेंबर**
मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे महाराष्ट्र शासनाने घोषित केलेल्या हैदराबाद गॅझेटनुसार मराठा समाजाला कुणबी मराठा म्हणून आरक्षण दिल्यास, महाराष्ट्रातील सर्व बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एस टी) प्रवर्गात आरक्षण द्या, या मागणीसाठी बंजारा समाज बांधवांच्यावतीने औंढा-जिंतूर रोडवर एकतास रास्तारोको आंदोलन केले. यावेळी औंढा, छत्रपती संभाजी नगर, जिंतूर, नांदेड, हिंगोली रस्त्यावरील वाहतूक ठप्प झाली होती. रास्ता रोको संपल्यानंतर महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन यांना निवेदन देण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील सर्व बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एस टी) प्रवर्गात आरक्षण देण्यात यावे. बंजारा समाज अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात अनुसूचित जमातीच्या प्रवर्गात समावेश करण्यासाठी संघर्ष करत आहे. आमची संस्कृती, भाषा आणि जीवनशैली ही आदिवासी जमातीशी जुळते. त्यामुळे, बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा मिळालाच पाहिजे. औंढा नागनाथ तालुक्यातील धार फाटा येथे ११ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते १२ या दरम्यान एक तास आरक्षणासाठी बंजारा समाज बांधवांनी रास्ता रोको आंदोलन केले.

धारफाटा येथील रास्तारोकोत बंजारा समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रास्ता रोकोस पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, पोलीस उपनिरीक्षक दत्ता कानगुले, पोलीस उपनिरीक्षक शेख खुदुस यांच्यासह पोलीस कर्मचारी व होमगार्ड यांनी बंदोबस्त दिला होता.

# बनावट दस्तावेज दाखल करून बदलीचा लाभ घेणाऱ्यांची चौकशी करा- पठाण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ सप्टेंबर**
हिंगोली जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण संवर्ग-१ व संवर्ग-२ च्या शिक्षकांनी बदलीसाठी दिव्यांग, एंजोओप्लास्टी, एंजोग्राफी, बायपास सर्जरी, घटस्फोटीत यासह विविध खोटे बनावट दस्तावेज जोडून रस्त्यालगत असलेले गावे मिळविण्यासाठी शक्कल लढविलेल्या शिक्षकांची चौकशी करून व संवर्ग-२ पती-पत्नी एकत्रीकरणामध्ये चुकीचे अंतर दाखवून लाभ घेतलेल्या जिल्ह्यातील शिक्षकांची ऑनलाईन प्रक्रिया सुरू असून ही बदली प्रक्रिया थांबवून पारदर्शक चौकशी करून बनावट दस्तावेज दाखल करणाऱ्यांची चौकशी करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मुनीर पठाण यांनी केली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### बासटवार कृषी केंद्राचा परवाना निलंबीत

हिंगोली- कृषी निविष्ठा विक्रीतील अनियमितता व शेतकऱ्यांच्या फसवणुकीसंदर्भात तक्रारीवरुन कृषी अधिकारी गुण नियंत्रण समीर वाळके यांनी बियाणे, कीटकनाशके कायद्यानुसार बासटवार कृषी विकास केंद्र हिंगोली या केंद्राची तपासणी केली असता यांच्याकडे साठापुस्तक नसणे, उगम प्रमाणपत्र विना माल विक्रीस ठेवणे, मुदतबाह्य निविष्ठांची शेतकऱ्यांना विक्री करणे इत्यादी गंभीर त्रुटी आढळून आलेल्या होत्या. त्यानुसार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी तालुका कृषी अधिकारी गुण नियंत्रण व बासटवार कृषी विकास केंद्र यांची सुनावणी घेऊन संबंधित विक्री केंद्राचे बियाणे व कीटकनाशक परवाना एक महिन्यासाठी निलंबित करण्यात आलेला आहे. तसेच रब्बी हंगामामध्ये सर्व कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी जिल्ह्यामध्ये गुणवत्तापूर्ण निविष्ठा शेतकऱ्यास विक्री कराव्यात. कोणीही बियाणे कायदा, कीटकनाशक कायदा व खत कायद्याचे उल्लंघन करणार नाही, याची काळजी घ्यावी, अन्यथा कायद्यान्वये कडक कारवाई करण्यात येईल, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

### आचार्य विनोबा भावे यांना अभिवादन



हिंगोली- स्वातंत्र्यसेनानी, भूदान चळवळीचे प्रणेते, आचार्य विनोबा भावे यांच्या १३० व्या जयंती निमित्त वसमत येथील सुप्रसिद्ध गंगाप्रसादजी अग्रवाल सर्वोदय कार्यालयत दि. ११ गुरुवारी अभिवादन करण्यात आले. सत्य, अहिंसा, शांतता आदी मूल्यांचा प्रचार आणि प्रसारार्थ कार्यरत महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने जयंती उपक्रम पार पडला. महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे राज्य कार्याध्यक्ष तथा महामंत्री विशाल अग्रवाल, कवी लेखक साहित्यिक तथा ज्येष्ठ सर्वोदय कार्यकर्ते प्रकाश अंभोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी आचार्य विनोबा भावे यांच्या प्रतिमेस खादीचा सुत्रहार अर्पन करण्यात आला. आचार्य विनोबा भावे यांनी आपल्या भूदान पदयात्रेत, आदिवासी भागातील शिक्षण, आरोग्य, बेरोजगारी, दारिद्र्य आदी प्रश्न समकालीन महाराष्ट्र शासनाच्या निदर्शनास आणून दिल्याचे राज्य कार्याध्यक्ष तथा महामंत्री विशाल अग्रवाल यांनी सांगितले. विनोबा भावे यांनी आंध्र प्रदेशातील पोचमापल्ली या खेड्यात भूदान चळवळीच्या माध्यमातून आर्थिक-सामाजिक विषमतेचा तोडगा काढल्याचे देखील अग्रवाल म्हणाले. कार्यक्रमासाठी राम जाधव, सुभाष कुंभारकर, जेजेराव लुंगारे, बाळू खंडागळे, विठ्ठल सुर्यवंशी आदींनी परिश्रम घेतले.

# वसमतच्या कोठारी शिवारात बिबट्याचा मृत्यू



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १२ सप्टेंबर**
तालुक्यातील कोठारी शिवारात बिबट्या मृतावस्थेत जंगलामध्ये आढळून आला आहे. १० सप्टेंबर बुधवारी दुपारी जंगलात त्या मृत बिबट्याचा अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. वन्य प्राण्यांसोबत झालेल्या झुंजीमुळे तो जखमी होऊन मृत झाला असावा अशी शक्यता पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वसमत तालुक्यातील कोठारी शिवारातील जंगलामध्ये वन विभागाचे कर्मचारी ता. ९ सप्टेंबर मंगळवारी गस्तीवर असतांना त्यांना एका झुडूपामध्ये बिबट्या दिसून आला, त्यांनी बिबट्याला हुसकावण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याची हालचाल दिसून येत नसल्यामुळे त्यांनी जवळ जाऊन पाहिले असता तो मतावस्थेत टिसन आला. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर विभागीय वन अधिकारी राजेंद्र नाळे, सहाय्यक विभागीय वन अधिकारी सचिन माने, वन परिक्षेत्र अधिकारी आर. एल. पाटील, वनपाल अमोल झिनकरवाड, श्रीरामे यांच्या पथकाने घटनास्थळी पाहणी केली. त्यानंतर या घटनेची माहिती पशुसंवर्धन विभागाला देण्यात आली. पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. प्रविण राठोड, पशुधन विकास अधिकारी डॉ. एस. पी. पवार, डॉ. ए. बी. आमले, डॉ. टी. के. भिसे, नायब तहसीलदार मोरे यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, पशुसंवर्धन विभागाच्या पथकाने घटनास्थळी मृत बिबट्यावर उत्तरीय तपासणी केली. त्यानंतर त्याच्यावर जंगलातच अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. मयत बिबट्या हा मादी असून त्याचे वय सुमारे २ ते तीन वर्षाचे असल्याचे सांगण्यात आले आहे. तर इतर वन्य प्राण्यासोबत झालेल्या झुंजीमध्ये बिबट्या गंभीर जखमी झाला असून त्यामुळे त्याला शिकार करता आली नाही तसेच हालचालही करता आली नाही. त्यामुळे त्याचा मृत्यू झाला असावा अशी शक्यता पशुसंवर्धन विभागाच्या सुत्रांनी व्यक्त केली आहे.

# दिपावलीनिमित्त तात्पूरते फटाके परवान्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ सप्टेंबर**
जिल्ह्यात दिपावली-२०२५ संबंधाने तात्पुरते फटाके परवाना (मोकळ्या जागेत) मिळण्यासाठी दिनांक १५ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत किरकोळ फटाके विक्रीचा व्यवसाय करु इच्छिणाऱ्यांना तात्पुरते फटाके परवाना मिळण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, हिंगोली यांच्याकडे अर्ज करावेत. हा अर्ज स्फोटक अधिनियम २००८ मधील नियम ११३ (फॉर्म नं. एई-५) मध्ये करणे आवश्यक आहे. अर्जासोबत अर्जदाराच्या पासपोर्ट साईज आकाराची तीन फोटो व संबंधित ग्रामपंचायत, नगर परिषद, तहसीलदार, पोलीस स्टेशन यांचे नाहरकत प्रमाणपत्र व अर्जदारांचे चारित्र्य प्रमाणपत्र, जागेच्या मालकीचा पुरावा व मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक राहील. खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून तात्पुरते फटाके परवान्यासाठी दि. १६ ते २२ सप्टेंबर, २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज करावेत. त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

तात्पुरते फटाके ज्वलनशील नसलेल्या शेडमध्ये ठेवण्यात यावे व त्यामध्ये अनधिकृत व्यक्ती प्रवेश करणार नाही या दृष्टीने सुरक्षा व्यवस्था ठेवावी, फटाके विक्रीचे व साठवणुकीचे दुकाने एकमेकांपासून कमीत कमी तीन मीटर अंतरावर असावेत आणि सुरक्षित कामापासून ५० मीटर अंतरावर असावे, फटाके शेड हे एकमेकाच्या समोर नसावे, कोणत्याही प्रकारचे तेलाचे दिवे, गॅस दिवे, उघडे दिवे शेडमध्ये सुरक्षित अंतरामध्ये वापरु नये व विद्युत बल्ब वापरल्यास ते भिंतीला लावलेले असावेत. केवळ वायरने लोंबकाळत ठेवण्यात येऊ नये. विद्युत बल्बचे बटन प्रत्येक दुकानाच्या भिंतीवर लावलेले असावेत व मास्टर स्विच प्रत्येक रांगेमध्ये असावे. कोणत्याही प्रकारचे फटाके शेडपासून ५० मीटर आत फोडू नये. एका ठिकाणी ५० पेक्षा अधिक दुकांनाना परवानगी देण्यात येणार नाही. व्यवसाय कर अधिकारी यांचे ना-देय प्रमाणपत्राशिवाय अर्ज स्वीकारला जाणार नाही. तात्पुरता फटाका परवान्याची सहाशे रुपये फीस चलनाद्वारे भरणा करणे आवश्यक राहील, असे अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी अभिमन्यू बोधवड यांनी कळविले आहे.

# ऐतिहासिक दसरा प्रीमीयर क्रिकेट लीग स्पर्धेच्या लोगोचे अनावरण




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ सप्टेंबर**
ऐतिहासिक दसरा मोहत्सवात क्रिकेट स्पर्धा खेळविण्यात येणार असल्याने या वर्षी प्रशासनाकडून सुविधेत कमतरता भासत असेल तर पुढील वर्षी यात आणखी भर देऊन मोठ्या प्रमाणात संघाचा सहभाग कसा वाढवता येईल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दसरा प्रीमियर क्रिकेट स्पर्धेच्या लोगो अनावरण प्रसंगी बोलताना सांगितले.

येथील शासकीय विश्राम गृहात शुक्रवारी सार्वजनिक दसरा मोहत्सव समिती व पत्रकार क्रिकेट संघाच्या संयुक्त विद्यमाने दसरा प्रीमियर क्रिकेट लीग लोगोचे अनावरण जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटूकडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, क्रीडाधिकारी राजेश्वर मारावार, आत्माराम बोथीकर, मुख्याधिकारी अरविंद मुंडे, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप मोदे, स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवसांब घेवारे, जगदीशराज खुराणा, विलास गोरे, शिवशंकर घुगे, बाळू बांगर, क्रिकेट संघाचे कॅप्टन यांच्यासह सर्व पत्रकारांची उपस्थिती होती.

दरम्यान, १७० वर्षाची ऐतिहासिक परंपरा असलेल्या सार्वजनिक दसरा मोहत्सवात यंदा पहिल्यांदाच क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याने सर्व क्रिकेट प्रेमी मध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या दसरा मोहत्सवात मोठ्या प्रमाणात क्रिकेट संघ सहभागी होणार होते. मात्र वेळ आणि मर्यादा पाहता केवळ आठ संघ खेळविण्याचा निर्णय समितीने घेतला आहे. यात दोन गट केले जातील त्यानुसार क्रिकेट सामने खेळविले जाणार आहेत. यावेळी पोलीस अधीक्षक कोकाटे, उपविभागीय अधिकारी समाधान घुतुकडे, तहसीलदार भुजबळ यांनी मार्गदर्शन केले. आपसातील मतभेद विसरून एकोपा वाढविण्यासाठी हाच डोळस उद्देश समोर ठेवून क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. सूत्रसंचालन राकेश भट्ट तर प्रस्तावना प्रद्युमन गिरीकर यांनी केली. यामध्ये आठ संघांचा समावेश असणार आहे. त्यामध्ये पत्रकार क्रिकेट संघ, पालिका संघ, पोलीस क्रिकेट संघ, महसूल क्रिकेट संघ, व्यापारी क्रिकेट संघ, महावितरण, आणि वन विभाग, वकील क्रिकेट संघ या आठ संघाचा समावेश आहे.

दोन गटातून होणार सामने-अ गटात - पत्रकार क्रिकेट संघ पोलीस संघ, महावितरण, वकील संघ तर ब गटात - व्यापारी क्रिकेट संघ, पालिका क्रिकेट संघ, वन विभाग, आणि महसूल क्रिकेट संघ यांचा समावेश असणार आहे. सार्वजनिक दसरा मोहत्सवात क्रिकेट खेळासाठी लागणारे ब्याट, बॉल, आदी साहित्य दसरा समितीकडून पुरवठा केला जाणार आहे.